# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. १९/१०/२०१८**

आज शुक्रवार दि. १९/१०/२०१८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. ०८/१०/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | डिम्पल विनोद मेहता | महापौर |
| २) | चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ४) | भोईर राजू यशवंत | विरोधी पक्षनेता |
| ५) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ६) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ७) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ८) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ९) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १०) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १४) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १५) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १७) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १८) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २०) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २२) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २३) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २४) | जैन गीता भरत | सदस्या |
| २५) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २६) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २७) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| २८) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २९) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ३०) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ३१) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ३२) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३३) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३४) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३५) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३७) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३८) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३९) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ४०) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४१) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ४२) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४३) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४४) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४५) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४६) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४७) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४८) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४९) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ५०) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ५१) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ५२) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ५३) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५४) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५५) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५६) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५७) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५८) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५९) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६०) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ६१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६२) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६३) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६४) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६५) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६६) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६७) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६८) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६९) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ७०) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ७१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७३) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७४) | **परमार हेतल रतिलाल** | **सदस्या** |
| ७५) | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | **सदस्य** |
| ७६) | **जैन दिनेश तेजराज** | **सदस्य** |
| ७७) | **भावसार वंदना संजय** | **सदस्या** |
| ७८) | **शाह सीमाबेन कमलेश** | **सदस्या** |
| ७९) | **दुबे मनोज रामनारायण** | **सदस्य** |
| ८०) | **विराणी अनिल रावजीभाई** | **सदस्य** |
| ८१) | **अहमद साराह अकरम** | **सदस्या** |
| ८२) | **इनामदार जुबेर अब्दुल्ला** | **सदस्य** |
| ८३) | **शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम** | **सदस्य** |
| ८४) | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |
| ८५) | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| ८६) | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| ८७) | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| ८८) | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| ८९) | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १) | **म्हात्रे सचिन केसरीनाथ** | **सदस्य** |
| २) | **भट दीप्ती शेखर** | **सदस्या** |
| ३) | **सपार उमा विश्वनाथ** | **सदस्या** |
| ४) | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |

**रजेचा अर्ज -**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **ढवण निलम हरीशचंद्र** | **सदस्या** |
| **२)** | **सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन** | **सदस्या** |

**मा. महापौर :-**

नमस्कार. उपस्थित सर्व मान्यवर, पदाधिकारी, गटनेते, नगरसेवक, नगरसेविका, मा. आयुक्त, अधिकारी, पत्रकार बंधु व नागरिक यांचे स्वागत आहे. दिपावली व नविन वर्षाच्या ईदमिलाद तसेच गुरुनानक जयंती सणाच्या सर्वांना शुभेच्छा. सर्वांनी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात व शांतपणाने पार पाडावी तसेच आजच्या सभेमध्ये मिरा भाईंदर शहराचे नाव लौकिक वाढविलेले प्रतिष्ठित मान्यवर व्यक्ती उपस्थित असून मा. महासभामध्ये त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

**नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिकारी यांच्या परवानगीने बोलतो, **मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. १९/१०/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे .** आजच्या सभागृहामध्ये आजच्या सभेत तीन जणांचे सत्कार आपण करणार आहोत. त्यामध्ये डॉ. निरंजन अग्रवाल, श्री. नितीन म्हात्रे, डॉ. एम.एल.गुप्ता ह्या तीन नागरिकांचे आपण सत्कार ह्या सभागृहामध्ये करणार आहोत. तरी ह्या ठिकाणी ते उपस्थित आहेत का? डॉ. एम.एल. गुप्ता यांना भारत सरकार गृह मंत्रालय राज भाषा विभागामार्फत प्रतिवर्षी १४ सप्टेंबर रोजी हिंदी भाषा दिनानिमित्त राजभाषा, राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. दोन विभागामध्ये पुरस्कार दिले जातात. पहिले राजभाषा किर्ती पुरस्कार भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रालय विभाग बँका उपक्रम तसेच नगर राजभाषा समितीमध्ये, हिंदी उत्कृष्ठ काम करणारे व्यक्तींना दिला जातो. दुसरा राजभाषा गौरव पुरस्कार जो उत्कृष्ठ पुस्तक तसेच उत्कृष्ठ लेखाकरिता दिला जातो. भारताचे माजी

उपराष्ट्रपती व्यंकया नायडू यांच्या शुभहस्ते डॉ. एम.एल. गुप्ता यांना नवी दिल्ली इथे विज्ञान भवन इथे सन २०१७-१८ करिता सर्व श्रेष्ठ प्रकाशित लेखश्रेणी राजभाषा गौरव पुरस्कार देण्यात आला असून त्याकरिता ह्या सभेमध्ये त्यांचा सत्कार आयोजित करण्यात येत आहे. तसेच डॉ. निरंजन अग्रवाल, मिरा भाईंदर शहरातील निवासी तसेच माजी नगरसेवक धनराज अग्रवाल यांचे सुपुत्र सर्जन डॉ. निरंजन अग्रवाल लंडन येथे झालेल्या बोर्ड मिटींगमध्ये इंटरनॅशनल सोसायटी ऑफ युनिर्वसिटी ऑफ कोलन ॲन्ड रेकटम सर्जन एक्झीक्युटिव्ह बोर्डावर झालेल्या सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सद्यस्थिती डॉ. अग्रवाल हे भारताचे सदस्य असे आहेत की ज्यांना उपरयुक्त बोर्डाची सदस्य होण्याची संधी मिळाली आहे. डॉ. अग्रवाल यांनी कोलम व रेक्टम रोगाच्या उपचाराचा प्रसार सर्वत्र भारतामध्ये करण्याचा मानस असून सन २०१९ मध्ये पॅक्टोलॉजी विषयावर भारतामध्ये आंतरराष्ट्रीय सभा आयोजित करणार आहेत. त्याचप्रमाणे बॉम्बे हॉस्पीटलमध्ये ते कन्सलटन्ट सर्जन असून भाईंदर येथे सालासर नर्सिंग म्हणून नावे रुग्णालय चालवत आहेत. त्यांचे ह्या कामगिरीने मिरा भाईंदर हे शहराचे नाव लौकीक वाढलेले असून ह्याबाबत मा. महासभा त्यांचे सत्कार करण्यासाठी आपण आयोजित करणार आहोत. तसेच श्री. नितीन म्हात्रे, मिरा भाईंदर शहरातील मोर्वा गावातील स्थानिक रहिवासी नितीन म्हात्रे बालवाडी स्टेडियम पुणे येथे भरलेल्या आशियाई चषक चॅम्पीयनशिप शरीर सौष्ठत्व स्पर्धामध्ये पुरुष ५५ किलो वजनी गटामध्ये त्यांना सुवर्ण पदक मिळाले आहे. ह्यापूर्वी ही श्री. नितीन म्हात्रे यांना चार वेळा भारतश्री व एकदा जागतिक श्री असे विजेते पद मिळालेले आहेत. त्यांच्या १४ वर्षाच्या अथक परिक्षमाने आशिया विजेते पद पटकावून त्यांनी आपले व आपल्या मिरा भाईंदर शहराचे नाव लौकिक वाढवलेले आहे. म्हणून त्यांचा सत्कार आपण ह्याठिकाणी आयोजित केलेला आहे. डॉ. निरंजन अग्रवाल यांनी कृपया सभागृहामध्ये यायचे आहे. डॉ. निरंजन अग्रवाल ह्यांचा सभागृहामध्ये डायसवर सत्कार होत आहे. डॉ. एम.एल. गुप्ता यांचा सत्कार होत आहे.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम, मी सभागृहात महापौरांना, आयुक्तांना धन्यवाद देतो. ह्या शहरातील मान्यवरांचा आपण सत्कार केला. गुणगौरव होतो. त्याचबरोबर एक जो आता सत्कार करायचा होता. नितीन म्हात्रे हे येऊ शकले नाही. पण त्यांच्यासाठी मी महापौरांना विनंती करतो. उपमहापौरांना विनंती करतो की नितीन म्हात्रे हा मोर्वा गावाचा सुपुत्र आहे. अत्यंत गरीबीतून त्यांनी कोणतेही साधन नसताना आपले शरीरयष्टी कसून घेतले. अत्यंत मेहनत केली. त्याचा जो खर्च आहे हा खर्च महापौर मॅडम त्या कुटुंबाला किंवा त्याला स्वतःला ते पेलवत नाही ही गोष्ट खरी आहे. तरी सुध्दा पुन्हा पुन्हा प्रयत्न करुन त्यांनी यश मिळवलेलं आहे. यश मिळवून आपल्या शहराचं नाव वाढवलेलं आहे. माझी सभागृहाला मा. महापौरांना, मा. आयुक्तांना, उपमहापौरांना विनंती आहे की अशा तरुणांना ह्या सभागृहाने साथ द्यायला पाहिजे. महापालिकेने साथ द्यायला पाहिजे होत असेल नियमात बसत असेल तर आयुक्त साहेब ते ह्या तरुणाला आपल्या महापालिकेत कायमस्वरुपी नोकरीवर घ्यावं अशी माझी विनंती आहे. महापौर मॅडम आपण इतका मोठा कारभार पण चालवतो अशा गुणी तरुणांना पुढे त्याच भविष्य उज्जवल व्हावा म्हणून आपण अर्थसहाय्य करत असेल तर नियमात बसत असेल तर दीड, दोन लाखाची त्याला जर आर्थिक मदत केली तर आपण एक चांगल काम केलं. त्यांना कुठेही लौकीक नाही. कोणतीही पार्श्वभूमी नाही. त्यांचे कुटुंब साथ सरळ गरीब आहे आणि सरळ स्वभावाचं आहे. तरी महापौरांनी नोंद घ्यावी. एवढीच विनंती आहे धन्यवाद.

**मा. महापौर :-**

नक्की आपण प्रयत्न करु.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम काकांनी जो विषय मांडला तो अत्यंत महत्वाचा आहे. मागच्या वेळेलाही नितीन म्हात्रे यांचा सत्कार केलेला. तेव्हा त्याला आम्ही भेटलो त्यांनी अशी विनंती केली की मला कुठेतरी कामाला लावा किंवा आर्थिक काकांचे जे म्हणणे सांगितले ते आमचेही म्हणणे आहे. तरी काकांनी सांगितल्याप्रमाणे आमचे पण अनुमोदन आहे. कृपया त्याच्यावर सहानुभूतीने विचार करावा.

**जयेश भोईर :-**

मॅडम काकांनी मांडलेल्या विषयाला आमचा पण पाठिंबा आहे. त्याला खरोखर नोकरीची गरज आहे.

**नगरसचिव :-**

आजच्या दिवसाच्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यांत येत आहे. श्रीम. सय्यद नुरजहाँ नजर हुसेन यांचा आजचा रजेचा अर्ज आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला आपण सुरुवात करतो. पहिला प्रश्न

आहे सौ. निलम ढवण यांचा तरी ह्या गैरहजर असल्यामुळे त्यांचा प्रश्न लॅप्स होत आहे. ह्यानंतरचा पुढचा प्रश्न आहे श्री. अनिल सावंत ह्यांचा ११ वाजून ४० मिनिट झालेले आहेत. अर्ध्या तासाचा प्रश्नोत्तराचा टाईम राहिल.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम बऱ्याच वेळा ह्या शहरामध्ये चर्चा झाली. महासभेमध्ये आपण वेगळी मिटींग लावली होती की ह्या शहरामध्ये जे फेरिवाल्यांचा प्रश्न आहे आणि त्या अनुषंगाने आजचा हा जो बाजार फी वसुली मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये किती ठिकाणी केली जाते. त्या अनुषंगाने हा प्रश्न विचारलेला आहे. त्याच्यामध्ये आज परिस्थिती मागच्या वेळेला मी प्रश्न विचारला होता की किती केसेस पेंडींग आहेत. लॉ डिपार्टमेंटला त्यावेळचा सुध्दा एवढ्या मोठ्या केसेसचा बंच हा सभागृहामध्ये सादर झाला होता. आणि त्यातल्या बऱ्याचशा केसेस हे बाजार फी चे ठेकेदार आहेत. त्यांनी दिलेले चेक रिटर्न गेलेत. त्या अनुषगांने त्या केसेस होत्या आणि आज परिस्थिती ही आहे. करोडोमध्ये प्रलंबित वसूली रक्कम आज आपल्याला ठेकेदारांजवळून येणं बाकी आहे. हे जे रिटर्न गेलेले चेक आहेत ते तर सोडाच आणि परिस्थिती ही आहे की आज तोच ठेकेदार वेगळ्या नावाने टेंडर घेऊन आज तीच वसुली करतो आणि दिवसेंदिवस फेरिवाले ह्या शहरामध्ये वाढत आहेत त्याला जबाबदार ही ठेकेदार आहेत. त्याला जास्तीत जास्त वसुली करायची असते. महापालिकेने आपले अंदाज दिले होते किती फी वसुली व्हायला पाहिजे. महापालिकेने काहीतरी सर्व्हे केला असेल की किती फेरिवाले बसतात त्या अनुषंगाने एक अर्थसंकल्पामध्ये तरतुद केली होती. पण अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमीचा ठेका ह्या ठेकेदाराला दिला गेलेला आहे. त्यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान तर झालेले आहे. आणि फेरिवाले काही कमी झालेले नाहीत. दिवसेंदिवस वाढतच आहेत. आज महापालिकेने ठरवून दिलेले जे दर आहेत आणि जी वसूली आहे. महापालिकेने काही दर ठरवून दिलेले आहेत. वसुली करते वेळी ज्यावेळी रिसीप्ट दिली जाते त्या रिसीप्टची कॉपी मी आणली होती. त्यामध्ये एकही डेट नाही. कोणालाही कितीही रुपयाची पावती दिली जाते आणि वसुली केली जाते. एकतर पालिकेचे नुकसान आणि दुसऱ्या ठिकाणी ह्या शहरामध्ये वाढल्या. फेरिवाल्यांचा प्रश्न ह्या दोघांनाही जबाबदार हे ठेकेदार आहेत आणि माझी अपेक्षा होती की मार्चमध्ये साधारण एक प्रश्न फार जुना आहे. त्यानंतर हा प्रश्न विचारल्यानंतर पालिकेने काय कारवाई त्याच्यावर केली ह्याचं मला प्रशासना जवळून उत्तर पाहिजे. आकडे इथे दिलेले आहेत. कारवाई काय केली याचे उत्तर पाहिजे.

**दिपक पुजारी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो मिरा भाईंदर महापालिकेमध्ये आपले एकुण जे चार ठेकेदार आहेत. ते ठेकेदार मागील तीन वर्षापासून नियमितपणे त्यांच्या रक्कमा भरत आहेत. परंतु २०१४-१५ ला तिन्ही ठेकेदारांनी ह्या रकमा भरल्या नव्हत्या आणि जे धनादेश दिलेले होते ते बाऊंस झालेले होते म्हणून महापालिकेने त्यांच्या विरुध्द न्यायालयात १३८ नुसार दावा दाखल केलेला आहे आणि त्या रकमा अद्याप वसुल झालेल्या नाहीत. त्याची लिस्ट आहे.

**अनिल सावंत :-**

ते कधी दाखल केले डिसेंबर २०१५ मध्ये केले का? आणि अजून केस पेंडींग आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय बाजार फी वसूलीबाबत महापालिकेकडून भाईंदर (प.), भाईंदर पूर्व, मिरारोड, मुर्धा ते उत्तन असे चार ठिकाणी आपण ठेका वसुली करतो. साधारणतः २०१५-१६ मध्ये, २०१६-१७ आणि २०१७-१८ ह्या तीन वर्षामध्ये जी वसुली प्रस्तावित होती त्यापैकी २०१६-१७ आणि २०१७-१८ ची १०० टक्के आपण वसुली केलेली आहे. तथापि २०१४-१५ आणि २०१५-१६ या कालावधीची काही रक्कम मोठ्या प्रमाणात प्रलंबित होती त्याची आपल्यालाही कल्पना आहे. प्रकरणामध्ये संबंधित आणि महापालिकेला चेक दिले होते आणि त्यांचे चेक कॅश झाले नाहीत. डिसेंबर २०१५ मध्ये मा. न्यायालयात सेक्शन १३८ खाली निगोशिएशन इन्स्ट्युमेंट ॲक्ट १८८१ नुसार संबंधितांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे आणि तो न्यायप्रविष्ठ आहे. मी सभागृहाला एक शाश्वती देऊ इच्छितो. रेव्ह्युन्यू वसुली असते. आर.आर महसुल खात्यामार्फत ह्या संबंधित लोकांच्या मालमत्ता सर्च केल्या जातील येणाऱ्या एक महिन्याच्या आत आणि वसुलीचे भाडे जरी प्रलंबित असले तर त्यांच्या मालमत्ता अटॅच करण्याबद्दलचा आम्ही येणाऱ्या काळामध्ये कारवाई करु आणि ही प्रलंबित रक्कम कशी वसुली होईल. संबंधित लोकांच्या पर्सनली बैठका घेतल्या जातील आणि न्यायालयाचा निर्णय आपल्याला माहिती आहे. झालं तरी ती लोक परत अपील करतील. त्यामुळे निगोशिएशन करुन आणि जितक त्यांना रेव्हेन्यू ॲक्ट खाली काय करता येईल ह्या आधारे कारवाई प्रोसेडिंग करुन एक भूमिका आपली फौजदारी अंतर्गत चालू आहे. दुसरी त्यांच्याशी दालनात निगोशिएशन आणि तिसरी रेव्हेन्यू जप्ती ह्या अनुषंगाने याची कारवाई करुन येणाऱ्या काळामध्ये

महासभेसमोर ह्याचा प्रगती अहवाल सादर केला जाईल. आणि ही खूप लाजीरवाणी केस आहे की महापालिकेची रक्कम येणं, कोणी आपल्याला जर प्रलंबित ठेवत असेल तर ते कदापी सहन करणे शक्य नाही.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब याच्यामध्ये गंमत अशी आहे की आज तेच ठेकेदार डिसेंबर २०१५ ला तुम्ही केसेस केलेले आहेत. तेच ठेकेदार बाजार फी वसुली करतात.

**मा. आयुक्त :-**

तसे असेल तर आपण त्याची दखल घेऊ. तपासणी करु निश्चित.

**अनिल सावंत :-**

आणि दुसरं हे ठेकेदार जी वसुली करतात बाजार फी त्याच्यावर कंट्रोल कोणाचं आहे की नाही? आज पालिकेने दर ठरवून दिलेले आहेत काही तरी मग त्याच्यावर वॉर्ड ऑफिसरच कंट्रोल आहे की कुठच्या डिपार्टमेंटचे कंट्रोल आहे?

**मा. आयुक्त :-**

संबंधित बाजार वसुली डिपार्टमेंट आहे तसेच डि.एम.सी. आहेत. विभाग प्रमुख आहेत आणि इनडायरेक्टली प्रभाग अधिकारी हे प्रतिनियंत्रण अधिकारी आहेत.

**अनिल सावंत :-**

सर त्यांच्यावर तसे काहीच कंट्रोल नाही. त्याच्यावर ना डेट असते डायरेक कोणाला ५० द्यायचे तिथे १०० ची पावती देणार आणि घेऊन घेणार दादागिरी करुन. काही वेळा तर माल जप्त करतात. फेरिवाल्यांचा माल फेकून देतात मग याच्यावर फक्त पालिकेला पैसे मिळतात हा रिजन भाग झाला पण आज शहराची जी बकाळ अवस्था झालेली आहे. ह्या फेरिवाल्यांनी केलेली आहे. सभागृहामध्ये किती वेळा तो चर्चेचा विषय आलेला आहे. त्याच्यावर काहीतरी कंट्रोल असायला पाहिजे की नाही.

**मा. आयुक्त :-**

निश्चितच सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याची आम्ही नोंद घेऊ आणि महापालिकेकडून ठेकेदारावर नियंत्रण आणि शहरात आता फेरिवाल्यांचा प्रश्नांचा नियंत्रण आणि कारवाईचा मुद्दा आम्ही आपल्याकडून, सभागृहाकडून सुध्दा दीड महिन्याचा वेळ घेतला. येणाऱ्या दिपावलीपर्यंत आम्ही याचे नियोजन करु.

**अनिल सावंत :-**

धन्यवाद ठिक आहे.

**दिनेश नलावडे :-**

विषयाला धरुनच आहे. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो आता सन्मा. सदस्य अनिल सावंत यांनी जो विषय आणलेला आहे तो गंभीर विषय आहे. ठिक आहे. जोपर्यंत आम्हाला आमच्या ठिकाणचं विभागाच माहित आहे तोपर्यंत मा. आयुक्त साहेब मी आपल्या निदर्शनास आणून देतो काही गोष्टी की जसं आपण जो भाव ठरवून दिलेला आहे महानगरपालिकेने ज्या पध्दतीने ठेका त्यांना दिलेला आहे परंतु सर्रास ह्याचं उल्लंघन केलं जातं. ठेकेदारांकडून जिथे पंचवीस आपण नक्की केलेला दर आहे त्याठिकाणी ते ५० रुपये वसुली करतात. काही ठिकाणी ५० रुपये नाही तर १०० रुपये वसुली करतात. पावती देतात जुनी २५ ची. वसुली केली जाते ५० आणि १०० ची. उपमहापौर साहेब ही हकीकत आहे. तुम्हाला आम्ही निदर्शनास आणून देऊ आणि तसे पुर्नः आम्ही तुम्हाला सादर करु. महापौर मॅडम मी आपल्याला दुसरं एक निदर्शनास आणून देऊ इच्छितो आपण जे बाजार वसुलीचे जो एरिया ठरविलेला आहे तो एरिया सोडून कुठला एरिया कशा पध्दतीचा आहे त्यांना गल्ल्या दिल्या आहेत का? कुठपर्यंत त्यांना दिलेल्या आहेत. वसुल करण्यासाठी हा सगळा तुम्ही तर अभ्यास केला आपण मा. आयुक्त साहेब तर सगळ्याच ठेकेदारांकडून उल्लंघन केले जात आहे. जसे की आता अनिल सावंतजी बोलेले की त्याच्यावर देखरेख कोणाची आहे का? तर महापौर मॅडम मी आपल्याला विनंती करतो ह्या बाबतीमध्ये की आपण लक्ष केंद्रीत करा ह्या गोष्टीवरती कारण फेरिवाले देखील हैराण आहेत आणि सर्वात जास्त भाईंदर पूर्वेचा भाग हा अतिशय दाटीवाटीचा आहे. फुटपाथ देखील खुल्ला ठेवला जात नाही. मा. आयुक्त साहेब ठेकेदार त्यांना गल्लीमध्ये बसायला देतात. फुटपाथवरती जागा देतात आणि जे दुकानवाल्यांचे सामान फुटपाथवर ठेवतात त्यांच्यावर देखील ते लोक वसुली करतात. तर त्यांच्याकडे जर ५०० फेरिवाले असतील तर ते ५००० जणांचे फी वसुली करत आहेत. लक्ष केंद्रीत करा आणि त्यांच्यावरती आणि जे ठेकेदार असतील त्यांच्यावर तोडक कारवाई आपण केली पाहिजे. आणि तुम्हाला पुरावे पाहिजे असतील तर आम्ही पुरावानिशी तसे साबीत करुन देऊ. मा. महापौर मॅडम ह्याबाबतीत आपण काय निर्णय घेणार.

**मा. महापौर :-**

ऐसे प्रकार की अगर है वसुली करते है अनलिगल प्रकार से वो उनसे कायमपूर्वक कारवाई की जाए।

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम तुम्ही ह्या शहराचे प्रथम नागरिक आहात. जोपर्यंत ठोकपणे आश्वासन देत नाही त्यांना ठोकपणे सांगत नाही तोपर्यंत ह्या शहराचा विकास आणि याच्यावरती कारवाई होणार नाही. तुम्ही एक ठेकेदारावर कारवाई केली. बाकीचे ठेकेदार वठणीवरती येतील. महापौर मॅडम हीच विनंती आहे.

**मा. महापौर :-**

नियमानुसार इस प्रकरण में आयुक्त साहब कारवाई की जाए।

**गिता जैन :-**

आपकी परमिशन से मॅडम ठेकेदार कारवाई कब करेंगे जब कंपनी अलग अलग वह फॉर्म करते है और बाकी उस कंपनी को वापीस दे दिया जाता है। क्या ऐसा कोई नार्म्स से नही है की उस कंपनी का अगर अगला ठेकेदार डिफॉल्टर है और दुसरे नाम से कंपनी हो रही है अगर उसके रिलेटिव्ह के नाम पे भी हो रही है। तो आप उसका ब्लॅक लिस्ट किया जाए। तो ही कही ना कही रोक आ सकती है। आज मैंने एक कंवनी के नाम से किया, कल दुसरी कंपनी के नाम से किया। कल तिसरी कंपनी के नाम से किया, ओनर तो में ही हूँ। तो इसपे क्या आप लाओगे कंपनी के नाम चेंज करके सेम सेम पर्सन आते है। अभी अनिल भाईने भी कोई बात की हम उसपे तो कॉन्सन्ट्रेट कर ही नही पा रहे है। देख ही नही रहे है की उसको कैसे किया जाए। कंपनी का नाम आया हमने दे दिया क्या आप उसकी डिटेल निकालने हो की उस कंपनी के ओनर कौन है, उसके पार्टनर कौन है, उसके ठेकेदार कौन है?

**मा. महापौर :-**

सब डिटेल निकाल के आयुक्त साहब दिजीए।

**मा. आयुक्त :-**

ऑलरेडी अनिल सावंत साहेबांना मी त्याचे उत्तरच दिले. तपासणी करु म्हणून एखादी कंपनी ॲड करत असेल आणि दुबार दुसरी कंपनी करत असेल आणि तेच मेंबर असतील तर दे आर लायबल. त्यांना आपल्याला ब्लॅक लिस्ट करता येते. त्यांच्यावर कारवाई करता येते. इव्हन कंपनी चेंज केली म्हणून आपल्याला थांबायची काही गरज नाही.

**नगरसचिव :-**

पुढचा प्रश्न आहे अनिल सावंत यांचा महापालिका हद्दीत किती संकुल म्हाडा योजनेअंतर्गत परवानगी देण्यात आलेली आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, आज ह्या शहराचे एकूण क्षेत्रफळ जर शहराचे बघितले तर ७९ स्क्वेअर कि.मी म्हणजे साधारण एका स्क्वेअर मीटरला १० हजार या अनुषंगाने साधारण हे शहर ८ लाख पॉप्युलेशन सहन करु शकतं. म्हाडाला आपण २.५ एफ.एस.आय. देतो आणि आज ह्या शहरामध्ये जिथे जिथे म्हाडाचे कॉम्पलेक्स झालेले आहेत. जाऊन त्या परिसराची जरा पाहणी करा किती दुर्दशा केलेली आहे ह्या लोकांनी. ह्या शहराची का आपण देतो म्हाडाला ह्या शहरामध्ये का आणतो. एवढा २.५ एफ.एस.आय. देऊन त्या बदल्यात पालिकेला जर कुठचाही इन्फास्ट्रक्चर ते देणार नसतील ह्या शहरामध्ये ह्यापूर्वी ज्यावेळी तुळशीदास म्हात्रे साहेब महापौर होते. त्यावेळी एम.एम.आर.डी.ए आणि म्हाडा यांना कोणतीही परवानगी ह्या शहरामध्ये देऊ नये असा ह्या सभागृहाने निर्णय घेतला होता. आज जिथे जिथे म्हाडाच्या वस्ती झालेल्या आहेत. २.५ एफ.एस.आय. देऊन ना धड रोड आहेत तिथे जायला, माणसे चालू शकत नाही. राम नगरमध्ये वस्ती झालेली आहे. म्हाडाची आपण सुध्दा बऱ्याच वेळा तिथून गेला असाल. गाड्यांच सोडा माणसे जाऊ शकत नाही तिथे आणि त्या बदल्यात आज म्हाडा ह्या शहराला काय देते याचे जरा स्पष्टीकरण पाहिजे साहेब.

**मा. महापौर :-**

स्पष्टीकरण करावे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य सावंतजी राज्यशासनाच्या निर्देशानुसार महापालिकेचं कामकाज चालते. आपल्याला माहिती आहे. आपल्या देशामध्ये सामान्याला घर घेणे किती अवघड आहे. आता ह्या १,२,३,४ वर्षामध्ये त्या बिझनेसमध्ये ह्या काळामध्ये कदाचित भाव कमी झाले असतील. पण मार्केटमध्ये काय वस्तुस्थिती आहे. अजून त्याची खात्री करावी लागेल. सेम जरी कमी असले तरी मला वाटतं नाही ह्या उपनगरामध्ये

फेरिमध्ये गेल्या तीन चार वर्षात दरात काही तफावत फार पडली असेल कारण की लोकांनी इन्वेस्टमेंट एवढी केलेली याच कॉस्टच एवढे आहेत. कन्स्ट्रक्शन कॉस्टच एवढे आहेत की त्यांना ते जरी टॅक पडून असला तरी कमी रेटने विकणं परवडत नाही. तर ह्या सगळ्या गोष्टींचा विचार केला तर राज्यशासनाचे दायित्व आहे की गरिबांना घरं देण्याचा तर त्याला दुसरा पर्याय फक्त एम.एम.आर.डी.ए आणि म्हाडा आपल्याकडे आहे की जेणेकरुन सवलतीच्या दरामध्ये अल्प भूधारक, भूधारक, मध्यम ह्या कुटुंबांना ह्यामधून घरे उपलब्ध होऊ शकतात. मी असे म्हणत नाही की येथे सगळ्यांनाच उपलब्ध होतील पण निश्चित हे ही बाब मी मान्य करतो आपल्या प्रश्नाचा गांभिर्य विशेषतः लक्षात घेता जिथे सवलतीच्या दरात जनसामान्यांना घरे उपलब्ध होण्याचा जो कन्सेप्ट आहे. त्याठिकाणी हायर एफ.एस.आय. देऊन ते शक्य आहे आणि ज्या ठिकाणी हायर एफ.एस.आय दिला जातो. त्या लोकॅलिटीमध्ये फॅनामिन डेनसिटी वाढते. लोकसंख्या वाढते आणि तिथे जास्त क्राऊड तयार होतो आणि तिथल्या नागरिकांना त्याचा थोडाफार गैरसोय होते ह्या गोष्टी मी मान्य करतो. ज्या-ज्या ठिकाणी अशा हाय एफ.एस.आय चे प्रोजेक्ट झालेले आहेत ह्याचा अर्थ सगळेच वाईट आहेत असे नाही त्यामध्ये जे मध्यम काम करणारे कारागीर आहेत. त्याठिकाणी राहतात अकुशल मजुर आहेत, कुशल मजूर आहेत ते त्या ठिकाणी राहतात. आणि इनडायरेक्टली ते सोसायटीला सर्व करतात. समजा आपला एखादा कर्मचारी आहे तो इन अ सिटीत राहतो आणि एखादा सिटीच्या बाहेर राहतो तर त्याची ही गैरसोय आहे. ती कमी होते याचा उद्देश एकच आहे. त्याचा डायरेक्ट मोजमाप केले तर ज्या ठिकाणी ही योजना होते त्याठिकाणी गैरसोय आहे. पण लार्ज स्केल मला असे म्हणता येत नाही की सगळ वाईट आहे. तर काही गोष्टी ते पॉझिटिव्ह निगेटीव्ह ह्या बाबी आहेत आणि त्या माध्यमातून जे बांधकाम होतं शहरामध्ये जास्तीच त्यामध्ये आपल्याला विकास कर भेटतो, विशेषतः जास्तीचे चटई क्षेत्रामुळे लोकांना जास्तीच हाऊसेस उपलब्ध होतात. हा त्याच्यामध्ये उद्देश आहे. आणि एम.एम.आर.डी.ए च्या माध्यमातून आपण जे काही हायर एफ.एस.आय. प्रोजेक्ट आता येतो त्याच्यामध्ये महापालिकेला सुध्दा शेअर भेटतो. तर मला वाटते की आणि हे काही सगळीकडे सारखं होत नाही. सर्व विकासक आज पंतप्रधान आवास योजनांमध्ये खूप मोठ्या सवलती आहेत. पण त्याचा जर रेशिओ काढला तर आपल्या शहरात प्रोजेक्ट मिळत नाही. मी बऱ्याच विकासकाच्या मागे लागलेलो आहे की ह्याप्रकारचे योजना आपण कराव्यात. जेणेकरुन गरिबांना घर होतील तर मला वाटते की त्या लोकॅलिटी बेस विषय सोडला मी निश्चित आपलं मानतो. विकास खरतर मोठ्या प्रमाणात त्यामध्ये महापालिकेला बेनिफिट भेटतो.

**अनिल सावंत :-**

महापालिकेला बेनीफीट होतो, विकास कर मिळतो सर्व ठिक आहे. म्हाडा पण आपल्या जागेवर बरोबर आहे. पण ज्याठिकाणी हे कॉम्पलेक्स उभे राहिले आहेत तिथला इन्फ्रास्ट्रक्चरचे काय? आज त्या एरियातली परिस्थिती बघा. आता आपण जे सांगितले झाले. कारागीर वगैरे त्याठिकाणी राहतात. जर म्हाडामध्ये कोणी कोणी घर घेतली आहेत तो दुसरा संशोधनाचा विषय आहे. आज त्याठिकाणची परिस्थिती बघा ना हा सर्व लोड ह्या शहरावर येतो. महापालिकेवर येतो मग त्याठिकाणी ज्यावेळी आपण एक्स्ट्रा एफ.एस.आय. देता मोठमोठे टॉवर्स त्याठिकाणी उभे राहतात. त्या प्राथमिक सोयीसुविधा त्या ठिकाणी नकोत का? आज त्याठिकाणी रस्त्याची परिस्थिती बघा. तिथे किती अडचणीचा मार्ग झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला आश्वासित करतो आपल्या सोबत एक जॉईंट सर्व्हे आपण करु. त्यामध्ये संबंधित नीड फुड विभागाचे विभागप्रमुख आपण घेऊ आणि त्याठिकाणी अजून आपल्याला काही चांगलं करता येईल निश्चित आपला त्यामध्ये आपण करु.

**अनिल सावंत :-**

महाराष्ट्र सरकारच मुंबईच म्हाडा आपण ह्याठिकाणी आणतो. आपल्याला मला वाटते ते ५ एम.एल.डी. पाणी देणार होते. मुंबई महानगरपालिका ते दिले का? त्यासाठी पैसे पण खर्च केले आपण म्हणजे त्या लोकांनी काही द्यायचं नाही. किती वर्ष प्रलंबित आहे आणि आज ह्या वस्ती झाल्यामुळे साहेब आजूबाजूच्या एरियाला पाण्याचा केवढा मोठा प्रश्न आहे.

**मा. आयुक्त :-**

हा प्रलंबित विषय ५ एम.एल.डी. पाणी फायनल करुन येईल मुंबई महापालिकेकडून.

**अनिल सावंत :-**

तुम्ही ह्या आजूबाजूचं ठिक आहे. ह्या गरिबांना घरं मिळतात. राहू ह्या गरिबांच्या घरात पण इन्फ्रास्ट्रक्चर.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब तुम्ही ५ एम.एल.डी. पाणीचे बोलतात ते त्याची अजून ही वेगळी परिस्थिती आहे. मी त्याला वेगळ्या विषयात नेत नाही आता. पण आपले ज्या पाण्यावर पूर्ण भाईंदर शहर वसलं, गावासाठी मिळणारे मुंबई महापालिकेचं पाच एम.एल.डी पाणी रोड वाईंडींगच्यावेळी जे आपलं बंद झालं ते आजपर्यंत चालू झालेलं नाही. हा एक महत्वाचा विषय आहे. त्याच्यात तुम्ही लक्ष घाला ते पाणी पाच एम.एल.डी. पाणी मुंबई महापालिकेचं ज्याच्यासाठी आपण एक कोटी दहा लाख रुपये नंतर खर्च केला तो हे करण्यासाठी. बंद व्हायला सात आठ वर्ष झाले साहेब. आपलं हक्काचं ५ एम.एल.डी. पाणी जे चालू होतं वर्षानुवर्षे ते लोक पीत होते. मोर्वा पासून ते घोडबंदरपर्यंत ग्रामपंचायतपासून असलेलं पाणी बंद झालेलं आहे. हा एक भाग आणि म्हाडाची एवढी मोठी वसाहत येत नाही. म्हणून माझ्यासाठी वेगळ पाणी सॅक्शन करुन दिलं हा दुसरा भाग. म्हणजे १० एम.एल.डी. पाणी मुंबई महानगरपालिकेकडून आपल्याला मिळाल पाहिजे असा विषय चालवा. ज्या ठिकाणी आमची मदत लागेल त्याठिकाणी आमची मदत घ्या.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी खूप चांगला महापालिकेचा जिव्हाळ्याचा प्रश्न ह्या ठिकाणी मांडलेला आहे की मुंबई महापालिकेकडून पुर्ववत चालू असलेला ५ एम.एल.डी. पाणी आणि राज्य शासनाकडून जे म्हाडाची वसाहत आपल्या शहरात झाल्यामुळे जे आपल्यावर बोझा होतो त्यांच्यासाठी जे मंजूर पाच एम.एल.डी. पाणी असा १० एम.एल.डी. पाण्याचा जो तफावत आहे. ते राज्य शासनाच्या माध्यमातून मुंबई महापालिका असेल आणि कोणती यंत्रणा असेल. त्यांच्याशी ह्या विषयाला चालना देऊन आपले हक्क घेण्यासाठी आम्ही निश्चित प्रयत्न करु. त्यामध्ये आपली उपस्थिती सुध्दा आम्ही समावेश करु.

**अनिल सावंत :-**

साहेब मुंबई सारख्या सर्व फॅसिलिटी राज्यशासन सांगते की मिरा भाईंदरमध्ये द्या. म्हाडा आणा, एम.एम.आर.डी.ए आणा व मुंबईकराला जसा टोल टॅक्स फ्री आहे तसा मिरा भाईंदरसाठी करा. मिरा भाईंदर पण जवळ आहे. मुंबईसारख्या सर्व फॅसिलिटी आपण त्यांना इथे देतो. राज्य शासनाने सांगितल्याप्रमाणे मिरा भाईंदर शहराला तो पण ॲडव्हान्टेज मिळाला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मुंबईवासियांना टोल टॅक्स फ्री आहे का ते पहिले तपासून घ्यावे लागेल. हा विषय आपल्याला लिमीटेशनच्या बाहेरचा आहे. आपली मागणी शासनाकडे रेफर केली जाईल.

**गिता जैन :-**

साहेब फक्त एक विचारते वाकोडे साहेबांना बोलवून विचारा. शेवटचा पत्रव्यवहार कधी केला होता. जोपर्यंत आपल्याकडून होत नाही तोपर्यंत तो विषय मार्गी लागणार नाही.

**मा. आयुक्त :-**

तेच मी हाऊसला सांगितल की त्यामध्ये आपली उपस्थिती सुध्दा घेतली जाईल. जॉईंटली डेलिगेशन करण्याची वेळ आली तर सर्वपक्षीय डेलीगेशन आपण घेऊन जावू आणि हा मार्ग तडीस लावण्याचा प्रयत्न करु.

**राजेंद्र जैन :-**

यह बराबर है। जॉईंड डेलिगेशन इसमें एक पॉईंट और लेना हम जो गरिब लोगो के लिए सस्ते घर के लिए हम एफ.एस.आय हाय गाईस करते है। उसके उपर जो सस्ता दिखता है हमको उसकी अंदर सिटी पे लोड, रोड व्हाईस पानी व्हाइज सफाई का जो लोड ज्यादा है यहाँ एफ.एस.आय. ज्यादा है। यह कन्क्लुजन कमिटी की अंदर एक पॉईंट होना चाहिए।

**जुबेर इनामदार :-**

साहेब माझ्या माहितीनुसार ह्या विषयावर मुंबई महानगरपालिका गटनेत्यांची बैठक लागली होती. कॉंग्रेसचे गटनेते नलावडे त्यांच्याबरोबर चर्चा ही झाली होती. ह्या विषयावर आणि ५ एम.एल.डी. एवजी दीड एम.एल.डी त्या गटनेत्यांच्या मिटींगमध्ये त्यांनी ती मंजूरी दिलेली आहे. फक्त पाठपुरावा पालिकेच्या माध्यमातून झालेला नाही तो झाला पाहिजे. झाला तर दीड एम.एल.डी. जे काही पाणी मिळेल.

**रोहिदास पाटील :-**

ह्या विषयी त्यांना जेवढ माहिती आहे तेवढं त्यांनी मांडलेला आहे. आपण तपासून घ्यायचं. कागदाज सिरियल जशी तुम्हाला पेपर हवे आहेत सगळे पेपर माझ्याकडे आहेत. झालेल्या बैठका आहेत, त्यांची रिपोर्ट आहेत, त्यांची मान्यता आहे. आपण केलेले पेमेन्ट त्याचे पेमेन्टच्या तारखा आहेत. आपण एक कोटी दहा लाख रुपयेच पेमेन्ट केले साहेब. त्यांनी वेगवेगळ्या पध्दतीने ते पेमेन्ट मागितले.

ह्याच्यासाठी पैसे भरा त्याच्यासाठी पैसे भरा आणि नंतर जे मला जेवढ आठवतं तेवढं त्यांची जुनी वसुली ज्या ठिकाणी त्याठिकाणी त्यांनी आपल्या हद्दीमध्ये ज्या लोकांना पाणी दिलं होत कनेक्शन. त्यांचे पैसे भरले नाही ह्या मुद्दयांवरती राहिलं नंतर आमच्याकडून येईल. ऑल ऑफ प्लॅन झाला सांगितला पण तो विषय राहिला गेला. आपण ह्याच्यात लक्ष घाला.

**मा. आयुक्त :-**

मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की हा प्रलंबित प्रश्न आपण थोड्या काळात निकाली काढू की अजून त्यामध्ये आपल्या महापालिकेचा जास्तीचा बेनिफिट होईल अस करु.

**अनिल सावंत :-**

साहेब पॉझिटिव्हली करा. ह्या प्रश्नामध्ये मी एक विचारलं होतं त्यांनी परस्पर दिला आहे. महापालिका हद्दीत कोणत्या संकुलाला म्हाडा योजनेअंतर्गत परवानगी देण्यात आलेली आहे. त्याचे उत्तर प्रश्नामध्ये त्यांनी दिले नाही.

**मा. आयुक्त :-**

त्याची स्पेशल यादी आपल्याला दिली जाईल आणि त्याची कॉपी सर्व सभागृहाला दिली जाईल.

**नगरसचिव :-**

पुढचा प्रश्न आहे प्रश्न क्र. ११ श्री. अनिल सावंत यानी विचारलेला आहे महानगरपालिका क्षेत्रातील किती शाळांना मालमत्ता करात सवलत देण्यात येते.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, ह्या अनुषंगांने सचिव साहेब ह्या प्रश्नामध्ये काहीतरी गलत केलं तुम्ही एम.एम.आर.डी.ए. च्या सुध्दा त्याच अनुषंगाने वेगळा प्रश्न होता. त्या दोघांमध्ये क्लबींग झला आहे. दोन प्रश्न होते एक म्हाडा, एक एम.एम.आर.डी.ए. एम.एम.आर.डी.ए. चा प्रश्न नाही आहे. त्याच्यामध्ये तो तुम्ही स्कीप केला का? दोन्ही कम्बाईन आहेत त्या अनुषंगाने करा आणि कशी कंट्रोलमध्ये राहील. कारण जो विकासकर आपल्याला मिळतो त्याचा दहा पट पैसे विकासक प्रोव्हाईड करायला जातात म्हणजे ज्यांना आपण घर देतो ते सुध्दा सुखाने राहू शकत नाही. आणि जे आजुबाजूला आहेत ते सुध्दा सुखाने राहू शकत नाही. त्यामध्ये दोघांचेही नुकसान आहे.

**मा. आयुक्त :-**

एम.एम.आर.डी.ए. च्या बाबतीत तर आपल्याला फायदा आहे त्यामध्ये नुकसान म्हणता येणार नाही. त्यामध्ये फ्री फेनामेन आपल्या मोठया प्रमाणात ५० टक्के भेटतात.

**अनिल सावंत :-**

ते किती देतात?

**मा. आयुक्त :-**

एम.एम.आर.डी.ए. ला जे भेटतात त्याच्यात ५० टक्के आपल्याला देतात.

**अनिल सावंत :-**

आपण एम.एम.आर.डी.ए. ला किती एफ.एस.आय. देतो २.५ की ४ एफ.एस.आय.

**मा. आयुक्त :-**

काही ठिकाणी दोन आता तीन झालेले आहे.

**अनिल सावंत :-**

तीन एफ.एस.आय. मध्ये आपल्याला किती मिळतो २५ टक्के.

**मा. आयुक्त :-**

एम.एम.आर.डी.ए. ला पूर्वी अधिकार होते. आता ते अधिकार आपल्याला आलेले आहेत. आता एम.एम.आर.डी.ए. कडे जाण्याची सुध्दा गरज नाही. त्याचे सॅंक्शनसुध्दा आपल्यालाच अधिकार आलेले आहेत. एक्सपोर्ट शासनाने निर्णय घेतलेला आहे. तर त्यामध्ये महापालिकेचा जास्तीचा फायदा होईल असाच आपण पाहिलं जाईल. आणि जी म्हाडासोबत चर्चा झाली एम.एम.आर.डी.ए. च्या बाबतीत ही जी माहिती अपेक्षित आहे ती दिली जाईल. त्याची कॉपी सभागृहाला दिली जाईल.

**मा. महापौर :-**

नेक्स्ट प्रश्न.

**नगरसचिव :-**

पुढचा प्रश्न टॅक्स संदर्भात आहे. मालमत्ता दरा संदर्भात.

**अनिल सावंत :-**

साहेब एक येतात ओ.पी.डी. म्हणून आपण मिरा भाईंदर क्षेत्रातील शाळांना विशेष सवलत देतो. मालमत्ता करामध्ये आज जवळ जवळ २० शाळांना ह्या मालमत्ता करामध्ये सवलत दिली जाते. आणि त्या बदल्यात ह्या शाळांनी................

**नगरसचिव :-**

सावंत साहेब प्रश्नोत्तरांची वेळ संपलेली आहे. आपण हा प्रश्न पुढच्या मिटींग मध्ये घेऊ. ३० मिनिट पुर्ण झाली. आजच्या सभेकरिता एक लक्षवेधी प्राप्त झालेली आहे. लक्षवेधी दिलेली आहे. नयनाताई गजानन म्हात्रे यांनी भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणेबाबत. ती मी मा. महोदय महापौरकडे सुपुर्त करतो.

**मा. महापौर :-**

नयनाताई तुमचा थोडक्यात विषय घ्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलते, मा. आयुक्त साहेब, २००२ पासुन मी बघते की, आपण कुत्र्यांचे ऑपरेशन करतो. जनावरांचा विषय केवढा गंभीर आहे. २००२ पासुन बघते कुत्र्यांचे ऑपरेशन करतात, तरी सुध्दा आता देखील कुत्र्यांना पिल्ल होतात. मग आपले पानपट्टे साहेब काय करतात. महापौर मॅडम आपण आता देखील आमच्या गल्लीमध्ये तीन कुत्र्यांना पिल्ले झालेली आहेत आणि आता त्यांची कुत्री साधारण मोठी झालेली आहेत. त्यांची पिल्ले तर मी आपल्या पानपट्टे साहेबांना सांगितले. तिकडचा जो चार्ज त्यांना दिलेला आहे. टोपले म्हणून त्यांना सांगितले की ह्या कुत्र्यांना घेऊन जा नाही तर त्यांचे ऑपरेशन करून लवकरात लवकर परत आमच्या एरियामध्ये सोडा. तर मला त्यांनी असं उत्तर दिलं त्या टोपलेंनी की, आमच्याकडे पैशाची तरतूद नाही. तर आम्ही त्याच्यामुळे त्यांना उचलू शकत नाही. आता आयुक्त साहेब तुम्ही सांगा आपण कुत्र्यांचीच कुत्र्यांसाठी तरतूद जरी आपण केली तरी फक्त ऑपरेशन करून त्यांना सोडायचं का? आपण ज्या वेळेला कुत्र्यांना उचलून त्या दवाखान्यामध्ये घेवून जातो. त्यावेळेस आमच्या गल्लीतले कुत्रे मी माझ्या हाताने कुत्र्यांना साफसुत्रे करते. माझ्या गल्लीमध्ये १६-१७ कुत्रे आहेत. त्यांच्या एकाच्याही अंगावर गोचंडी मिळणार नाही. मी हफत्यातुन सगळयांना आंघोळ करून टाकते. मात्र तिकडे ऑपरेशनला नेल्या नंतर कुत्रे एकदम असे असतात की गोचंडीने की हिसाबाच्या बाहेर. मग आपण ऐवढी पैशाची तरतूद करतो. त्यावेळेला मग औषध फवारणी का करत नाही. एवढा कसा काय घाणेरडा करून ठेवलेला आहे. मा. आयुक्त साहेब ह्यांच्यावर आपण गंभीर विचार केला पाहिजे. आता ज्यांचा प्रायव्हेट कुत्रा आहे. त्यांचा जो मालक आहे. त्यांना एक इंजेक्शन देतो वर्षाला मग आपण का कुत्र्यांना इंजेक्शन देऊ नये. आपल्यांकडे आपण पैशाची एवढी तरतुद तर करतोच. मग कुत्र्यांना आपण इंजेक्शन का देवू नये? मा. आयुक्त साहेब, त्यादिवशी पानपट्टे साहेबांना मी एक असा विषय सांगितला की कुत्र्यांची जी पिल्ले होतात. त्याविषयी मला तिकडे बोलवल्यानंतर त्या डॉक्टरांनी माझ्या कडून हजार रूपये घेतले मी त्यांना हजार रूपये रोख देऊन पण टाकले. मग आपण त्यांना आपल्याकडे घेवून फायदा काय? याचा अर्थ काय? एका कुत्र्याची तब्येत खराब होती मी टोपलेला सांगितले त्याला उचलून घेवून जा. त्याच्यावर काही तरी उपचार करा. त्यांनी मला पाच दिवसांनी फोन करून सांगितले की कुत्रा कसा आहे. त्यावेळेला तो कुत्रा मेलेला. म्हणजे हे किती दिवस सहन करायचा एवढे ऊंदिर फिरतात त्या दिवशी पानपट्टे साहेबांना सांगितलं की, तुम्ही औषध मारा काही तरी करा करा एम.पी.डब्लू. वाले सरळ बोलले हे काम आमचं नाही. आरोग्याचे एस.आय. बोलले की हे काम आमचं नाही. आमच्याकडे ह्या आम्ही ही मारतो ते औषध. कोणी काम तर केलं पाहिजे त्याच्यावर साहेब आमच्या समोर डूक्कर ऐवढी फिरतात की हिसाबाच्या बाहेर, एक एक डुक्करीनीला जवळ जवळ १०-१०,१२-१२ अशी मुलं होतात. मला वाटतं माणसांपेक्षा संख्या त्यांचीच जास्त ह्या शहरात ऐवढी डुक्कर आहेत. मग आपले अधिकारी त्याच्यावर काम करतात. काहीच करीत नाही. फक्त आम्ही ऐवढेच सांगितले हया कुत्र्यांना उचला तर पैशाची तरतूद नाही. मा. आयुक्त साहेब, आजच्या आज त्या पैशांची तरतूद झाली पाहिजे. आणि माझ्या गल्लीमध्ये दोन-चार कुत्रे आहेत त्यांचे ऑपरेशन झाले पाहिजे नाही तर मात्र त्यांना परत दिवस जातील तसं होता कामा नये.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांनी मुक्या प्राण्याचा आणि जे सार्वजनिक आहेत रस्त्यावर ज्याचे कोणी मालक नाही. अशा मुक्या प्राण्याचा मुद्दा ह्या ठिकाणी मांडलेला आहे. पण गेल्या दोन-तीन वर्षांत फक्त वीस लाखाची तरतूद ह्या मध्ये करतो. आणि शहरामध्ये कुत्र्याची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. आणि ती रक्कम आपली संपत आहे. आणि पुढचं काम आपल्याला गैरसोयीच होतय. ह्यासाठी सोशल

ऑर्गनायझेशनचे जे सदस्य आहेत त्यांची उपआयुक्त पानपट्टे आणि मागच्या महिन्यात डिटेल बैठक घेतली. काही काही ठिकाणी स्वयंसेवी संस्था ह्याच्यामध्ये काम करतात, तर आपल्या शहरामध्ये स्वयंसेवी संस्थाना ह्याच्यामध्ये सहभागी केलेला नाही. आम्ही त्या दृष्टीने प्रयत्न करतोय, वैयक्तिक रित्या मोठ्या प्रमाणावर लोक चॅरिटी करतात. नयनाताईने सांगितल की, मी स्वतः त्यांना आंघोळ घालते. त्यांना पर्सनल दुखापत झाली तर खाजगी डॉक्टर कडनं त्यांना पैसे देऊन केअर करते. अशा प्रमाणात काम करणारे शहरामध्ये खूप मोठी फॅमिली आहे. याचे कुठे तरी संघटन होणं आवश्यक आहे. आणि काही लोक चॅरीटी म्हणुन ह्याच्यात पैसे टाकायलाही तयार आहेत. तर हा थोडा निगलेक्टेड राहिलेला विषय आहे. माझी अपेक्षा आहे की एक स्पेशलाइज पेट-ॲनिमलचा हॉस्पीटल ह्या शहरात व्हावं. त्याच्यसाठी एक चांगली एन.जी.ओ. म्हणून सर्च करतो. मुंबई बेसची किंवा आपल्या शहरातील कोणी होतकरू समोर आले तर आम्ही त्याच्या सहभाग घेवू आणि नयना म्हात्रे मॅडमने ह्या ठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे प्रशासन त्याचे गंभीरतेने दखल घेवून मा. महापौर आणि पदाधिकारी यांच्या माध्यमातून स्थायी समितीच्या माध्यमातून ती निधी उपलब्ध केली जाईल. आणि ह्याच्यात चांगलं काम केलं जाईल. त्यामध्ये आपला सहभाग घेतला जाईल.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, उपमहापौर साहेब, आज प्रर्दुभाव उंदिर मामाचा फार मोठया प्रमाणात आहे.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, भाईंदर पुर्वेला बिल्डिंग पोखरल्या आहेत. तुम्हाला मी फोटो देतो. त्याच्यावर तुम्ही काही करणार की नाही. उपमहापौर साहेब, महापौरच लक्ष नसेल तर तुम्ही लक्ष द्या. एखादी संस्था शोधा आणि उंदिर मामावरती उपाय करा, कारण आजपर्यंत शेकडो बिल्डिंग पोखरलेली आहेत. हजारो गाळ्यांचं नुकसान होत रोजचं. महत्वाचा विषय आहे. मग ऐवढा गांभीर्यानं तुम्ही का नाही घेत. मा. महापौर मॅडम या विषयावर विचार करावं लागतो.

**मा. महापौर :-**

नक्कीच घेतोय आणि सर्व माहिती मा. आयुक्त साहेबांनी दिलेली आहे. ठीक आहे. नक्कीच आपण करू.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेकरीता दोन 'के' खाली दोन विषय आलेले आहेत. पहिला विषय आहे. घोडबंदर येथील ६० मीटर रूंद विकास योजना रस्त्यापासुन किल्ल्यापर्यंत जाण्यासाठी २४ मीटर रूंदीचा रस्ता महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७(१) अन्वये मंजूर विकास योजना आराखडयात दर्शन फेरबदल्यात मान्यता देण्याबाबत. दुसरा विषय आहे. महापौर चषक २०१८-१९ चे आयोजन करण्याबाबत. दोन्ही विषय दोन के खाली प्रशासनाकडुन आलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

दुस-या विषयाचा आम्हाला गोषवार आलेला नाही.

**नगरसचिव :-**

अजुन कोणालाच दिलेले नाहीत गोषवारे सभागृहाची मान्यता घेवून देतो आपण.

**मा. आयुक्त :-**

महापौर चषकचं सुध्दा सर्वांना झेरॉक्स करुन द्या.

**नगरसचिव :-**

महापौर चषक २०१८-१९ चं नियोजन करण्याबाबत ह्याला सभागृहाची मान्यता आहे. असं समजून हे विषय, विषय पटलावरील सर्व विषय संपल्यानंतर शेवटी घेण्यात येईल.

**मा. आयुक्त :-**

एक विषयामध्ये सचिव आपल्याला सुधारणा सांगितली होती ते सांगा.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, महापौर चषक कार्यक्रमाला मान्यता आहे. आमची मान्यता नाही असे नाही. आमची सर्वांची आहे, पण ह्याच्यापूर्वीचा अनुभव असा आहे. गेल्या वर्षभराचा जे जे महापालिके तर्फे कार्यक्रम केले जातात ते फक्त बी.जी.पी. चे कार्यक्रम असेच होतात. इतरांना त्याठिकाणी विश्वासात वगैरे घेतले जात नाही. बी.जी.पी. चे बॅनर लागणार. बी.जी.पी. करणार कार्यक्रम पैसे महापालिकेचे. मी महापौर चषकबाबत बोलतोय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर चषकाची मिटींग होती त्यावेळेला सन्मा. गटनेते उपस्थित होते. विरोधी पक्षनेते पण होते ना? आपण चर्चा केली ना? आपण सगळयांना विश्वासात घेऊनच चर्चा केली.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

यह साल सभी को विश्वास में लेकेही होगा।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७३, **दि. १८/०७/२०१८ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे**.

**मर्लिन डिसा :-**

मा. महापौर मॅडम, लास्ट टाईम मी पण सजेशन दिलं होत. अनिल सावंत साहेबांनी पण दिलं होत. की हे प्रिप्रिटींग करून घ्यायला पाहिजे. जे पण मिनीट आपण येथे इतिवृत्तांत येतं. आमच्या कडे ते टाईप झाल्यानंतर प्रिप्रिटींग करायला पाहिजे. आता जे मी बोललेली इकडे कुठे फुलस्टॉप, कुठे कॉमा, काय आहे जर काही त्रास होत असेल तर मला फोन करुन विचारलं नाही तर मला बोलवलं तर तिथेच करेक्शन करून देईल. हे झाल्यानंतर हे इथे वाचतांना कसं तरी वाटतं.

**मा. महापौर :-**

ह्याची नोंद घेण्यात यावी.

**रोहिदास पाटील :-**

दि. १८/०७/२०१८ रोजींच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ७३ :-**

**दि. १८/०७/२०१८ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे**.

**ठराव क्र. ७५ :-**

दि. १८/०७/२०१८ रोजींच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७४, **महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**प्रभात पाटील :-**

**प्रस्तावना :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व आस्थायी अधिकारी **/**कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात येते यावर्षी ही मीरा भाईंदर कामगार सेना**,** श्रमिक जनरल कामगार संघटना **व झुंज जनरल कामगार युनियन** यांचेकडुन सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे**.**

दि**.31/10/2002** रोजी मा . मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगारपालिका आयुक्त यांचे समावेत झालेल्या बैठकीमध्ये**,** महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन**,** सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा . अशा प्रकारचा निर्णय झाला होता . त्यानुसार पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे . आणि

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी /कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा . महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-2017 मध्ये महानगरपालिका मा. महासभा दि.16/10/2017, ठराव क्र.05 अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे :-

महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता

| अ.क्र. | **कर्मचाऱ्यांचा** तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन 2017-18 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-1 ते वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1545 | 20,000/- | 30101666 |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 72 | 15,400/- | 1063883 |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 05 | 8,800/- | 44000 |
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ , आय.सी.टी.सी. व क्षयरोग कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 71 | 8,250/- | 585750 |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 117 | 8,800/- | 816570 |
| 6. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी | 05 | 5,500/- | 27500 |
| 7. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 33 | 12,650/- | 301491 |
| 8. | भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | 13 | 12,650/- | 149325 |
| 9. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 03 | 8,800/- | 26400 |
| 10. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 7,600/- | 38000 |
| 11. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 30 | 8,250/- | 238563 |
| 12. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 06 | 13,200/- | 79200 |
| 13. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 8,800/- | 17600 |
| 14. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 5,500/- | 33000 |
| | एकुण | 1913 | | 33522948 |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | **कर्मचाऱ्यांचा** तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2017-18 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| **1.** | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | **188** | **17,600/-** | **3289734** |
| **2.** | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | **18** | **15,400/-** | **246400** |
| | एकुण | **206** | | **3536134** |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान एकूण रु. **3,01,01,666/-** तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदानापोटी एकूण रु.**32,89,734/-** इतका खर्च करण्यात आलेला आहे.

सन **2018-19** या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिकेच्या संघटनांनी पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **1.** | श्रमिक जनरल कामगार संघटना मिरा भाईंदर महानगरपालिका कामगार युनिट | स्थायी अधिकारी/कर्मचारी वर्गास | **23,500/-** |
| **2.** | मीरा भाईंदर महापालिका कामगार सेना | स्थायी अधिकारी/कर्मचारी वर्गास | **25,000/-** |
| | | संगणक चालक | **20,000/-** |
| **3.** | **झुंज जनरल कामगार युनियन** | स्थायी अधिकारी/कर्मचारी वर्गास | **25,000/-** |

महानगरपालिका आस्थापनेवर दि **.31/03/2018** पर्यंत कार्यरत असलेले अधिकारी , कर्मचारी व शिक्षक वर्ग यांना मागील सन **-2017** मध्ये मंजूर झालेल्या अनुदान रक्कमे प्रमाणे यावर्षी अनुदान प्रदान केल्यास होणारा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>

| अ.क्र. | **कर्मचाऱ्यांचा** तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन 2017-18 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| **1.** | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी , वर्ग-**1** ते वर्ग **-4** संवर्गातील कर्मचारी वर्ग | **1518** | **20,000/-** | **30360000** |
| **2.** | संगणक चालक/लघुलेखक | **69** | **15,400/-** | **1062600** |
| **3.** | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **05** | **8,800/-** | **44000** |
| **4.** | कुष्ठरोग तंत्रज्ञ , आय.सी.टी.सी. व आय.एन.टी.सी.पी. कर्मचारी, | **118** | **8,250/-** | **973500** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आर.बी.एस.के./आहारतज्ञ पथक , राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | | | |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 120 | 8,800/- | 1056000 |
| 6. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचार (ठोक मानधनावरील कर्मचारी | 05 | 5,500/- | 27500 |
| 7. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 42 | 12,650/- | 531300 |
| 8. | भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | | | |
| 9. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 03 | 8,800/- | 26400 |
| 10. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 7,600/- | 38000 |
| 11. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 43 | 8,250/- | 354750 |
| 12. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 8,800/- | 17600 |
| 13. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 5,500/- | 33000 |
| एकुण | | 1936 | | 34524650 |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | **कर्मचाऱ्यांचा** तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2017-18 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 183 | 17,600/- | 3220800 |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 20 | 15,400/- | 308000 |
| | एकुण | 203 | | 3528800 |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रु.**3,03,60,000/-** (अक्षरी रुपये तीन कोटी तीन लाख साठ हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.**3.15** कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु . **32,20,800/-** (अक्षरी रु. बत्तीस लाख वीस हजार आठशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु.**35/-** लाख इतकी तरतुद आहे.

सबब मागील वर्षी मा . महासभेने मंजूर केल्याप्रमाणे सानुग्रह अनुदान यावर्षी सुध्दा देणेबाबत मंजूरी मिळणेसाठी, सदरचा विषय मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.

**ठराव क्र. :-**

**प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यातील तक्त्यामध्ये 5% वाढ करुन सानुग्रह अनुदान देण्यात यावे व अंदाजपत्रकाच्या तरतुदीपेक्षा रक्कम जास्त होत असल्यास त्याचे पुर्नविनीयोजन करावे.**

**तसेच अ.क्र.5 लिंक वर्कर** (ठोक मानधनावरील कर्मचारी) **यांना मागील वर्षी नजरचुकीने जादा सानुग्रह अनुदान देण्यात आले होते त्याऐवजी त्यांना 3300/- इतके अनुदान द्यावे. त्याचप्रमाणे अ.क्र.11 मध्ये बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी** (ठोक मानधनावरील कर्मचारी) **यांना देय पगारापेक्षा कमी सानुग्रह अनुदान देण्यात आले होते त्यामध्ये दुरुस्ती करून 13282/- इतके अनुदान देण्यास तसेच जे अधिकारी दोषी आहेत, निलंबित आहेत तसेच ज्यांची चौकशी सुरु आहे त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येऊ नये त्यांना वगळून सानुग्रह अनुदान देण्यास ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सिमा शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, प्रशासनाने ह्या ठिकाणी जे कर्मचारी दिलेले आहेत ते असे कुठचे कर्मचारी अजून शिल्लक राहिले आहेत. जे पालिकेसाठी सेवा देत आहेत. आरोग्य विभाग सफाई कामगार वगैरे आहेत का?

कॉन्ट्रक्टरचे नाही. मलेरिया वगैरेचे आले नाहीत. ते बघून घ्या. म्हणजे जे पालिकेसाठी डायरेक्ट पालिका ज्यांना पेमेन्ट करते. म्हणजे राज्यशासनाने पाठवलेले असतील.

**मा. आयुक्त :-**

सत्ताधाऱ्यांनी एकच ठराव मांडला की, जो आम्ही प्रस्तावीत केला त्याच्यात पाच टक्के ॲड करणे.

**अनिल सावंत :-**

आम्ही सात टक्के देतो. महागाई फार वाढली आहे. पेट्रोलचे दर बघा किती गेले आहेत ९०, डिजेल बघा, गॅसचे दर बघा.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आता तुम्हीच थोड्या वेळेआधी बोलतात की आर्थिक मंदी आहे. गेल्या चार वर्षापासुन, चार वर्षे कोणाची सत्ता आहे.

**मा. आयुक्त :-**

आर्थिक मंदी आहे, असे मी म्हटले नाही.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

साहेब, विषय असा आहे. ह्या विषयाला धरुन ठराव करुन, ठेकेवरती कर्मचारी आपल्याकडे कामाला लागली. आरोग्याचे विशेषतः सर. त्यांच्या ठेकेदारांना बोलावून त्यांना सांगा की दिवाळी वगैरे त्यांना बोनस दिला पाहिजे, कारण काही ही झालं तरी त्यांचे प्रिंसीपल एम्पलॉईज आहेत.

**मा. आयुक्त :-**

त्या बाबींची नोंद घेतली जाईल. एक प्रशासनाचा प्रमुख म्हणून मी सभागृहाला विनंती करतो. पाच टक्के सफिसेन्ट आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब सफाई कामगारांना कधीच त्यांचा बोनस दिला. आता कोणाचाच बाकी नाही. बोनस देऊन पंधरा दिवस झाले.

**अनिल सावंत :-**

सात परसेंट देऊन टाका. आम्ही ठराव मागे घेतो.

**मा. उपमहापौर :-**

आपल्या सुचना घेतलेल्या आहेत. ठराव मांडून तुम्ही काही दोन टक्क्याचे हे करणार आहात. जेवढी प्रोव्हीजन आहे तेवढी आपण दाखवलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावात नमुद केलेले आहे की, कमी पडले तर त्याचे पुर्नविनियोजन करण्यात यावे. सात टक्के मध्ये पण पुर्नविनियोजन होऊ शकते.

**मा. आयुक्त :-**

मला माहित आहे ह्या महापालिकेच्या नगरपरिषदेचा इतिहास आहे की, आपण सगळे कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आहात. आणि एक मताने राहावे. आणि आपण जर आपली वर्षी जास्तीची इनकम वाढवली तर पुढच्या वर्षी आपण त्यांच्यात चांगली सुधारणा करु.

**अनिल सावंत :-**

गोषवाऱ्याप्रमाणे प्रस्तावित १ ते १४, १,२, १ ते ३, १ ते १३, १,२ असे एकूण कर्मचाऱ्यांना प्रस्तावावित रक्कमेपेक्षा ६ टक्के वाढ करुन सानुग्रह अनुदान देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव, दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७४ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव आहे सुचक सौ. प्रभात पाटील. अनुमोदक सौ. सिमा शहा, दुसरा ठराव आहे. सुचक श्री अनिल सावंत अनुमोदक श्री. हरिचंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. श्री अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक सौ. प्रभात पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक सौ. प्रभात पाटील यांनी मांडलेला ठरावाच्या बाजुने ५७ विरोधात २८ तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत, प्रभात पाटील यांनी मांडालेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७४ :-**

**महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत**

**ठराव क्र. ७६ :-**

**प्रस्तावना :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व आस्थायी अधिकारी /कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात येते यावर्षी ही मीरा भाईंदर कामगार सेना, श्रमिक जनरल कामगार संघटना **व झुंज जनरल कामगार युनियन** यांचेकडुन सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे.

दि.**31/10/2002** रोजी मा . मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगारपालिका आयुक्त यांचे समावेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा . अशा प्रकारचा निर्णय झाला होता . त्यानुसार पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे . आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी /कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा . महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-**2017** मध्ये महानगरपालिका मा. महासभा दि.**16/10/2017**, ठराव क्र.**05** अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे. :-

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>

| अ.क्र. | **कर्मचाऱ्यांचा** तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन **2017-18** या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| **1.** | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-**1** ते वर्ग-**4** संवर्गातील कर्मचारी वर्ग | **1545** | **20,000/-** | **30101666** |
| **2.** | संगणक चालक/लघुलेखक | **72** | **15,400/-** | **1063883** |
| **3.** | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **05** | **8,800/-** | **44000** |
| **4.** | कुष्ठरोग तंत्रज्ञ , आय.सी.टी.सी. व क्षयरोग कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **71** | **8,250/-** | **585750** |
| **5.** | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **117** | **8,800/-** | **816570** |
| **6.** | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी | **05** | **5,500/-** | **27500** |
| **7.** | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **33** | **12,650/-** | **301491** |
| **8.** | भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | **13** | **12,650/-** | **149325** |
| **9.** | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | **03** | **8,800/-** | **26400** |
| **10.** | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | **05** | **7,600/-** | **38000** |
| **11.** | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **30** | **8,250/-** | **238563** |
| **12.** | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **06** | **13,200/-** | **79200** |
| **13.** | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | **02** | **8,800/-** | **17600** |
| **14.** | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | **06** | **5,500/-** | **33000** |
| | एकुण | **1913** | | **33522948** |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | **कर्मचाऱ्यांचा** तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन **2017-18** या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **1.** | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | **188** | **17,600/-** | **3289734** |
| **2.** | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | **18** | **15,400/-** | **246400** |
| | एकुण | **206** | | **3536134** |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान एकूण रु. **3,01,01,666/-** तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदानापोटी एकूण रु.**32,89,734/-** इतका खर्च करण्यात आलेला आहे.

सन **2018-19** या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिकेच्या संघटनांनी पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **1.** | श्रमिक जनरल कामगार संघटना मिरा भाईंदर महानगरपालिका कामगार युनिट | स्थायी अधिकारी/कर्मचारी वर्गास | **23,500/-** |
| **2.** | मीरा भाईंदर महापालिका कामगार सेना | स्थायी अधिकारी/कर्मचारी वर्गास | **25,000/-** |
| | | संगणक चालक | **20,000/-** |
| **3.** | **झुंज जनरल कामगार युनियन** | स्थायी अधिकारी/कर्मचारी वर्गास | **25,000/-** |

महानगरपालिका आस्थापनेवर दि .**31/03/2018** पर्यंत कार्यरत असलेले अधिकारी , कर्मचारी व शिक्षक वर्ग यांना मागील सन **-2017** मध्ये मंजूर झालेल्या अनुदान रक्कमे प्रमाणे यावर्षी अनुदान प्रदान केल्यास होणारा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>

| अ.क्र. | **कर्मचाऱ्यांचा** तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन **2017-18** या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| **1.** | महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी , वर्ग**-1** ते वर्ग **-4** संवर्गातील कर्मचारी वर्ग | **1518** | **20,000/-** | **30360000** |
| **2.** | संगणक चालक/लघुलेखक | **69** | **15,400/-** | **1062600** |
| **3.** | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **05** | **8,800/-** | **44000** |
| **4.** | कुष्ठरोग तंत्रज्ञ , आय.सी.टी.सी. व आय.एन.टी.सी.पी. कर्मचारी, आर.बी.एस.के./आहारतज्ञ पथक , राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **118** | **8,250/-** | **973500** |
| **5.** | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | **120** | **8,800/-** | **1056000** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचार (ठोक मानधनावरील कर्मचारी | 05 | 5,500/- | 27500 |
| 7. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 42 | 12,650/- | 531300 |
| 8. | भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | | | |
| 9. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 03 | 8,800/- | 26400 |
| 10. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 7,600/- | 38000 |
| 11. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 43 | 8,250/- | 354750 |
| 12. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 8,800/- | 17600 |
| 13. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 5,500/- | 33000 |
| एकुण | | 1936 | | 34524650 |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | **कर्मचाऱ्यांचा** तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2017-18 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 183 | 17,600/- | 3220800 |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 20 | 15,400/- | 308000 |
| | एकुण | 203 | | 3528800 |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रु.3,03,60,000/- (अक्षरी रुपये तीन कोटी तीन लाख साठ हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.3.15 कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु . 32,20,800/- (अक्षरी रु. बत्तीस लाख वीस हजार आठशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु.35/- लाख इतकी तरतुद आहे.

सबब मागील वर्षी मा . महासभेने मंजूर केल्याप्रमाणे सानुग्रह अनुदान यावर्षी सुध्दा देणेबाबत मंजूरी मिळणेसाठी, सदरचा विषय मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.

**ठराव क्र. :-**

**प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यातील तक्त्यामध्ये 5% वाढ करुन सानुग्रह अनुदान देण्यात यावे व अंदाजपत्रकाच्या तरतुदीपेक्षा रक्कम जास्त होत असल्यास त्याचे पुर्नविनीयोजन करावे.**

तसेच अ.क्र.5 लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी ) यांना मागील वर्षी नजरचुकीने जादा सानुग्रह अनुदान देण्यात आले होते त्याऐवजी त्यांना 3300/- इतके अनुदान द्यावे. त्याचप्रमाणे अ.क्र.11 मध्ये बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी ) यांना देय पगारापेक्षा कमी सानुग्रह अनुदान देण्यात आले होते त्यामध्ये दुरुस्ती करुन 13282/- इतके अनुदान देण्यास तसेच जे अधिकारी दोषी आहेत, निलंबित आहेत तसेच ज्यांची चौकशी सुरु आहे त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येऊ नये त्यांना वगळून सानुग्रह अनुदान देण्यास ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | निरंक |
| ६ | जैन गीता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | सिंह मदन उदितनारायण | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | भानुशाली वर्षा गिरधर | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | यादव मिरादेवी रामलाल | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | शाह रिटा सुभाष | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | गोहिल शानू जोरावर सिंह | १३ | पाटील अनिता जयवंत | |
| १४ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | भोईर सुनिता शशिकांत | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १६ | पाटील वंदना मंगेश | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | सोंस निला बर्नाड | १७ | पाटील धनेश परशुराम | |
| १८ | रावल मेघना दिपक | १८ | शेख रुबीना फिरोझ | |
| १९ | मोकाशी दिपाली आनंदराव | १९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २० | जैन सुनिता रमेश | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | अरोरा दीपिका पंकज | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | नाईक विविता विवेक | २२ | शेख अमजद गफार | |
| २३ | भावसार वंदना संजय | २३ | पाटील वंदना विकास | |
| २४ | बेलानी हेमा राजेश | २४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २५ | भोईर विणा सुर्यकांत | २५ | भोईर कमलेश यशवंत | |
| २६ | सोनार सुरेखा प्रकाश | २६ | अहमद साराह अकरम | |
| २७ | मुखर्जी अनिता बबलू | २७ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २८ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २८ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २९ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| ३० | म्हात्रे मोहन गोपाल | | | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३२ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| ३३ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३५ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३६ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३७ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३८ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३९ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ४० | परमार हेतल रतिलाल | | | |
| ४१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४२ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४३ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४४ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४५ | राय विजयकुमार सिस्थ्न नारायण | | | |
| ४६ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४७ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४८ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४९ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ५० | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ५१ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ५२ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५३ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ५४ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५५ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५६ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५७ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७५, **भाईंदर (प.) शिवसेना गल्ली येथील स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत**

रवि व्यास :-

भाईंदर (प) शिवसेना गल्ली येथिल स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत महानगरपालिकेची मुख्य जलवाहिनी १५ ते २० वर्ष जुनी असुन बऱ्याच इमारतींच्या खालून गेलेली आहे. तसेच सदर जलवाहिनी ७ ते ८ फुट खोलवर असून जीर्ण झालेली आहे. त्याकरीता दुरुस्तीचे काम करण्यास त्रासदायक होत आहे. सदर परिसरात जलवाहिनी टाकणे गरजेचे आहे. सदर कामास मा. विशेष महासभा दि.०२/०३/२०१७, ठराव क्र.१०६ अन्वये रु.१,१४,५३,९००/- इतक्या रकमेस मान्यता दिलेली होती. त्यानुसार सदर कामाची निविदा मागविण्यात आलेली होती. परंतु सदर निविदेस कमी प्रतिसाद तसेच जास्त दराची प्राप्त होत आहेत.

सदर कामाचे अंदाजपत्रक नव्याने सन २०१६-१७ च्या महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या दरसुचीनुसार सदर कामाची किंमत अंदाजित खर्च रक्कम रु.१,७७,९९,८९६/- इतकी आहे.

सदर कामी सुधारीत रु.१,७७,९९,८९६/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

**अशोक तिवारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, माझा ह्या विषयाला विरोध नाही. विषय पाण्याचा आहे म्हणून त्यावर चर्चा झाली. तर सध्या शहरात पाण्याची टंचाई जाणवते. काही करायची दुरूस्ती मुळे होत असेल. म्हणजे तांत्रिक अभियंता, कार्यकारी अभियंता जसे आम्हाला माहिती देत असतात. एम.आय.डी.सी. स्टेम हा प्रकार सगळा काही चालु असतो तो नेहमीच असतो. दोन-चार दिवस सतत १७५ एम.एल.डी. पाणी पुर्णपणे येतो म्हणून आम्हाला पाणी ठीक आहे. जे आहे ते. साहेब वस्तुस्थिती अशी आहे की, माध्यमामध्ये चार-आठ दिवस आधी बातमी आली होती की, मुंबई आणि उपनगर त्यांना बऱ्याच शहरांना पाणी कपात करणार आहेत कारण पाऊस कमी पडलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. ते नैसर्गिक आहे. ते कोणाच्या हातात नाही. महाराष्ट्रामध्ये बरेच काही जिल्ह्यांना दुष्काळ घोषीत करण्यासंदर्भातली चर्चा चालु आहे कॅबीनेटमध्ये अशा परिस्थितीमध्ये आपल्याला ही निर्णय घ्यावा लागेल ना साहेब? मी महत्वाचा विषय असा होता की २०१७ पर्यंत जेव्हा पाणी पुरवठा म्हणजे पाण्याची जल वाहीनी, नळ वाहीनी बंद केली होती. तोपर्यन्त शहराला आपण ३३८९२ कनेक्शन आपण दिले होते. वाणिज्य आणि रहिवास २०१७ नंतर मार्च किंवा एप्रिलमध्ये सुरूवात केली आपण परत पाण्याचे कनेक्शन देण्याची मी तुमच लक्ष वेधू इच्छितो कारण विषय महत्वाचा आहे. रोज तुम्हाला ह्या विषयावर फोन करणे योग्य नाही. साहेब २०१७ एप्रिलच्यानंतर मार्चला सुरूवात केली. परत नवीन कनेक्शन नळ जोडणी देण्याची तेव्हा पासुन आजपर्यंत १४-१५ महिन्यामध्ये ५८५० वाणिज्य आणि रहिवासी कनेक्शन आपण जोडलेले आहेत. साहेब परसेन्टेज बघा. त्याची वाढ किती पट्टीने झालेली आहे. झाला विषय असा आहे की, ही भूमिका चालु राहिली तर जी सध्याची परिस्थिती अजून आपल्याला सामोरे जाणं अडचणीचा विषय असणार आहे. ह्याच्यावरती निर्णय घेणे हे गरजेचे आहे. नाहीतर आहेत ती लोक रोज तुमच्यावरती साहेब मोर्चा असणारच. आमचा असणारच. आमची अडचण असेल, आम्हाला यावं लागेल, ह्याच्यावरती साहेब निर्णय घ्या. ठोस निर्णय घ्या. काय केलं पाहिजे. कुठे तरी ह्याला अंकुश लावायला पाहिजे, थांबवायला पाहिजे, स्थगिती दिली पाहिजे. जो पर्यंत पुढच्या पाण्याचा स्त्रोत तयार होत नाही किंवा आपल्याला पाणी मिळेल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदय, ह्या विषयाला जो ठराव मांडला त्याला त्यांची सहमती आहे. तथापि सन्मा. सदस्य, जुबेर इनामदारजी भविष्यातील पाणी टंचाई येणारी आणि सध्या चालू असलेले कनेक्शन ह्या बाबत मुद्दा मांडलेला आहे. तर मी आपल्याला खात्री देऊ इच्छितो पदाधिकारी आणि गटनेत्यांची एक आपण वेगळी बैठक घेऊ त्यामध्ये आणि ह्याच्यावर सविस्तर चर्चा केली जाईल. भविष्यामध्ये आपली कटोती होऊ नये म्हणून आम्ही संबंधित इंटरनलला लेखी माझ्या सहीने पत्र दिलेले आहे. ह्या वर्षी जो सोर्स बारवी धरण आहे तो १०० परसेन्ट भरलेला आहे. तरी पण त्या धरणाची जी मागणी आहे. दर वर्षापेक्षा २० टक्के वाढत असते. म्हणुन निश्चित कपात ह्या वर्षी पण राहणार आहे. ह्या वर सविस्तर चर्चा करून आपण निर्णय घेवू.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब पाण्याची गेल्या १५ ते २० दिवस एवढी भयंकर टंचाई त्यात सणासुदीचे दिवस आहेत, ४५ ते ५० तासांवर पाणीपुरवठा गेलेला आहे. शांती नगर, शितल नगर, नया नगर, पुर्ण आणि दोन तास फक्त पाणीपुरवठा येतो. लोकांनी ह्या शहरामध्ये चोवीस तास पाणी पुरवठ्याचे बॅनर बघितले. भरपूर पाणी आहे कुठे? मग आता कपातीचा विषय का येतोय. येणार मग कधी? त्या दृष्टीने काही प्रयत्न होणार आहेत की नाही?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मागच्या महिना दिड महिन्यातील इश्यू मांडला. मी आपल्याला प्रत्येकाकडे व्हॉटस ॲप आणि सोशल मिडीयावर त्या त्या दिवसाची परिस्थिती आम्ही अवगत करतो. आपल्या महानगरपालिकेचे नाही, आपल्या परिसराचा नाही पण दरवर्षी पीठासीन म्हणून जे स्टेमचे काम घेतले जाते. भिवंडीच्या ठिकाणी परवा आपण तिथे जाऊन पाहून आलात तर त्याठिकाणी मेजर मेन्टेन्स, फ्रिकॉस मेन्टेन्स होतात. त्याची गैरसोय आपल्याला झालेली आहे. त्याशिवाय मेजर फॉल्ट कुठेही नाही. भविष्यात टंचाई पिरियडमध्ये ती परिस्थिती येवू नये म्हणून ॲडव्हॉन्स दसऱ्याच्या पुर्वी ते काम करून घेतलं होतं. स्टेमच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या निगडीत नव्हते. इतर महापालिकेच्या निगडीत होता तो विषय. त्याची दुरूस्ती झालेली आहे. सर्व पदाधिकारी आणि गटनेते, प्रशासनाची सविस्तर माहिती घेतली जाईल आणि त्यावर एकमताने निर्णय घेतला जाईल.

**अनिल सावंत :-**

त्याचे असेसमेन्ट करा. जिथे साहेब गरज नाही तिथे पण कनेक्शन देऊन टाकले. ह्या पूर्वी सुध्दा त्या बिल्डिंगमध्ये पाणी पुरवठा होत होता.

**मा. आयुक्त :-**

ह्या विषयावर आपण सविस्तर चर्चा करून आपण निर्णय घेवू.

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते, साहेब गेल्या कित्येक दिवसांनी बघते १७० च्या खाली आपले पाणी जात नाही १७४, १७१, १६९ म्हणजे असं नाही आहे का? आपल्याला पाणी कमी येतोय. कुठे तरी आपले डिस्ट्रीब्युशनमध्ये किंवा काय प्रॉब्लेम आहे कारण पाणीचे कमी कुठेच झालेला नाही. रोजचं मॅसेच बघेल तर १७० चा एव्हरेज आहे. वाकोडे साहेब बोला तुम्ही. फक्त दोन दिवस सोडले १३६ आणि १३५ त्याशिवाय १७० च्या खाली नाही.

**सुरेश वाकोडे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. गणपती विसर्जनपर्यंत आपली जी सिस्टीम होती ती सर्व तुटली होती. गणपती विसर्जन ते नवरात्री सुरू होण्याच्या अगोदर.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही पाणी आपल्याकडे कमी येत नाही, पण आलेल्या पाण्यामध्ये वितरण विषयी काही इश्यु आहेत का? ते रेग्युलर होत नाही.

**सुरेश वाकोडे :-**

प्रॉब्लेम काय झाला होता ह्याच्यामध्ये ह्या १५ दिवसामध्ये तीन सेट डाऊन झाले. एम.आय.डी.सी. चे दोन सेट डाऊन झाले. स्टेमचा एक सेट डाऊन झाला परत एम.एस.ई.बी. ने त्यांचे ही काही काम करण्यासाठी तीन-तीन तास बंद असा त्यावेळी डिसटन्स झाला. आपल्या सिस्टीममध्ये दिवसाला फक्त १० मिनीटांची लाईट गेली नाही, तर एक दीड तासांनी वाढतो. त्यामुळे काय झाले होते की ही १५ दिवस हे डिसटर्ब होतं पण आता आम्ही ही सिस्टीम रेग्युलर आणलेली आहे. अगोदर जसे पाणी जात होते ज्या तासावर होते त्या तासावर आणलं. ह्या दोन गोष्टी आम्ही त्याच्या जवळ आलेलो आहोत.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विषय पाणी पुरवठयाचा आहे. मी सभागृहाच्या लक्षात आणु इच्छितो की, आयुक्त साहेब नीट लक्षात घ्या. आपल्याला येणार पाणी जे ठाणेहून येते त्याचे मीटर रिडींग जे होते ते आपल्या हद्दीत होते. आम्ही वर्षानुवर्ष आता प्रफुल्ल पाटील सभागृहात नाही. आम्ही भांडत होतो की, येणारे पाणी ठाणेवाले पितात. आम्हाला तर पाणी येतच नाही आणि त्यावेळी तस रिडींग तिकडे होत होते. लिकेजची पुर्ण जबाबदारी आपण त्यांच्यावर टाकत होतो, की तुम्ही पाणी सोडताहेत बरोबर पण आमच्या हद्दीत पोहोचत नाही. आताचा जो रिडींग आहे तो चेन्याच्या नदीवर आपण तिथे आपले मीटर रिडींग होते, तिथे आपले मोजणे होते की १७४ पर्यंत येते आणि १७४ येत असताना जेव्हा आपल्या डिपार्टमेन्ट कडुन अशी पूर्वी पेपरला बातमी दिली होती. २० टक्के लिकेज हे न पटणारं आहे. एक निकष आहे. आम्ही टेक्नीकल साईटची लोक आहोत. २४ तास ह्या कामी प्रेशरच्या कामामध्ये काम करणारे लोकं आहोत. आपल्या शहराचं जास्तीत जास्त लिकेज जर कुठे असेल तर ते ५ परसेन्ट असले पाहिजे. २० तर न पटणारचं आहे. म्हणजे एक तर बेजबाबदार उत्तर देत आहे. हे नसेल आणि ती परिस्थिती सत्य असेल तर त्याच्यावर ताबडतोब तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. हे सभागृह जसे पाईपलाईनला मंजुरी देते, दीड कोटीला त्या पैशालाही मंजुरी देणार नाही असे नाही. पण तुम्ही ते शोधणारच नाही आणि पाणी वाया जात आहे. ते वाया जाणारे पाण्याचे निवेदन करता आणि सभागृह शांतपणे ऐकूण घेतो. असे मा. आयुक्त साहेब परिस्थिती होता कामा नये. सभागृह तुम्हाला मान देते. खरोखर लिकेज कुठे असेल. मी मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो तुम्ही आमचे आहात, मेहनती आहात. तुम्ही एखादी गोष्टीचं मनाला लावून घेतलं तर पाठपुरावा करता हा विषय तुम्ही घ्या. आठवड्यामध्ये जसे पण युद्धपातळीवर प्रयत्न करतो. आमची मदत लागेल तर मदत घ्या. तुम्ही सक्षम असाल तर तुम्ही करा पण हे पुन्हा असे निवेदन होता कामा नये. किती ही पाणी टंचाई, नैसर्गिक पाणी टंचाई विषयी तिथून जरी पाणी पाटबंधारे खात्याने सांगितलं की आम्ही एक दिवसाआड पाणी देणार आठवड्यातून एक दिवस पाणी बंद करणार आपल्याजवळ उपाय नाही आपण विनंती करतो. आपल्याला मदत करतात ते लोक हे सत्य आहे. त्यांना धन्यवाद दिलेच पाहिजे. पण जर ते सर्वाचं नियम मोडून आपल्याला पाणी देत असतील आणि ते पाण्यांच वितरण आपण बरोबर करत नसेल तर आपल्या सारखा दुसरा दोषी कोणी नाही. आपण तेवढ सुधारायला पाहिजे अशी माझी विनंती आहे. मा. महापौर मॅडम ह्यामध्ये आपण लक्ष घालावं.

**मा. महापौर :-**

नक्कीच.

**प्रभात पाटील :-**

गळतीचा मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण गळतीमध्ये नेमकं किती पाणी जातं आणि कुठं जातं हे आपल्याला कळत नाही. सर मध्यंतरी स्टॅडींगमध्ये एक निर्णय झाला. कसं ते शहरामध्ये हे १५ फ्लॅटला एक कनेक्शन, म्हणजे १५ फॅमिलीला आपण एक कनेक्शन देतो. मध्यंतरी मला असं वाटतं की, ह्याच वर्षी काही तरी निर्णय झाला की आपण प्रत्येक घराला, स्लम एरिया असो किंवा गावामध्ये असो सगळ्यांना जे जास्तीत जास्त कर भरतात त्यांना १५ घरांना एक नळ कनेक्शन देतो. असे ही ह्या शहरामध्ये दोन न्याय आहे की, १५ घरांना एक कनेक्शन आणि एक घराला एक कनेक्शन आणि हे जर कुठे असे असमतोल असेल तर पाणी ह्यांच कुठे जास्त जाते. पाणी सर्वांना सारखे मिळाला पाहिजे. आणि ईथे जर कुठेतरी कटोती झाली तर ह्या शहराच्या पाणी पुरवठ्यावर किंवा टंचाईवर नेमका प्रश्न उद्‌भवणार नाही. कारण एका घराला सुद्धा आपण त्याच तराजुत मोजतो आणि १५ घरांनाही एकाच तराजुत मोजतो. हा निर्णय सुद्धा मध्यंतरी आता तुम्ही सांगितले की आपण गटनेत्यांची मिटींग लावू हा मुद्दा तिथे चर्चेला आला पाहिजे. चला मान्य आहे. मला वाटते की माझ्या घरालाही एक कनेक्शन मिळांव परंतु ह्या शहराच्या दृष्टीने ते कितपत योग्य आहे. देताना आपण कितपत दिलं पाहिजे. याचा विचार सुद्धा व्हायला पाहिजे. स्टॅडिंगने उदाहरण म्हणुन दिलं ते मंजुर केलं परंतु त्याचा परिणाम ह्या शहरामध्ये पाणी टंचाई निर्माण होण्यावर होतं हा मुद्दा सुद्धा महत्त्वाचा आहे. आणि ध्यानात घेतला पाहिजे पुढच्या मिटींगमध्ये तो मुद्दा चर्चेला घ्या.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय, सन्मा. सदस्या प्रभात ताई माजी महापौर सभागृहनेते यांनी ह्या ठिकाणी पाण्याचा कटाक्षाने वापर आणि जे एम.आर.डब्ल्यू. म्हणतो आपण अनरेकॉर्ड जे वॉटर असते, गळतीच जो पाणी असतो त्याच्यावर नियंत्रण चांगली चर्चा ह्या ठिकाणी घडवून आणली. श्री. वाकोडे आणि संबंधित टीमला आम्ही ह्यामध्ये निश्चित कामाला लावू आणि आपले जे २० टक्के गळती आहे. असे जे बोलले जाते वास्तविक हंडरेड  परसेन्ट रिपेरिंग झालेली आहे. आणि ती कमीत कमी स्टॅन्डर्ड लेव्हलला कशी आणली जाईल आपण सगळयांनी हे काम केल पाहिजे. निश्चित ह्या सुचना आम्ही मान्य करतो. सध्या आपण १५ फ्लॅटला एक अशा पध्दतीने कार्यप्रणाली चालू आहे. आणि झोपडपट्टीमध्ये ग्रुप कनेक्शनचा आहे. स्टॅन्डींगमध्ये चर्चा झालेली आहे. प्रशासनाला सुध्दा विनंती राहिल. परत गटनेते आणि आपले पदाधिकारीच्या बैठकीत हा मुद्दा सुध्दा चर्चेला घेऊ आणि प्रत्येक कुंटुंबाला किंवा फ्लॅटला कनेक्शन दिल तर गळतीचा प्रमाण वाढतो. म्हणुन त्याला नियंत्रण करण्याची जी पूर्वीची बाह्यप्रणाली आहे. तर निश्चित अमल प्रशासन करेल आणि त्याबद्दल स्टॅन्डींगमध्ये झालेला ठराव अजून प्रशासनाकडे आलेला नाही. आणि मला वाटते स्टॅन्डींग सुध्दा ह्या बाबी शिवाय काही वेगळा निर्णय करणार नाही. कारण पाणी फार महत्त्वाचा आहे आणि आपण फार मेहनत करून ह्या लेव्हलपर्यंत आलेलो आहोत. आणि मला वाटते ह्यामध्ये सगळे आपण दक्ष आहात आणि पुढे सुध्दा आपण ह्याचे चांगलं पध्दतीने कार्यपालन केले जाईल.

**जुबेर इनामदार :-**

विशेष स्टॅन्डींग समितीला धोरणात्मक निर्णयाला खरंतर तो महासभेसमोर आला पाहिजे होता. झोपडपट्टी ही आपल्याकडे आता पक्के काम झालेले आहेत. ज्या झोपडपट्टींना ग्रुप कनेक्शन आहे, त्यांना प्रत्येकाला एक एक कनेक्शन देण्यात यावे.

**मा. आयुक्त :-**

ग्रुप कनेक्शन शिवाय दुसरी प्रणाली करता येणार नाही. कारण एका जागेमध्ये १००-१०० घरं असतात आणि तुम्ही १०० पाईप लाईनचा झुडगा जर काढला त्याचा पाईप लाईनहून त्याला प्रेशरच राहणार नाही. प्रक्टीकली इनड्युज्वल कनेक्शन फार अवघड आहे.

**जुबेर इनामदार :-**

मी स्वतः मागू शकतो उद्या की, मला ही द्या कनेक्शन.

**मा. आयुक्त :-**

पाच इंची, चार इंची, तीन इंची लाईन असते. आमची त्याच्यावर जर तुम्ही १०० कनेक्शन प्राप्त केलात तर ते प्रक्टीकलीच होणार नाही. ते आम्ही टेक्नीकली समजून सांगू आणि त्यावर आपले गटनेते आणि पदाधिका-यांच्या बैठकीत चर्चा करू.

**जुबेर इनामदार :-**

स्टॅन्डींगमध्ये चर्चा अशाच प्रकारे झाली. एका इमारतीला म्हणजे १५ सदनिकाच्या मागे एक कनेक्शन किंवा एक प्रॉपर्टी धारक जो कोणी असेल त्याला एक कनेक्शन हे शक्य आहे साहेब.

**मा. आयुक्त :-**

त्याची चर्चा आपल्या रेग्युलर मिटींगमध्ये करुन त्याच्यावर निर्णय घेऊ.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, सध्या परिस्थिती काय आहे, १० की १५ फ्लॅट.

**मा. आयुक्त :-**

१५ फ्लॅट आहे.

**गिता जैन :-**

एम.एम.आर.डी.ए. चे जी बिल्डींग आहेत त्यांनाही आपण १५ पावर एक द्यायला जातो ना, तेव्हा तेच प्रॉब्लेम होते. त्या बिल्डींगला फ्लॅट जास्ती असतात. त्यासाठी एक चांगला त्या बिल्डिंगसाठी धोरण घ्या.

**मा. महापौर :-**

ठीक आहे, ठराव मंजूर. पुढचा विषय द्या.

**प्रकरण क्र. ७५ :-**

**भाईंदर (प.) शिवसेना गल्ली येथील स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ७७ :-**

भाईंदर (प) शिवसेना गल्ली येथिल स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत महानगरपालिकेची मुख्य जलवाहिनी १५ ते २० वर्ष जुनी असुन बऱ्याच इमारतींच्या खालून गेलेली आहे. तसेच सदर जलवाहिनी ७ ते ८ फुट खोलवर असून जीर्ण झालेली आहे. त्याकरीता दुरुस्तीचे काम करण्यास त्रासदायक होत आहे. सदर परिसरात जलवाहिनी टाकणे गरजेचे आहे. सदर कामास मा. विशेष महासभा दि.०२/०३/२०१७, ठराव क्र.१०६ अन्वये रु.१,१४,५३,९००/- इतक्या रकमेस मान्यता दिलेली होती. त्यानुसार सदर कामाची निविदा मागविण्यात आलेली होती. परंतु सदर निविदेस कमी प्रतिसाद तसेच जास्त दराची प्राप्त होत आहेत.

सदर कामाचे अंदाजपत्रक नव्याने सन २०१६-१७ च्या महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या दरसुचीनुसार सदर कामाची किंमत अंदाजित खर्च रक्कम रु.१,७७,९९,८९६/- इतकी आहे.

सदर कामी सुधारीत रु.१,७७,९९,८९६/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

**सुचक :- ॲड. रवि व्यास** **अनुमोदक :- श्री. अशोक तिवारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६, **<u>आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत .</u> -- अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये हायलँड रस्त्यावरील बी .एम.सी. पाईपलाईन छेदून १५०० एम.एम. व्यासाची जलवाहिनी ट्रेंचलेस पध्दतीने ठाणे महानगरपालिकेमार्फत पूर्णठेव तत्वावर अंथरणे.**

**प्रशांत दळवी :-**

**प्रस्तावना :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजने अंतर्गत साकेत ते पाटलीपाडा दरम्यान १५९० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणेचे काम बाळकुम येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या ट्रेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणे व्यतिरिक्त पूर्ण झाले आहे. सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ६०० मि.मी व्यासाची जलवाहिनी रस्त्यालगतच्या पदपथावरुन अंथरुन अंशत: पाणी पुरवठा सुरु केलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस आवश्यक असणारा १२५ द.ल.ली. पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी सदर ठिकाणी जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या टेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी प्राप्त आहे. सदर परवानगीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अस्तित्वातील १८०० मि.मी. ते २७५० मि.मी. व्यासाच्या ५ जलवाहिन्या सुमारे ८ ते ९ मिटर खोलीवर छेदून मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रस्तावीत जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. तसेच सदर ठिकाणी सुमारे ४.५ मिटर खोलीवर कठीण दगडाचा स्थर लागलेला आहे. यास्तव ठेकेदाराने सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने अतिरिक्त बाबीची मागणी केलेली होती. याअनुषंगाने याबाबत मे. वाप्कोस लि. तसेच आय.आय.टी. मुंबई यांनी देखील सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असून अदयावत पध्दतीचा वापर करणे आवश्यक असल्याबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

सबब सदर ठिकाणी अदयावत पध्दतीचा वापर करुन जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी मशिनरी तसेच कमी परीमाणाच्या लांबीसाठी त्याक्षेत्रातील तज्ञ ठेकेदार सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. तसेच सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने त्यासाठी आवश्यक असणारी योग्य त्या व्यासाची मॅक्रोटंनलींग मशिन तसेच याकामाचा अनुभव असणारे ठेकेदार फारच कमी आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात भुयारी गटार योजने अंतर्गत मॅक्रोटंनलींग पध्दतीचा वापर करुन १५०० मि.मी. व्यासापर्यंतच्या मलवाहिन्या अंथरण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. सदरच्या कामांतर्गत अतिरिक्त बाब म्हणून / स्वतंत्र निविदेद्वारे विषयांकीत कामातील फक्त मॅक्रोटंनलींगचे काम पूर्णठेव तत्त्वावर करुन देणेबाबत ठाणे महानगरपालिकेस विनंती केली होती. त्यास अनुसरुन त्यानी सदरचे काम करुन देणेस सहमती दर्शविलेली आहे.

या कामासाठी लागणारे १५०० मि.मी. व्यासाचे केसिंग पाईप मिरा भाईंदर महानगरपालिका उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच सदरच्या केसिंग पाईपमधून १३५० मि.मी. व्यासाची कॅरिंग पाईप अंथरण्याचे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

ठाणे महानगरपालिकेने सदरच्या कामाबाबतची निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी कामाचा अपेक्षीत खर्च रु. १.९८ कोटी पैकी ५० टक्के रक्कम रु. ९९.०० लक्ष निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी व उर्वरीत ५० टक्के रक्कम काम सुरु करण्यापूर्वी अपेक्षीलेली आहे.

सदरच्या कामासाठीची अंदाजपत्रकीय किंमत रु.२,२०,६०,२२३/- इतकी आहे. सदर काम ठाणे महानगरपालिके कडून पूर्णठेव तत्त्वावर करुन घेणे आवश्यक असून त्याकरीता एकुण रु.१.९८/- कोटी इतका खर्च अपेक्षित असून सदर खर्चास व काम करुन घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

**ठराव क्र. :-**

सदरच्या कामासाठी रु. २,२०,६०,२२३/- इतक्या रक्कमेस हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरचे काम महापालिकेमार्फत करण्यात यावे गरज भासल्यास ठाणे महापालिकांच्या तज्ञ अधिका-यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. तसेच अतिरीक्त ७५ द.ल.ली. पाणीपुरवठा योजनेतील निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त असल्याने तसेच वस्तु व सेवा कर लागु झाल्याने व इतर खर्च वाढल्याने योजनेवरील खर्च रु.३०० कोटी इतका अपेक्षित आहे. सदर खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर.

**प्रकरण क्र. ७६ :-**

**<u>आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u> -- अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये हायलँड रस्त्यावरील बी.एम.सी. पाईपलाईन छेदून १५०० एम.एम. व्यासाची जलवाहिनी ट्रेंचलेस पध्दतीने ठाणे महानगरपालिकेमार्फत पूर्णठेव तत्वावर अंथरणे.**

**ठराव क्र. ७८ :-**

**प्रस्तावना :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजने अंतर्गत साकेत ते पाटलीपाडा दरम्यान १५९० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणेचे काम बाळकुम येथील बृहन्मुंबई

महानगरपालिकेच्या जलवाहिन्या ट्रेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणे व्यतिरिक्त पूर्ण झाले आहे. सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ६०० मि.मी व्यासाची जलवाहिनी रस्त्यालगतच्या पदपथावरुन अंथरुन अंशत: पाणी पुरवठा सुरु केलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस आवश्यक असणारा १२५ द.ल.ली. पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी सदर ठिकाणी जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या टेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी प्राप्त आहे. सदर परवानगीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अस्तित्वातील १८०० मि.मी. ते २७५० मि.मी. व्यासाच्या ५ जलवाहिन्या सुमारे ८ ते ९ मिटर खोलीवर छेदून मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रस्तावीत जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. तसेच सदर ठिकाणी सुमारे ४.५ मिटर खोलीवर कठीण दगडाचा स्थर लागलेला आहे. यास्तव ठेकेदाराने सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने अतिरिक्त बाबीची मागणी केलेली होती. याअनुषंगाने याबाबत मे. वाप्कोस लि. तसेच आय.आय.टी. मुंबई यांनी देखील सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असून अदयावत पध्दतीचा वापर करणे आवश्यक असल्याबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

सबब सदर ठिकाणी अदयावत पध्दतीचा वापर करुन जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी मशिनरी तसेच कमी परीमाणाच्या लांबीसाठी त्याक्षेत्रातील तज्ञ ठेकेदार सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. तसेच सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने त्यासाठी आवश्यक असणारी योग्य त्या व्यासाची मॅक्रोटंनलींग मशिन तसेच याकामाचा अनुभव असणारे ठेकेदार फारच कमी आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात भुयारी गटार योजने अंतर्गत मॅक्रोटंनलींग पध्दतीचा वापर करुन १५०० मि.मी. व्यासापर्यंतच्या मलवाहिन्या अंथरण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. सदरच्या कामांतर्गत अतिरिक्त बाब म्हणून / स्वतंत्र निविदेद्वारे विषयांकीत कामातील फक्त मॅक्रोटंनलींगचे काम पूर्णठेव तत्त्वावर करुन देणेबाबत ठाणे महानगरपालिकेस विनंती केली होती. त्यास अनुसरुन त्यानी सदरचे काम करुन देणेस सहमती दर्शविलेली आहे.

या कामासाठी लागणारे १५०० मि.मी. व्यासाचे केसिंग पाईप मिरा भाईंदर महानगरपालिका उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच सदरच्या केसिंग पाईपमधून १३५० मि.मी. व्यासाची कॅरिंग पाईप अंथरण्याचे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

ठाणे महानगरपालिकेने सदरच्या कामाबाबतची निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी कामाचा अपेक्षीत खर्च रु. १.९८ कोटी पैकी ५० टक्के रक्कम रु. ९९.०० लक्ष निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी व उर्वरीत ५० टक्के रक्कम काम सुरु करण्यापूर्वी अपेक्षीलेली आहे.

सदरच्या कामासाठीची अंदाजपत्रकीय किंमत रु.२,२०,६०,२२३/- इतकी आहे. सदर काम ठाणे महानगरपालिके कडून पूर्णठेव तत्त्वावर करुन घेणे आवश्यक असून त्याकरीता एकूण रु.१.९८/- कोटी इतका खर्च अपेक्षित असून सदर खर्चास व काम करुन घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

**ठराव क्र. :-**

सदरच्या कामासाठी रु. २,२०,६०,२२३/- इतक्या रक्कमेस हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरचे काम महापालिकेमार्फत करण्यात यावे गरज भासल्यास ठाणे महापालिकांच्या तज्ञ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. तसेच अतिरीक्त ७५ द.ल.ली. पाणीपुरवठा योजनेतील निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त असल्याने तसेच वस्तु व सेवा कर लागु झाल्याने व इतर खर्च वाढल्याने योजनेवरील खर्च रु.३०० कोटी इतका अपेक्षित आहे. सदर खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी        अनुमोदक :- श्री. मनोज दुबे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७७, **ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.** अवलोकन करण्यात आले.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७८, **सिल्वर पार्क येथील साईबाबा मंदिरा समोरील चौकास नाव देणे.**

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, विषय तुमचा आहे, गोषवारा प्रशासनाने दिलेला नाही. प्रचलित पध्दतीने चौकाला नाव देतो, तिथे चौकाला नाव आहे.

**मा. उपमहापौर :-**

त्या चौकाला नाव नाही देत दुसरा आहे.

**दिपिका अरोरा :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिल्वर पार्क, साईधाम मंदीर, चंद्रेश ॲकॉर्ड, आचार्य विनोबा भावे मार्ग येथे संघवी साकलचंद चुन्नीलाल तातडे ट्र स्ट यांनी स्वखर्चानी चौक बांधून सदर चौकास "साईबाबा धाम चौक" असे नामकरण करणेबाबत पत्रान्वये विनंती अर्ज केलेला आहे . सदरच्या मंदीराला यावर्षी 25 वर्षे देखील पुर्ण होत आहेत , या वर्षी रजत महोत्सव असल्याने सदर चौकास "साईबाबा धाम चौक" असे नामकरण करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.**

**सदर रस्ता हा मुख्य रस्ता असून सदर रस्त्यावरुन मेट्रो रेल्वे व उड्डाण पुल बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामास अडथळा न होता भविष्यात चौक बांधणे शक्य असल्यास संघवी साकलचंद चुन्नीलाल तातडे ट्रस्ट , खाजगी संस्था , यांना व ते तयार न सल्यास महानगरपालिकेमार्फत चौक बांधण्यास व मा.आयुक्त यांना अटीशर्ती ठरविण्यास ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे**

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब, तिथे चौक नाहीच आहे.

**जुबेर इनामदार :-**

तिथे चौक आधीच बांधलेला आहे.

**अनिल सावंत :-**

बाहेर पडल्याबरोबर रोडवर येतो आणि तिथे क्रॉसिंग आहे. चौक कुठे आहे?

**जुबेर इनामदार :-**

साईबाबा नावाचा चौक बांधायचा आहे. चांगली गोष्ट आहे, श्रध्दाचा सबुरीचा विषय आहे.

**दिपिका अरोरा :-**

ते जे ठिकाणी आहे. आपण जेव्हा सिल्वर पार्ककडून बाहेर निघतो, जे मिरा भाईंदरचे रोड आहे त्यावरील

नाव देण्यात आलेले आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७८ :-**

**सिल्वर पार्क येथील साईबाबा मंदिरा समोरील चौकास नाव देणे.**

ठराव क्र. ७९ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिल्वर पार्क, साईधाम मंदीर, चंद्रेश ॲकॉर्ड, आचार्य विनोबा भावे मार्ग येथे संघवी साकलचं द चुन्नीलाल तातडे ट्रस्ट यांनी स्वखर्चानी चौक बांधून सदर चौकास "साईबाबा धाम चौक" असे नामकरण करणेबाबत पत्रान्वये विनंती अर्ज केलेला आहे . सदरच्या मंदीराला यावर्षी 25 वर्षे देखील पुर्ण होत आहेत , या वर्षी रजत महोत्सव असल्याने सदर चौकास "साईबाबा धाम चौक" असे नामकरण करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.**

**सदर रस्ता हा मुख्य रस्ता असून सदर रस्त्यावरुन मेट्रो रेल्वे व उड्डाण पुल बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामास अडथळा न होता भविष्यात चौक बांधणे शक्य असल्यास संघवी साकलचंद चुन्नीलाल तातडे ट्रस्ट , खाजगी संस्था , यांना व ते तयार नसल्यास महानगरपालिकेमार्फत चौक बांधण्यास व मा.आयुक्त यांना अटीशर्ती ठरविण्यास ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे**

सुचक :- सौ. दिपीका अरोरा        अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७९, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरातन शिवमंदिर परिसर सुशोभिकरण करणे , रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभूमीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे , मेरी गोल्ड २ व ३ परिसरातील सुशोभिकरण करणे , प्रभाग क्र. १३ मध्ये गटारे इतर आवश्यक कामे करणे.**

**रूपाली शिंदे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरात शिवमंदिर परीसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभूमीची दुरूस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परीसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र.१३ मध्ये गटारे इतर कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाची मागणी मा. उप महापौर, श्री. चंद्रकांत वैती यांनी केलेली असून सदर काम त्यांच्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी अंतर्गत करणेबाबत मागणी केलेली आहे. सदर कामाचे रु.१,५०,००,०००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदर कामी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या “उप-महापौर स्वेच्छा निर्णय निधी” या रु.१५०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**संजय थेराडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला वाटल होतं. मा. उपमहापौर पुर्ण शहराचे आहेत. तुम्ही तर प्र.क्र.१३ मध्येच अडकून टाकले. मा. महापौर, मा. उपमहापौर निधी हा पूर्ण शहरासाठी असतो. आणि आज १७-१८ काम व्हायला पाहिजे. जी त्यांनी काम सांगितली आहेत ती गरजेची काम आहेत आणि ती व्हायलाच पाहिजे. पण बाकी शहराचा विचार नाही करणार.

**मा. उपमहापौर :-**

माझा पत्रामध्ये शहरातील............

**अनिल सावंत :-**

तुमची काम व्हायलाच पाहिजे, १७-१८ ची जनरल निधी सोडून द्या. नगरसेवक प्रभाग निधीची आमची काम नाही झाली. आणि आज तुम्ही १७-१८ चं तुम्ही देताहेत. बजेटमध्ये प्रोव्हीजन आहे का? कॅरीफॉरवर्ड केले आहे का?

**मा. महापौर :-**

आहे ना?

**अनिल सावंत :-**

मग सन २०१७-१८ चे कसं काय देता तुम्ही. मग आमचं नगरसेवक निधी, प्रभाग निधी पण द्या. काम शहराची व्हायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

प्रभाग निधीसाठी तुमचे अर्ज फार उशिरा आले.

**प्रविण पाटील :-**

उपमहापौर साहेब हा निधी नक्की २०१७-१८ चा आहे की २०१६-१७ चा आहे. २०१७-१८ चा निधी मला दिलाच नाही.

**मा. आयुक्त :-**

हा विषय आहे तो २०१८-१९ च्या उपमहापौरांच्या स्वेच्छा निधीचा विषय आहे. २०१७-१८ हे चुकून टाईपिंग मिस्टेक झालेली आहे.

**प्रविण पाटील :-**

२०१७-१८ चा निधी यातच बाकी आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७९ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरातन शिवमंदिर परिसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभूमीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परिसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र. १३ मध्ये गटारे इतर आवश्यक कामे करणे.**

**ठराव क्र. ८० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरात शिवमंदिर परीसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभूमीची दुरूस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परीसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र.१३ मध्ये गटारे इतर कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाची मागणी मा. उप महापौर, श्री. चंद्रकांत वैती यांनी केलेली असून सदर काम त्यांच्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी अंतर्गत करणेबाबत मागणी केलेली आहे. सदर कामाचे रु.१,५०,००,०००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदर कामी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या "उप-महापौर स्वेच्छा निर्णय निधी" या रु.१५०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. रुपाली शिंदे (मोदी) अनुमोदक :- श्री. संजय थेराडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८०, **राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पायथ्या समांतर ३० मीटर रुंद विकाय योजना रस्ता विकसित कामे व नाला बांधणे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देणे.**

**सुजाता पारधी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीच्या पुर्वेस संजय गांधी राष्ट्रीय उदयान (नॅशनल पार्क) असून सदर भागातील डोंगर दऱ्यातुन वाहणारे पावसाचे पाणी महानगरपालिका क्षेत्रात येत असल्याने सदर पाण्याचे नियोजन करण्यासाठी सल्लागार नेमणेस मा. महासभा दि.१६/१०/२०१७ ठराव क्र.०६ अन्वये मान्यता दिल्यानुसार सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन राष्ट्रीय महामार्ग क्र.८ जात असून महामार्गाच्या दुतर्फा इमारती असल्याने व सदर रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ असल्याने रस्त्याचा फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे दहिसर चेकनाका ते साई पॅलेस हॉटेल पर्यंत जाणारा ३० मी. रुंदीचा अहमदाबादहुन मुंबईकडे जाण्याकरीता पर्यायी रस्ता उपलब्ध होणार आहे. सदर रस्त्यालगत नाला बांधल्यास महापालिका क्षेत्रात येणारे पावसाचे पाणी देखील साई पॅलेस हॉटेल ते घोडबंदर खाडीकडे निघून जाईल.

मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे झालेल्या बैठकीत दहीसर चेक नाका ते साई पॅलेस हॉटेल घोडबंदर या राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ या रस्त्यास ३० मीटर

रुंदीचा समांतर रस्ता तयार करणे व रस्त्यालगत नाला बांधण्याचे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल महानगरपालिकेने सादर केल्यास प्राधिकरणामार्फत सदर काम हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. त्या अनुशंगाने सदर कामाचा मे. ५ इलेमेन्ट डीझाईन सेल मार्फत रु.१२४.११ कोटीचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक व सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८० :-**

**राष्ट्रीय महामार्ग क्र . ०८ संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पायथ्या समांतर ३० मीटर रुंद विकाय योजना रस्ता विकसित कामे व नाला बांधणे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देणे.**

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीच्या पुर्वेस संजय गांधी राष्ट्रीय उदयान (नॅशनल पार्क) असून सदर भागातील डोंगर दऱ्यातुन वाहणारे पावसाचे पाणी महानगरपालिका क्षेत्रात येत असल्याने सदर पाण्याचे नियोजन करण्यासाठी सल्लागार नेमणेस मा. महासभा दि.१६/१०/२०१७ ठराव क्र.०६ अन्वये मान्यता दिल्यानुसार सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन राष्ट्रीय महामार्ग क्र.८ जात असून महामार्गाच्या दुतर्फा इमारती असल्याने व सदर रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ असल्याने रस्त्याचा फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे दहिसर चेकनाका ते साई पॅलेस हॉटेल पर्यंत जाणारा ३० मी. रुंदीचा अहमदाबादहुन मुंबईकडे जाण्याकरीता पर्यायी रस्ता उपलब्ध होणार आहे. सदर रस्त्यालगत नाला बांधल्यास महापालिका क्षेत्रात येणारे पावसाचे पाणी देखील साई पॅलेस हॉटेल ते घोडबंदर खाडीकडे निघून जाईल.

मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे झालेल्या बैठकीत दहीसर चेक नाका ते साई पॅलेस हॉटेल घोडबंदर या राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ या रस्त्यास ३० मीटर रुंदीचा समांतर रस्ता तयार करणे व रस्त्यालगत नाला बांधण्याचे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल महानगरपालिकेने सादर केल्यास प्राधिकरणामार्फत सदर काम हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. त्या अनुशंगाने सदर कामाचा मे. ५ इलेमेन्ट डीझाईन सेल मार्फत रु.१२४.११ कोटीचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक व सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. सुजाता पारधी अनुमोदक :- श्रीम. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८१, **"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास " अंतर्गत वितरीत केलेल्या अनुदानातून करावयाच्या कामांना मान्यता देणेबाबत.**

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पायाभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षाकरीता रस्ते त्याखालील पुल याकरीता रु.४.०० कोटी व स्मशानभूमी नुतनीकरणासाठी रु.१.०० कोटी असे रु.५.०० कोटीच्या मर्यादेत कामे घेण्यास व जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यतेस्तव शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी नगरविकास विभागाने दि.१२ सप्टेंबर २०१८ रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना कळविलेले आहे.

मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि.१२/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कामांचे अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, मा. महासभेचा ठराव, काम पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती महानगरपालिका करण्यास तयार असल्याचे प्रमाणपत्र, शासन अनुदानापेक्षा अधिकचा खर्च लागल्यास तो मनपा करण्यास तयार असल्याबाबतचे प्रमाणपत्र, सदर काम अन्य कोणत्याही योजनेतून हाती घेतलेले नाही व प्रस्तावित नाही

असे प्रमाणपत्र, सदरचे काम विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीनूसार असलेल्याचे प्रमाणपत्र, सदर कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची ताब्यातील व सार्वजनिक वापराची असल्याचे प्रमाणपत्र व विभागीय आयुक्त यांनी पुरविलेल्या छाननी पत्रकानूसार सादर करण्याबाबत कळविलेले आहे. त्यानुसार शहरातील रस्ते, पुल व स्मशान भुमी यांची आवश्यकता पाहता खालील कामे घेण्यास हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

| अ.क्र. | कामे | रक्कम |
|---|---|---|
| १) | उत्तन गोठणी येथे पुल पुर्नबांधणी करणे. | रु. ३८,६१,६५०/- |
| २) | उत्तन नवी खाडी येथे पुल पुर्नबांधणी करणे. | रु. ३८,६१,६५०/- |
| ३) | राष्ट्रीय महामार्गालगत वॉर्ड क्र.१४ वर्सोवा, दाचकुल पाडा येथे स्मशान भुमी बांधणे | रु.५०,००,०००/- |
| ४) | भाईंदर पुर्व रेल्वे फाटक ते गोडदेव नाका कॉंक्रिट रस्ता करणे | रु.३,२४,००,०००/- |
| ५) | मिरारोड स्मशान भुमी विकसीत करणे | रु.५०,००,०००/- |

**दिपिका अरोरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

गोषवाऱ्याला नविन ५० लाख का आणले?

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब टोटल ५ कोटी आहे. ५ चे काम.

**मा. महापौर :-**

सुचविलेले आहे. ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८१ :-**

**"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास " अंतर्गत वितरीत केलेल्या अनुदानातून करावयाच्या कामांना मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. ८२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पायाभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षाकरीता रस्ते त्याखालील पुल याकरीता रु.४.०० कोटी व स्मशानभूमी नुतनीकरणासाठी रु.१.०० कोटी असे रु.५.०० कोटीच्या मर्यादेत कामे घेण्यास व जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यतेस्तव शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी नगरविकास विभागाने दि.१२ सप्टेंबर २०१८ रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना कळविलेले आहे.

मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि.१२/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कामांचे अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, मा. महासभेचा ठराव, काम पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती महानगरपालिका करण्यास तयार असल्याचे प्रमाणपत्र, शासन अनुदानापेक्षा अधिकचा खर्च लागल्यास तो मनपा करण्यास तयार असल्याबाबतचे प्रमाणपत्र, सदर काम अन्य कोणत्याही योजनेतून हाती घेतलेले नाही व प्रस्तावित नाही असे प्रमाणपत्र, सदरचे काम विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीनूसार असलेल्याचे प्रमाणपत्र, सदर कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची ताब्यातील व सार्वजनिक वापराची असल्याचे प्रमाणपत्र व विभागीय आयुक्त यांनी पुरविलेल्या छाननी पत्रकानूसार सादर करण्याबाबत कळविलेले आहे. त्यानुसार शहरातील रस्ते, पुल व स्मशान भुमी यांची आवश्यकता पाहता खालील कामे घेण्यास हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

| अ.क्र. | कामे | रक्कम |
|---|---|---|
| १) | उत्तन गोठणी येथे पुल पुर्नबांधणी करणे. | रु. ३८,६१,६५०/- |
| २) | उत्तन नवी खाडी येथे पुल पुर्नबांधणी करणे. | रु. ३८,६१,६५०/- |
| ३) | राष्ट्रीय महामार्गालगत वॉर्ड क्र.१४ वर्सोवा, दाचकुल पाडा येथे स्मशान भुमी बांधणे | रु.५०,००,०००/- |
| ४) | भाईंदर पुर्व रेल्वे फाटक ते गोडदेव नाका कॉंक्रिट रस्ता करणे | रु.३,२४,००,०००/- |
| ५) | मिरारोड स्मशान भुमी विकसीत करणे | रु.५०,००,०००/- |

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्रीम. दिपीका अरोरा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८२, **भाईंदर रेल्वे स्टेशन व मिरारोड रेल्वे स्टेशन मधील फुट ओवर ब्रीजवर शेड बांधणे व दुरुस्ती करणेसाठी रेल्वे प्रशासनास रक्कम प्रदान करणेबाबत.**

**रिटा शहा :-**

**भाईंदर रेल्वे स्टेशन व मिरारोड रेल्वे स्टेशन दरम्यान भाईंदर रेल्वे स्टेशन नंतर महानगरपालिकेचे रेल्वे प्रशासनामार्फत Deposit Work नुसार दोन फुट ओव्हर ब्रिज व एक उड्डाणपुल बांधण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही फुट ओव्हर ब्रिजवर शेड बांधणे व फुट ओव्हर ब्रिजची दुरुस्ती तसेच उड्डाणपुलाची दुरुस्ती करणेची आवश्यकता असल्याने रेल्वे प्रशासनाकडे अंदाजपत्रक तयार करुन देण्या ची विनंती केली होती. सदर दोन्ही कामे रेल्वेच्या अंतर्गत असल्याने रेल्वेमार्फत Deposit Work नुसार कामे करणे आवश्यक आहे. रेल्वे प्रशासनाने सदर दोन्ही फुट ओव्हर ब्रिजसाठी रु .2,40,83,000/- रक्कमेची मागणी केली आहे. उपरोक्त कामासाठी लागणारी रु.2,40,83,000/- इतक्या रक्कमेची तरतुद सन 2018-19 च्या अर्थसंकल्पात करावयाची आहे व सदर रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट Sr. Divisional Finance Manager, Western Railway Mumbai Central यांचे नावे काढणेबाबत रेल्वे प्रशासनाने कळविले आहे . रेल्वे प्रशासनामार्फत सदर रक्कमेसाठी पाठपुरावा होत असून सदर पुल दुरुस्ती न केल्यास काही दुर्घटना होवू शकते. सदर खर्चासाठी पुर्न:विनीयोजनाद्वारे तरतुद उपलब्ध करुन रेल्वे प्रशासनास रक्कम भरावी लागेल**

**तरी सदर प्रस्तावास मान्यता देण्यास शिफारस आहे.**

**ठराव क्र. :-**

**सदर कामाकरीता चालू वर्षाच्या आर्थिक संकल्पात त रतुद करण्यात आलेली नाही . तथापि रेल्वे हद्दीत घडणाऱ्या दुर्घटना पाहता आवश्यक दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करुन सदर पुलांची अत्यावश्यक दुरुस्ती कामे करण्याचे अंदाजपत्रक उपलब्ध करुन घेण्यात यावे. सदर दुरुस्ती कामांकरीता आवश्यक तरतुद करुन सदर रक्कम रेल्वे प्रशासनाकडे जमा करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.**

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते साहेब हे दोन काम घेतलेली आहेत तर मध्यंतरी केबीन रोडचे आपण ते हस्तांतरण करुन घ्यायचे आहे. त्या रोडचे ते काम का घेत नाही. तो ही रोड वाईट होणार मग त्यासाठी तुम्ही का केले नाही.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम त्याची प्रोसेस चालू आहे.

**मा. महापौर :-**

तो विषय वेगळा आहे. त्याची प्रोसेस वेगळी आहे.

**गिता जैन :-**

यातच घेतले असते ना. साहेब त्यांची तयारी होती आणि तसे लेटर आपल्या प्रशासनाकडे आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८२ :-**

**भाईंदर रेल्वे स्टेशन व मिरारोड रेल्वे स्टेशन मधील फुट ओवर ब्रीजवर शेड बांधणे व दुरुस्ती करणेसाठी रेल्वे प्रशासनास रक्कम प्रदान करणेबाबत.**

**ठराव क्र. ८३ :-**

**भाईंदर रेल्वे स्टेशन व मिरारोड रेल्वे स्टेशन दरम्यान भाईंदर रेल्वे स्टेशन नंतर महानगरपालिकेचे रेल्वे प्रशासनामार्फत Deposit Work नुसार दोन फुट ओव्हर ब्रिज व एक उड्डाणपुल बांधण्यात आलेले**

**आहेत. सदर दोन्ही फुट ओव्हर ब्रिजवर शेड बांधणे व फुट ओव्हर ब्रिजची दुरुस्ती तसेच उड्डाणपुलाची दुरुस्ती करणेची आ वश्यकता असल्याने रेल्वे प्रशासनाकडे अंदाजपत्रक तयार करुन देण्याची विनंती केली होती. सदर दोन्ही कामे रेल्वेच्या अंतर्गत असल्याने रेल्वेमार्फत Deposit Work नुसार कामे करणे आवश्यक आहे. रेल्वे प्रशासनाने सदर दोन्ही फुट ओव्हर ब्रिजसाठी रु .2,40,83,000/- रक्कमेची मागणी केली आहे. उपरोक्त कामासाठी लागणारी रु.2,40,83,000/- इतक्या रक्कमेची तरतुद सन 2018-19 च्या अर्थसंकल्पात करावयाची आहे व सदर रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट Sr. Divisional Finance Manager, Western Railway Mumbai Central यांचे नावे काढणेबाबत रेल्वे प्रशासनाने क ळविले आहे. रेल्वे प्रशासनामार्फत सदर रक्कमेसाठी पाठपुरावा होत असून सदर पुल दुरुस्ती न केल्यास काही दुर्घटना होवू शकते. सदर खर्चासाठी पुर्न:विनीयोजनाद्वारे तरतुद उपलब्ध करुन रेल्वे प्रशासनास रक्कम भरावी लागेल**

**तरी सदर प्रस्तावास मान्यता देण्यास शिफारस आहे.**

**ठराव क्र. :-**

**सदर कामाकरीता चालू वर्षाच्या आर्थिक संकल्पात तरतुद करण्यात आलेली नाही . तथापि रेल्वे हद्दीत घडणाऱ्या दुर्घटना पाहता आवश्यक दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करुन सदर पुलांची अत्यावश्यक दुरुस्ती कामे करण्याचे अंदाजपत्रक उपलब्ध करुन घेण्यात यावे . सदर दुरुस्ती कामांकरीता आवश्यक तरतुद करुन सदर रक्कम रेल्वे प्रशासनाकडे जमा करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८३, **मौजे नवघर स.क्र.२६७/१ ते ३, २५९/४, २६०/३, २६५/२ ते ४, २६६/१ ते ६ या जागेच्या वापरामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत.**

धृवकिशोर पाटील :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-**1296/847/**सीआर**-162/96/**युडी**-12,** दि.**14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि .**15/07/97** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र . टीपीएस-**1298/941/**सीआर**-89/98/**युडी**-12,** दि.**25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि .**15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे.

**सदर जागेपैकी मौजे नवघर, स.क्र. 265/2,4, 266/1 ते 6, 267/2,3 या जागेमधील सी.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र वगळून उर्वरीत सी.आर.झेड. ने बाधीत नसलेल्या क्षेत्रामध्ये जिमनॅशियम व क्लब हाऊसच्या इमारतीसाठी दि.18/02/2017 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी अन्वये देण्यात आलेली आहे.**

**मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील मंजूर तरतुदीनुसार 30.00 मी. किंवा त्यापेक्षा जास्ती रुंदीच्या रस्त्यालगतच्या नाविकास क्षेत्रामध्ये 30.00 मी. अंतरापर्यंत रहिवास वापर अनुज्ञेय असल्यामुळे त्याप्रमाणे परवानगी मिळणेसाठी विकासकांनी महानगरपालिकेकडे मागणी केल्याप्रमाणे याबाबत शासनाकडे दि.07/07/2016 व दि.06/11/2017 केलेली असून तद्नंतर विकासकांनी विषयांकित जागा 30.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यालगत असून त्याबाबत शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे विषयांकित जागेमध्ये तारांकीत हॉटेल्ससाठी (1 + 1) चटईक्षेत्रासाठी बांधकाम परवानगी मिळणेस दि.22/03/2018 रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्याप्रमाणे याबाबत शासनाने दि .13/04/2016**

**रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस अर्जदार यांनी अपेक्षिलेला वापर राष्ट्रीय महामार्ग / राज्य महामार्गालगत अनुज्ञेय असल्यामुळे अर्जदाराची विनंती मान्य करणेत येत असल्याचे कळविलेले आहे**

**सदर विषयांकित जागेमध्ये तारांकीत हॉटेल या प्रयोजनासाठी मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांनी दि.27/06/2018 अन्वये व मा. व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी दि.29/06/2018 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस नाहरकत दाखले दिलेले आहेत.**

**त्यानंतर विकासक यांनी मिरा भाईंदर हे शहर मुंबई - ठाणे लगतचे प्रमुख व झपाट्याने वाढणारे शहर असून राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 लगत असल्यामुळे तसेच शहरामध्ये व शहरालगत एस्सेलवर्ल्ड, पॅगोडा, ज्युडीशियल ॲकेडमी, सुभाषचंद्र बोस मैदान (ज्यामध्ये प्रस्तावित स्टेडियम आहे) असे अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे वास्तु व अम्युझमेंट पार्क असल्यामुळे येथे येणा -या उद्योजक व पर्यटकांसाठी तसेच शहरामध्ये असलेल्या स्टुडिओमुळे शहरात येणा-या अनेक कलावंतासाठी (गोरेगांव ते सुरत दरम्यान तारांकीत हॉटेलची सोय नसल्यामुळे) विश्रांतीची सोय होण्याच्या दृष्टीकोनातू न तसेच केंद्र शासनाच्या Make in India व राज्य शासनाच्या Make in Maharashtra अंतर्गत रोजगार निर्मीतीसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे . त्याप्रमाणे शहरामध्ये तारांकीत हॉटेल झाल्यास सुमारे 500-600 जणांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून मौजे नवघर , स.क्र. 259/4, 260/3, 265/2,4, 266/1 ते 6, 267/2,3 या जागेतील सी.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र वगळून त्यांच्या तारांकीत हॉटेल बांधकामासाठी (मुळ 1.0 + अतिरिक्त 1.0) याप्रमाणे चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करणेबाबत किंवा सदर जागा रहिवास / वाणिज्य वापरामध्ये फेरबदल करणेस शासनास विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने नियोजन प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 मधील तरतुदीनुसार मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्तावित करुन मंजूरीसाठी शासनास सादर करु शकत असल्यामुळे अर्जदार यांच्या विनंतीस अनुसरुन मंजूर विका स योजनेतील फेरबदल शासनास प्राप्त झाल्यास त्यावर शासन गुणवत्तेवर निर्णय घेणार असल्याचे शासनाने दि.06/10/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.**

**त्याप्रमाणे मौजे नवघर, स.क्र. 267/1 ते 3, 259/4, 260/3, 265/2 ते 4, 266/1 ते 6 व इतर जागा सोबत जोडलेल्या नकाशाप्र माणे ना -विकास क्षेत्रामधून रहिवास वापरामध्ये समाविष्ठ करणेसाठी महाराष्ट्र प्राधिकरण व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेसाठी हि महासभा मंजुरी देत असून त्या अनुषंगिक सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतीम मंजूरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा. आयुक्त सो., यांना हि महासभा अधिकार देत आहे.**

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रविण पाटील :-**

आयुक्त साहेब महापौर मॅडम सदरचा विषय हा आपल्या परवानगीने आलेला आहे. मला एक सांगा ही जागा कुठे आहे तिथे महापालिकेची मालकी आहे का? सर्वसाधारण शहर विकास आराखडा त्याच्यामध्ये ३७ अन्वये बदल करण्याचा शासनाचा किंवा प्रशासनाचा जो उद्देश असतो की शहराच्या त्याच्यामध्ये काहीतरी भाग असायला पाहिजे. शहराच्या विकास आराखड्यात त्याच्यामध्ये काही तरी भाग असायला पाहिजे. तर प्रशासनातर्फे मला असे सांगा की हा जो फेरबदल करतो त्याच्यामध्ये शहराचा काय फायदा होणार आहे की ही महापालिका एवढा मोठा फेरबदल करत आहे. प्रशासनाकडे पाठवत आहे तर मला प्रशासनाकडून असे सांगा की शहराचा याच्यामध्ये काय उद्देश आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय सन्मा. सदस्य श्री. प्रविण पाटील यांनी ह्या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे ती जागा कुठे आहे. विषयामध्ये एवढी स्पष्टता आहे की मौजे नवघर सर्व्हे क्र. २६७/१ ते ३, २५९/४, २६०/३, २६५/२ ते ४, २६६/१ ते ६ हे कनकिया पोलिस स्टेशनपासून जो रस्ता पुढे जातो त्याच्या एंडला एक ३० मिटरचा रस्ता आहे त्या रस्त्याच्या राईट साईटला ही जागा आहे आणि ह्यामध्ये संबंधित विकासकांनी महानगरपालिकेच्या मान्यतेने ना विकास क्षेत्रामध्ये सी.आर.झेड बाधीत एरिया सोडून ऑलरेडी त्याठिकाणी परवानगी घेऊन त्याठिकाणी बांधकाम चालू केलेले आहे. सदर विकासकाने पुनश्च ह्याठिकाणी तारांकीत हॉटेलसाठी राज्यशासनाकडे आणि महापालिकेकडे मागणी केली होती. तारांकित हॉटेल ना विकास क्षेत्रामध्ये देणेची तरतुद महापालिका अधिनियम व डी.सी.आर मध्ये नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव

शासनाकडे महापालिकेने पाठविलेला होता. शासनाने यावर सविस्तर अभ्यास करुन आणि केंद्र शासनाचे राज्यशासनाच्या हातात जे धोरण आहे. उदा. मेक इन इंडिया आणि मेक इन महाराष्ट्र ऑलरेडी २०१५ मध्ये राज्यशासनाने महापालिका किंवा नगरपालिका क्षेत्र सोडून जे राज्याचे क्षेत्र आहे. रिझनल प्लान आपण म्हणतो आर्थिक त्यामध्ये जर नॅशनल हायवे आणि ३० मीटर आणि ३० मीटर अबव्ह जर रोड असतील तर तिथे स्टार हॉटेल अनुज्ञेय केलेले आहे. ना विकास क्षेत्रामध्ये २०१५ पासून शहरी भागामध्ये असा काही अजून प्रयोग झालेला नाही. परंतु ह्या विकासकाची मागणी विचारात घेता आणि साधारणतः अंधेरीपासून मला वाटते वसई विरारपर्यंत किंवा आपल्या हद्दीपर्यंत कुठेही स्टार हॉटेल नाही. जर अशा परिस्थितीची वास्तु आपल्या शहरात झाली तर मला वाटते आपल्या शहराचे हे भुषण आहे आणि त्याचा आपल्याला फायदा होईल अशी बाब आहे. उदा. आपल्याकडे ऐसल वर्ल्ड आहे, पॅगोडा आहे. ज्युडीशियल ॲकेडमी आहे, महापालिका आहे. भविष्यात अजून चांगले राज्यशासनाचे उपक्रम येत आहेत. आपल्याकडे मोठ्या प्रमाणात फिल्म इंडस्ट्री वेगवेगळ्या माध्यमातून ह्या ठिकाणी शुटिंग केल्या जातात. आपल्याला माहिती आहे. परंतु अजून शहराला जर वेगळे घेण्यासारखे असेल मला वाटते जी.सी.सी. हॉटेल जर सोडले तर त्याच्यापेक्षा मोठ्या दर्जाचे हॉटेल कदाचित कुणाचे असु शकेल. मला पाहण्यात आलेले नाही. तर ह्यामध्ये जर स्टार कॅटेगरी हॉटेल राज्यशासन इथे अनुज्ञेय करतो. ऑलरेडी केलेले आहे. आणि त्याअनुषंगाने जर शहरामध्ये विकास झाला त्याचा विकास कर मिळेल त्या माध्यमातून लोकांना फॅसिलिटी भेटेल आणि रोजगाराची संधी उपलब्ध होईल हा उद्देश विचारात घेऊन त्याठिकाणी ज्यावेळेस प्रस्ताव मंजुरीसाठी आमच्याकडे दाखल केला विकासाने सुरुवातीपासूनच वन प्लस वन एफ.एस.आय. आहे. म्हणजे जास्तीचे चटई क्षेत्र एक प्रिमियमची मागणी केली होती. शासनाने ज्यावेळेस हा प्रस्ताव मान्य केला. त्यानंतर मी ह्याठिकाणी रुजू झालो. आर.पी. च्या मी सविस्तर अभ्यास केला. आर.पी. मध्ये नो डेव्हलपमेंट झोनमध्ये मॅक्झीमम एक एफ.एस.आय. अनुज्ञेय आहे आणि त्यामध्ये पॉईंट वन एफ.एस.आय हा बेस एफ.एस.आय आहे आणि ९० टक्के प्रिमियम बेस आहे आणि त्याठिकाणी आर.आर च्या ३० ते ३५ टक्के त्याच्या प्रिमियम घेतला जातो. नॅशनल हायवे किंवा ३० मीटर रोड लगतचा तो प्लॉट असला पाहिजे. राज्यात हे हॉटेल कुठेही करता येते तर त्या धर्तीवर हा आपला अनुज्ञेय केलेला आहे आणि आता राज्य शासनाचे याच्यामध्ये वन प्लस वन एफ.एस.आय देता येऊ शकतो की नाही. विकासकाने ८ कोटीचा प्रिमीयम भरण्याची कन्सेप्ट आमच्याकडे दिलेली आहे. त्यात ५० टक्के राज्यशासनाला आणि ५० टक्के महापालिकेला तो निधी भेटणार आहे. पण याच्यावर मा. प्रधान सचिव संयुक्त नितीन करी साहेबांकडे आमची बैठक झाली. आमचे जे रिझर्व्हेशन आहेत आम्ही त्यांच्यासमोर मांडले जरी हा प्रथमदर्शी प्रयोग आहे आणि अशाप्रकारचे मुंबई, बोरीवलीमध्ये राज्यात खुप मोठे प्रयोग झालेले आहेत. बऱ्याच ठिकाणी ४,५,८ एफ.एस.आय पर्यंत ग्रँड झालेले आहेत तर हा प्रयोग करत असताना आम्ही आमचे लिमिटेशन राज्यशासनाकडे मांडले. मी दोन एफ.एस.आय मंजूर केलेला नाही. आर.पी. झोनप्रमाणे मी एक एफ.एस.आय त्यामध्ये अनुज्ञेय करत आहे. तर त्यांची जी महत्वकांक्षा आहे ती दोन एफ.एस.आय आहे मी म्हटले त्यामध्ये आपल्याकडून विशेष आम्हाला आदेश लागतील. तर त्यामध्ये विकासकाने हे दोन एफ.एस.आय त्यांचे महत्वाचे आहे. कारण स्टार कॅटेगरी करायचे असेल तर जास्तीचे त्याठिकाणी विकास झाला पाहिजे. तरच त्याला लाभ मिळू शकतो. तर त्याबद्दलची मागणी आम्ही अमान्य केली. दोन एफ.एस.आय ची इनडायरेक्टली तर त्यांनी राज्यशासनाकडे तो प्रस्ताव सादर केला असता राज्यशासनाने यामध्ये आपल्यासमोर हा गुणवत्तेवर सभागृहात विषय घेऊन याबद्दल आम्हाला अवगत करावे असे लेखी पत्र राज्यशासनाचे आम्हाला आले. त्यामुळे हा विषय सभागृहासमोर आणलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब शहराचा विकास व्हावा ह्या देशाचा विकास व्हावा याच्याबद्दल आम्हाला दुमत नाही. एखाद्या विकासकाला तिथे मोठे तारांकित हॉटेल बांधावे याच्याबद्दल ही आम्हाला काही आक्षेप नाही. परंतु तुम्ही जी जागा सांगत आहात सदरची जागा गेल्या कित्येक वर्षापासून मा. तहसीलदार, मा. न्यायालयाचे गुन्हे दाखल आहेत. सदरची जागेला कुंपण भिंत घालताना मँग्रोजची मोठ्या प्रमाणात तोड झालेली आहे असे गुन्हे दाखल आहेत. असे असताना देखील ह्या महापालिकेमध्ये हा विषय येत आहे आणि हा विषय महापालिका नियमाच्या अधिन राहून ३७ चा आधार घेऊन त्याला आपण हे करतो. तुम्ही जे सांगत आहात त्याच्याबद्दल मला काही बोलायचे नाही परंतु मेक इन इंदिया किंवा तिथे हॉटेल बांधावे याच्याबद्दल मला ओढ नाही परंतु महापालिका एखाद्या जे गुन्हे दाखल आहेत किंवा शासनाचे त्याच्यावर जे म्हणणे आहे ते म्हणणे तुम्ही जर बघितले तर ते जरा तपासून बघा.

**मा. आयुक्त :-**

आपली बाब तपासून घेतो.

**जुबेर इनामदार :-**

मेक इन इंडिया साहेब मुळात हा विषय प्रशासनाने चांगले केले साहेब आणला. कमीत कमी त्याला दिशा तरी मिळेल कारण त्याचे सत्य मी विषय वाचला तेव्हा मला असे वाटले बघता बघता थोडक्यात काही चार लाईनचा तुम्ही गोषवारा देणार. ३७ खाली तुम्हाला ना विकास क्षेत्राला रहिवास क्षेत्र करायचे आहे. इतिहास दिला म्हणून मला चर्चेची संधी प्राप्त झाली.

**मा. आयुक्त :-**

इनामदार साहेब आम्ही छोटा गोषवारा दिला असता तरी तुम्ही आमच्यावर ॲलिगेशन केले असते जसे पाटील साहेबांनी बोलले, काही मुद्दे अजुन अर्धवट राहिलेले आहेत. खरतर त्यासुध्दा समोवश झाले पाहिजे. आम्ही मुख्यतः वस्तुस्थिती सभागृहाला देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

सेव्हन इलेव्हन क्लब विकासकाने प्रस्ताव सादर केला २००८ मध्ये त्याला प्राथमिक मंजुरी देण्यात आली. २०१५ मध्ये मर्यादित बांधकाम परवानगी देण्यात आली त्याच्यानंतर सुधारीत परवानगी आता २०१७ ला त्याला देण्यात आली. २०१७ ची परवानगी माझ्या समोर आहे आणि ती देताना त्याच्यामध्ये तुम्ही बाकीची घेतली आहेत. मी शेवटची घेतो उगाच कशाला मागचा इतिहास उगाच उपसायचा क्लब हाऊस त्या बांधकाम परवानगीवर क्लब हाऊस बेसमेंट प्लस्टर प्लस एक हा पूर्ण परिसर हा ना विकास क्षेत्रामध्ये आहे. कुठल्यातरी विकासकाने हॉटेल बांधावे. तारांकित काय सेव्हन स्टार, फाइव्ह स्टार त्याचे पुढचे अजून असतील तारे तेवढे ही लावावे. ना विकास क्षेत्रामध्येच का? त्याच्याकडे जागा असेल किंवा त्याने तशी जागा विकत घ्यावी आणि शहरामध्ये बांधावी. ना विकास क्षेत्र म्हणजे ह्या शहराची एक गरज असते. धोरण तयार करताना, आराखडा तयार करताना ह्या विषयावर बराच विचार केल्यानंतर शहराची भौगोलिक रचना होणारी वाढ ह्या सगळ्या विषयांना बारकाईने त्याचा विचार करुन त्याचा अभ्यास करुन नाविकास क्षेत्र सी.आर.झेड वनविभाग अशाप्रकारे कामकाज केलेले आहे. हे सर्व बाजूला ठेऊन ते नाविकास क्षेत्रामध्ये स्वस्त जमिन मिळाली असेल. स्वस्त जमिन मिळाल्या म्हणून ती विकत घेतली आणि आता त्याला कुठल्यातरी कारण आपण स्वतः एक स्थानावर आलो आहोत. मी आता कोणाचे नाव घेत नाही. कारण त्या विषयावर माझे बोलणे योग्य नाही. कोणाची जागा कोण त्याचे डायरेक्टर, कोण त्याचा मालक मात्र आपला राजकीय किंवा आपल्या पदाचा फायदा घेऊन त्या परिसराचा नाश करायचा हे योग्य नाही. साहेब नाविकास क्षेत्र ५७ त्याच्यामध्ये क्लब हाऊस याचा उल्लेखच नाही. म्हणजे मुळात दिलेली बांधकाम परवानगी याच्यामध्ये दिलेला क्लब आणला कुठून the following uses are parmicable in a nondeveloped zone NDZ provided however no survice of any can will be provided by the council agriculture, houtry culture, animal afentary expect for keeping animal. On a commercial scale subject to a limit of ten head of a catal pear एकर म्हणजे त्याच्यामध्ये सुध्दा कुठेतरी त्याने आपल्याला बांधून ठेवलेले आहे की किती कुठे काय असायला पाहिजे. त्याला श्वास घेण्यासाठी जागा असायला पाहिजे. त्या ॲन्टीझोनमध्ये एफ.एस.आय. पर्मिकेबल फॉर सच सक्शेल नॉट एक्साईड पॉईंट ३३ हा मुद्दा वाचला साहेब पॉईंट ३३ फॉर वोक ॲग्रीकल्चर हॉर्टीकल्चर, ॲनिमल हस्बेन्टरी. बरेच त्याच्यामध्ये आहे. साहेब क्लब हाऊस कुठे कदाचित पुर्वीसारखा टाऊन प्लॅनर नाही.

**मा. आयुक्त :-**

इनामदारजी त्याच्यापुढे अजून गेलात ना हा उल्लेख आहे.

**जुबेर इनामदार :-**

आहे वाचला मी टाऊन प्लॅनर नाही. मी चूकु शकतो. मात्र मला माहिती आणि त्याचे क्लेरीफिकेशन प्रशासनाकडून हवे आहे. पॉईंट ३३ हा फक्त ॲग्रीकल्चर आणि हॉर्टीकल्चरसाठी आहे. त्याचबरोबर १३ नंबर ५७ चा १३ काय बोलत आहे. A building to be not more than ground of one storage it hiant not acsiding 9.75 miter including the height of the street position it any ground one story street सहित fsi to be not more than 0.2 fare एन्टीव्हिडन्ट प्लॉट ऑफ एरिया अप टू हेक्टर त्याच्यानंतर साहेब सी आला. plot each more than one hector in area. FSI to be zero to four upto 4 hector and their upto be not more than 0.25. For the remaining area of the plot no subdivision of the plot before. याचा अर्थ साहेब विश्लेषण मला जेवढे समजले तेवढे बोलतो. कदाचित चुकले असेल तर महारथी आपल्या मागे आहेत. संचालक आणि टाऊन प्लानर उपस्थित आहेत. त्यांच्याकडून बरेच काही शिकायला मिळेल. पॉईंट टू म्हणजे बी आणि सी याच्यामध्ये बदल नंतर केलेला आहे. शासनाने तो मी वाचून दाखवतो. तो माझ्याकडे आहे. पॉईंट टू पेक्षा जास्त एक हेक्टरच्या आत असेल तर आणि त्याच्यात सब डिव्हीजन नको आहे. म्हणजे मालकाने घेतलेली जागा किंवा तुम्हाला दिलेले सातबारा किती आहेत.

ते तुम्ही शोधण्याचे कारण माझा आरोप याच्यामध्ये स्पष्ट आहे याच्यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला आहे. आता तो भ्रष्टाचार तुम्ही शोधून काढायच्या याच्यामध्ये आहेत. तुम्ही मालक आहात ह्या शहराचे चौकशी अधिकारी तुम्हालाच व्हायला लागणार आहे. कारण विषय ३७ खाली फेरबदलाच्या तुमच्याकडे तुमच्या कार्यकाळात आलेला आहे. म्हणून तुमच्याकडेच ती जबाबदारी येणार आहे. ह्याच्यामध्ये ए,बी,सी मध्ये डी ह्याचा समावेश करण्यात आला. महाराष्ट्र शासनाचा जी.आर होता मी वाचतो regulation be proposed to be added under FSI to be not more than 0.2 FSI त्या जागेवर is proposed to be added under the land alone 4530 miter wide road up to a depth 30 miter in no development zone the developed by residential propose on the conditions डेव्हलपर्सने बरेच काही त्याच्यामध्ये बांधलेले आहे. म्हणजे त्याच्यामध्ये डी आला. ३० आणि ४५ मीटरचा डी.पी. रस्ता असला साहेब डी.पी. रस्ता मुद्दाम बोलतो डी.पी. रस्ता असला तर त्याला याचा फायदा घेता येईल. नो डेव्हलप झोन मध्ये पॉईंट वनचा मात्र हाईट आणि वन प्लस वन हे मर्यादीतच आहे. तुम्ही वन प्लस वन प्लस वन प्लस वन हे करता येत नाही. ते मर्यादीत एक माळ्यापर्यंतच राहील. सर्व काही चित्र स्पष्ट असताना याचा फायदा विकासकाने घेतला. क्लब हाऊस नसताना प्रशासनाने का दिले हा संशोधनाचा विषय कुठेच नाही. क्लब हाऊस विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तुम्हाला दिलेल्या टिप्पण्या त्यावेळच्या काळाच्या टिप्पण्या फाईली उघडा. संच मांडला साहेब कोणी टिप्पणी दिली कोण दोषी आहे. क्लब हाऊस त्याच्यावर आला कसा. सी.सी. वर सुधारीत बांधकाम परवानगीवर क्लब हाऊस हा विषय आला कुठून. ३०४५ मीटरचा विषय आपल्या जागेवर आहे. विकासकाने बांधकाम करताना ती स्थळ पाहणी केली असताना काय निर्देशनात येतो ३० मीटर आणि ४५ मीटर तिथे ३० मीटरचा डी.पी. रस्ता आहे. तो ३० मीटरचा डी.पी. रस्ता त्याला आपला कसा नियम आहे. ३० मीटरपर्यत फक्त ३० मीटरपर्यंत ३० मीटरचा रस्ता असला तर ३० मीटरपर्यंत तो रहिवास क्षेत्र वापरु शकतो. त्याच्यापुढे अकॉर्डींग टू अॅन्टी झोन ना विकास क्षेत्राप्रमाणे तो ३० मीटरचा रस्ता त्याने समोर २६ मीटर सोडलेले आहे आणि फक्त ४ मीटर जे बांधकाम आहे. आजच्या तारखेला त्याला अनधिकृत बांधकाम मी आज बोलणार कारण ते बांधकाम जास्तीचे झालेले आहे म्हणजे ते अनधिकृत झाले आणि त्या अनधिकृत बांधकामाचा संरक्षणासाठी आज विषय प्रशासनाने दिला आणि त्या शासनाच्या आदेशावर दिला. म्हणजे शासन किती उदार झाली. शासनाची पारदर्शक कामकाज करण्याचा मुख्यमंत्री आमच्या ह्या राज्याचे मुख्यमंत्री पारदर्शक कामकाज करतो. ग्वाही देणारे त्यांनी तसे शासनाने पाठविलेले आहे. विषय असा आहे ३० मीटर असायला पाहिजे. समोर सोडून दिलं एक्सप्लेनेशन काय आहे प्रशासनाचे हाईट टेन्शन वॉर्ड तेथुन जातात आम्हाला मान्य आहे पण तुम्हाला हे अधिकार कोणी दिले. तुम्ही हाईट टेन्शन वॉर्डच्या स्थलांतरीत करा. तुमच्याकडे ताकद आहे पोहोच आहे. विकासकाबरोबर जो कोणी असेल कारण इतकी काही कामे हे सर्व चाललेले आहे. कुठेतरी त्याची पोहोच आहे म्हणून चाललेले आहे. तो कोण विकासक आहे मला त्याच्यावरती भाषा करायची आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

विषय ऐसा है महापौर मॅडम हमारे संबंधित हमारे साथी जुबेरजी इनामदार विषय ऐसा है की, यहाँ पे जो प्रस्ताव है मुझे तो यह समझ में नही आ रहा है की उनकी जो शंका है, शंका यह है की प्रशासनने जो मंजुरी दी। वह गैरकानुनी है गलत है। और यहाँ पे जो प्रस्ताव आया है। वह ३७ के फेरबदल का पर मेरा मानना ऐसा है की यदी उनको परमिशन के विषय में जानकारी लेनी है तो टाऊन प्लानिंग में जाके उधर नगररचना का ऑफिस है उधर जाके वह जानकारी ले सकते है। यहाँ पे इस तरह की भाषा की बात कर रहे है की जैसे उनको सारी जानकारी है तो इतने दिनों तक उन्होंने............

**जुबेर इनामदार :-**

जरुरी है विषय आया इसके लिए पुछ रहा हूँ।

**सुरेश खंडेलवाल :-**

सर पुछने के लिए टाऊन प्लानिंग डिपार्टमेंट है। पुछने के लिए सभागृह में आपको प्रश्नोत्तर में आप प्रश्न लेके आइए। यहाँ पे सभागृह का टाईम है इसके लिए वेस्ट मत किजीए। आप सभागृह का टाईम वेस्ट कर रहे है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना विनंती आहे सभागृहासमोर चांगली चर्चा चालू आहे.

**मा. महापौर :-**

आप विषय पे बोलेंगे।

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महापालिका प्रशासनाने विकासकाच्या अनुमोदनाला विनंती आहे. ७/४/२०१६ रोजी एक पत्र प्रधान सचिव एकला पाठविले. त्याच्यामध्ये त्यांनी पूर्ण मुद्दे मांडले. ३० मीटरचा रस्ता आहे. ३० मीटरचा रस्त्याच्या संदर्भात आयुक्त महोदय मी तुम्हाला सांगितले की कुठलीही ते हाईट टेन्शन वॉर्ड काढण्याची परवानगी किंवा ते स्थलांतरीत करायचा प्रस्ताव समोर आणला नाही. सरळ बांधकाम केले २६ फुट सोडून म्हणजे अर्थात सध्याच्या जो बांधकाम आहे तो फक्त ४ फुटामध्ये अनुज्ञेय आहे. म्हणजे ३० मीटर रस्त्याला डी.पी रस्त्याला तो लागून असायला पाहिजे. याच्यासाठी परवानगी पाहिजे. अशी कुठलीही परवानगी नाही रिलायन्सची घेतली पाहिजे किंवा तुमची घेतली पाहिजे. असा कुठेही तसा त्याचा प्रस्ताव नाही. दुसरे हे सर्व चालू असताना प्रशासनाची भुमिका स्पष्ट आहे. प्रशासन एक तारांकीत हॉटेल तयार करण्यासाठी एकाला मदत करण्यासाठी त्यांचा अधिकार आहे त्याचा त्यांनी मांग करावी. प्रशासनाला योग्य वाटत असेल त्याची भुमिका त्याची पॉझिटिव्ह घेऊ शकते. ७/४/२०१६ रोजी पत्र पाठविले. प्रधान सचिव एकला अच्युत हांगे साहेबांचे पत्र आहे. तत्कालीन आयुक्त त्यांनी ते पत्र प्रधान सचिवांनी वेगवेगळ्या विभागाला पाठविले. तो पुण्याला सुध्दा गेला. संचालक डायरेक्टर सर्व टाऊन प्लानिंगचे संचालक त्यांच्याकडे हे पत्र गेले आणि त्या पत्रामध्ये ह्या महापालिकेच्या कामकाजाचे तिथे ताशोरे ओढले. एक शब्द लिहीला आहे. अवाढव्य करु नये काय म्हणणे आहे ते स्पष्ट सांगा. याच्यामध्ये हा उल्लेख केला हे शासनाचे पत्र आहे देता येईल कसे देता येईल वन प्लस थ्री प्लस वन याच्या पलिकडे नाही. म्हणून विषय त्यांनी जो दिला त्यांनी स्पष्ट त्यात उल्लेख केला आहे. शासन वरीलप्रमाणे मार्गदर्शन आपल्याला केलेले आहे. आता महापालिकेने याच्यावरती मागणी मार्गदर्शन अपेक्षिलेले आहे. सदर अर्जातील मागणीबाबत महापालिकेची नेमकी भुमिका काय आहे. सदर विषय नियमाबाबत महापालिका नियमानुसार कोणता अनर्थ पाळत आहे याबाबत कोणती ऊहापोह सदर पत्रात करण्यात आला नाही. पालिका प्रशासन सैराट झाले आहे का? अशाप्रकारे वागते. संचालकांचा साहेब तुमच्यावर ताशोरे ओढले यापत्रामध्ये तुम्ही तितकेच करु शकता याच्या पलिकडे तुम्ही करु शकत नाही. याच्या पलिकडे जाऊन साहेब त्या कामामध्ये चालू असताना ४/६/२०१६ रोजी स्वयंसेवी संघटनेने केलेल्या तक्रारी पोलिस स्टेशनमध्ये झालेल्या मी सी.आर.झेड वरती नंतर येणार आहे. गुन्हे दाखल ह्या सगळ्याच्या अनुषंगाने ते पत्र दिले साहेब. स्टॉप वॉच नोटीस. त्या स्टॉप वॉच नोटीसला आजपर्यंत ती नोटीस जिवंत आहे. यास्तव सदर प्रकरणी खुलासा होईपर्यंत मौजे नवघर २६५ ह्या जागेवर बांधकाम करण्यास स्थगिती देण्यात येत असून या जागेमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करण्यात येऊ नये. सद्यस्थिती ८-१० दिवसामध्ये स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्त्याने एक पत्र पाठविले. पालिकेला आणि त्या पालिकेने पत्राचे उत्तर दिलेले आहे की २०१६ रोजी कामाच्या स्थगितीला स्टॉप वॉच नोटीस देण्यात आलेली आहे. याचा अर्थ हा जो स्थगिती आदेश आहे तो अजून हयात आहे, जिवंत आहे साहेब एक माळ्याची परमिशन असताना ४ माळ्याचे काम चालू आहे. चौथा माळा बांधला जात आहे ना विकास क्षेत्रामध्ये. ना विकास क्षेत्रामध्ये शासनाला वाटले रहिवास क्षेत्र करावे तर किती माळ्याला दिले असते. त्यांनी हे डायरेक्शन पक्के केले याच्या पलिकडे नको. अवाढव्य काम नको आपल्याला इथे थोडेसे काहीतरी करता येईल तेवढे करा. शासनाने साहेब त्याचबरोबर विकासकाने २३/३/२०१८ रोजी ५/४/२०१८ रोजी शासनाकडे पत्रव्यवहार केला की विनंती केली. आम्हाला तारांकित हॉटेल करायचे आहे. ३ नियम वरुन ३२ खाली नविन बनवुन घेऊ शकतो. आपल्या अधिकारात आहे. शासनाची त्याला मंजुरी लागते. हे सगळ काही असताना त्याच्यामध्ये हा स्टेट हायवे आणि राष्ट्रीय हायवे गोषवा-यामध्ये सुध्दा नमुद आहे. राज्यमहामार्ग आणि राष्ट्रीय महामार्गाचा उल्लेख मुद्दाम केलेला आहे. दोन तीन जागेवर त्यांनी ते शासनाने सुध्दा ते केलेले आहे. ५/१/२०१५ चे शासनाचे धोरण आहे. इंन्टीग्रेटेड वेस्ट साईट ॲमिनीटी मे बी परमिटेड टू दी डेव्हलप कॉम प्लॉट्स ऑफ लॅन्ड एरिया मिनिमम एरिया १० हजार म्हणजे एक हेक्टर फॉर इन ॲग्रीकल्चर झोन, नो डेव्हलपमेंट झोन नाविकास क्षेत्र दिले आहे. ॲन्ड नॅशनल हायवेज ॲडव्हिटींग हा शब्द वाचताना मला हे पटले नाही म्हणून मी गुगल महाराजकडे गेलो. ॲड जॉईनिंग लगतच्या असलेला राष्ट्रीय महामार्ग आणि अस्तित्वात असलेले सध्या वादग्रस्त बांधकाम २.७ कि.मी. चे अंतर आहे. गुगल मॅपप्रमाणे २.७ कि.मी चे अंतर असलेल्या अशा बांधकामाला शासनाने सुध्दा ह्या विषयाचा कशाला उल्लेख केला मुद्दाम हा संशोधनाचा विषय आहे.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

तुम्हाला जर वाटत असेल प्रशासनाने काही चुकी केली असेल तर तिकडे तक्रार करा. इकडे करु नका.

**जुबेर इनामदार :-**

१२/४/२०१८ हा रोजनामा आहे. प्रधान सचिवांची सही आहे. मा. मुख्यमंत्र्यांची सही आहे. त्याच्यावरती टिप्पणी आहे. ३०, ४५ मीटर रस्त्यावर तारांकित हॉटेल व्यापार अनुज्ञेय करता येईल का हा प्रस्ताव आहे. तो ओपन, एन.एच, एस.एच वर अनुज्ञेय आहे. प्रस्ताव मान्यतेसाठी सादर. हा विषय कुठेतरी शासन हे कदाचित शासन एवढी मोठी चुक करणार आहे. नितीन करी साहेब प्रिन्सीपल सेक्रेटरी मला तरी वाटत नाही की चुक करतील त्यांची दिशाभुल करण्यात आली आहे. कारण प्रस्ताव इथुन गेला.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम वह बोल रहे है नितीन करी साहब गलत है। में बोल रहा हूँ जो भी गलत है उनपर आप कम्पलेंट करो। आप कर क्या रहे है। मुझे समज में नही आ रहा है बोल क्या रहे हो। यह भी आपको समज में नही आ रहा है। आप बोलते हो शासन गलत है। नितीन करी साहब प्रिन्सीपल सेक्रेटरी वह गलत है आप कुछ भी बोलोगे हम यहाँ सुनने के लिए बैठे है क्या। महापौर मॅडम उनका ठराव होगा तो पढने के लिए बोलो।

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

आपले निवेदन पूर्ण करा. आपल्याला यथायोग्य उत्तर दिले जाईल. प्रकरण काही चुकीचे आहे किंवा चोरी करण्याचे नाही हे चुकीचे आहे हे ठरविण्याचा अधिकार राज्य सरकार करणार आहे. याच्यामुळे आम्हाला येथुन काय पाठवायचे आहे तुमचा ठराव देखील येणारच आहे. परंतु क्रमाक्रमाने बोला मला काही तरी बोलायचेच आहे बोलतो म्हणून बोलु नका.

**जुबेर इनामदार :-**

मी माझे पूर्ण करतो साहेब मी कुठे मध्ये लिंक सोडून बोलत नाही. विषयावरच बोलतो. कोकण विभागीय आयुक्ताने.

**प्रविण पाटील :-**

उपमहापौर साहेब तुम्ही घोडबंदरचे रहिवासी आहात. तुम्हाला ती जागा माहित आहे. उपमहापौर साहेब तुम्हाला सर्व माहित आहे तुम्ही सर्वसामान्य नगरसेवकांना अडचणीत आणु नका.

**जुबेर इनामदार :-**

कोकण विभागीय आयुक्ताने साहेब छाननीला परत तुम्हाला पत्र पाठविले. पुन्हा प्रस्ताव परत पाठविला त्याच्यात काय लिहून दिले. त्याच्यात परत उल्लेख केला. ५७ चा ७ नियम ५१ च्या २ मध्ये तुम्हाला करता येईल. तुम्हाला करायचेच असेल तर ५७,७ च्या तुम्हाला हा विषय ५७-७ प्रमाणे करावे लागेल. कोकण आयुक्तांनी पाठवताना काय सांगितले हा आमचा विषय नाही. तुमच्याकडे पाठवला कशाला तुमचाच विषय आहे. तुमच्या स्तरावर आटपा कारण साहेब हे सर्व काही होत असताना बरेच काही गुन्हे दाखल झाले तो सी.आर.झेड मध्ये येतो. सी.आर.झेड चा विषय आहे. आपला सी.आर.झेड १९९१ साली प्रारुप तयार करण्यात आले. त्याअनुषंगाने आपण आज त्या सी.आर.झेड च्या नकाशाला मान्यता देतो. दुसऱ्या सी.आर.झेड च्या मॅपिंग झालेले आहे. मात्र अजून तो आपल्याकडे मंजूर होऊन आलेला नाही. तो प्रलंबित आहे. आज जी वस्तुस्थिती आहे अजून आलेला नाही येऊ द्या. आमची तयारी आहे. त्याला स्विकारायची आला की त्या पध्दतीने काम करु. पण हा जो सी.आर.झेड आहे. त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी कोणाची? प्रशासनाची प्रशासनाचे मालक तुम्ही म्हणजे तुमचा साहेब किती महत्वाचा याच्यामध्ये भाग आहे. ह्या सी.आर.झेड चा रेफरन्स पॉईंट आहे. म्हणजे संदर्भ बिंदु याअनुषंगाने सी.आर.झेड ची मॉपिंग केली तेव्हा ही संदर्भ बिंदु निश्चित केले का संदर्भ बिंदु हे १२१ आणि १२२ साहेब सध्या असलेल्या बांधकाम हे गुगलचे मॅप आहे. ८० टक्के बाधित आहे हे काही मी बोलत नाही. सी.आर.झेड चा तुमचा अहवाल बोलत आहे. याचा अर्थ केलेला आरोप स्वयंसेवी संघटनेने, सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेला आरोप हे खरे आहेत. हे बिनबुडाचे नाही. क्षेत्र सी.आर.झेड बाधित आहे. कारण त्या जागेवर जाऊन स्थळ पाहणी केली. आपण आता स्थळ पाहणी केली आजच्या तारखेत तर तुम्हाला तिथे मॅंग्रोज दिसतील, कांदळवन दिसेल हाई टाईड लाईन आहे साहेब त्या लाईनच्या नंतर कोण २०० मीटर बोलतो, कोण ५० मीटर बोलतो. आपण ५० मीटर गृहित धरु. तर पूर्ण क्षेत्र ते वादग्रस्त बांधकाम आहे ना. तो त्या सी.आर.झेड ला दोषी आहे. वजावट कोणी केली? सी.आर.झेड ची वजावट मंजुरी देताना केली कोणी? याचा कुठेच काही शोध नाही. साहेब जागेवर जाऊन बोर्ड लावले. त्या बोर्डला किती खर्च केला २४ लाख रुपये खर्च केलेला आहे. त्या बोर्डाच्या मागे म्हणजे पाली, उत्तन, सृष्टी प्रभाग क्र. ५, प्रभाग क्र. १ असे करुन ते बोर्ड उभे केलेले सी.आर.झेड म्हणजे हे क्षेत्र सी.आर.झेड बाधित आहे. त्या क्लब

हाऊसचे बाहेर आहे. मी तुमच्या अधिकाऱ्यांना विचारले अभियंत्यांना विचारले हे बोर्ड तुम्ही उभे केले याचा अर्थ काय? हा इथे सी.आर.झेड संपतो की येथुन सी.आर.झेड सुरु होतो. साहेब ते ३० मीटर जो रस्ता तयार केलेला आहे त्याला आजपर्यंत सी.आर.झेड.ची मंजुरी नाही. त्याची सुध्दा तुम्ही चौकशी करु शकता. त्या ३० मीटरच्या रस्त्याला सुध्दा सी.आर.झेड ची मंजुरी नाही. पूर्ण मिरा भाईंदरमध्ये बोर्ड लावले २८ लाख रुपये खर्च करुन त्या बोर्डाचा फायदा काय? त्याचा केंद्र बिंदू काय तेथुन सी.आर.झेड सुरु होणार की संपणार हे सांगणार कोण? याचे उत्तर कोण देणार? थोडक्यात माझा स्पष्ट आरोप आहे. केलेले बांधकाम त्या सी.आर.झेड मध्येच आहे. अनधिकृत बांधकाम झालेले आहे. याच्यामध्ये मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. दिलेली परवानगीची चौकशी करा. प्रत्येक संच उघडून बघा. कारण याच्यानंतर तुमच्या हातातुन होणारा गुन्हा होईल. दुसरे साहेब आज विषय ३७ खाली आला. मी मुद्दयावर येतो कारण ३७ चा विषय आहे. ३७ घ्यायला लागेल. एम.आर.टी.पी. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ (३७) हा काय म्हणतो? तो काय बोलतो were modification any part of amy proposal maid in the final development plan is of a such nature that it will not change the character त्याचे चरित्र्य बदलणार नाही. चारित्र्याचे अनर्ह करायला निघालो आहोत. ना विकास क्षेत्र मोस्ट इर्म्पोटन्ट पार्ट ऑफ द सिटी. नाविकास क्षेत्र नो डेव्हलपमेंट झोन.

**मा. आयुक्त :-**

विकास योजनेमध्ये चारित्र्य नाही. चारित्र्य माणसात असते. विकास योजनेमध्ये कॅरेक्टर म्हणजे गुणधर्म वापर.

**जुबेर इनामदार :-**

वापरण्यात बदल होत आहे. वापरात बदल होतो ना. हा विषय बदल करायलाच आला.

**मा. आयुक्त :-**

चारित्र्य हा शब्द आहे तो ह्युमन बिईंगशी रिलेटेड आहे असे मला वाटते.

**जुबेर इनामदार :-**

चालेल साहेब. हरकत नाही मलाही मान्य आहे. मात्र ते तुम्ही जे बोलतात की याचा वापर आम्ही वापरात बदल करायला निघालो आहोत. कॅरेक्टर ऑफ सच डेव्हलपमेंट प्लान ऑफ प्लानिंग ऑथोरीटी नेम ऑर व्हेन ऑफ डायरेक्टेड नंतरचा भाग एका महिन्याचा अवधी सजेशन ऑब्जेक्शन त्याच्या नोट्समध्ये सुध्दा स्पष्ट उल्लेख आहे. आपल्याला करता येत नाही तेवढेच नाही तर साहेब ह्या विषयावरती न्यायालयात दावे दाखल आहेत. त्याच्यावरती निकाल दिलेले आहोत. इट इज कॅन युअर मायनर नोटिफिकेशन किरकोळ दुरुस्ती डी.पी. रोड सरळ नाही. ठिक आहे आता घोडबंदरचा विषय वैती साहेबांच्या इकडचा विषय साहेबांनी आणला आहे. किल्ल्यावरचा रस्ता करायचा आहे. आड्याकाळामध्ये त्याचा बदल करता येईल. दॅट इज मायनर नोटिफिकेशन सर एन.डी. झोन एक झोन बदलायचे क्षेत्र बदलायचा अधिकार तुम्हाला ३७ खाली नाही. म्हणून हा विषय तुम्हाला आणलाच नाही पाहिजे होता. प्रथमतः आणलात तिथे तुम्ही साहेब कुठेतरी हा घाणीचे साम्राज्य होणार म्हणून साहेब माझी आपणांस विनंती आहे ह्या पूर्ण प्रकरणांमध्ये चौकशी व्हावी. तुमच्या स्तरावर करु नाही शकलात तर सी.बी.आय ला पाठवा. आम्ही ती मांग करणारच आहोत ती करावीच लागेल.

**मा. महापौर :-**

ठीक है।

**जुबेर इनामदार :-**

लोकांनी आपआपला स्वार्थ काढायचा प्रयत्न करुन भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून साहेब याच्यावरती चौकशी व्हावी अशी मी विनंती करतो.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम मला एक खुलासा पाहिजे होता. तिकडे शैक्षणिक संस्था आहे, कॉलेजेस आहेत, इंजिनिअरींग कॉलेज, शाळा आहेत. छोट्या मुलांच्या तो एक रुल आहे. ज्या शैक्षणिक संस्था असतात तिथे असले काहीतरी बांधकाम आले तर किती अंतर असायला पाहिजे. जेव्हा सेंट अँथन पब्लीक स्कुल २०१२ मध्ये चालू होणार होते तिथे मुले यायला सुरुवात झाली होती. तिथे रस्ता नव्हता. गटार नव्हते. मी विक्रम साहेबांना किती विनंती केली होती एकदम पॉईंट ब्लाईंड रिसियुज केले होते. दॅट इज सी.आर.झेड एरिया विथ कॅननॉट कन्सन्ट एनी थिंग.

**मा. आयुक्त :-**

ताई रस्ता नसेल तर कुणालाही देता येत नाही. रस्ता असेल तरच काही डेव्हलपमेंट अलाऊड होते.

**मर्लिन डिसा :-**

ते गटार आणि हे सगळ मॅडम महापौर होते तेव्हा त्यांच्या परवानगीने ते सजेशन घेऊन बांधुन घेतले होते. सेंट अँथन शाळेच्या मुलांसाठी आणि हे जे फाईव्ह स्टार बांधकाम जे होणार आहे ते विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संस्थाचे किती अंतर असायला पाहिजे ते मला सांगा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय ह्या ठिकाणी विषयांकित ३७ बाबत गटनेत्यांनी दोन चार मुद्दे ह्या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. त्याचा मी आपल्याला सभागृहाला खुलासा करु इच्छितो. आपण संसदी प्रणालीमध्ये केंद्र शासन, राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ग्रामीण आणि शहरी ग्रामीणमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, शहरीमध्ये महापालिका, नगरपरिषद वर्ग १, नगरपरिषद वर्ग २ किंवा पंचायत काऊंसिल कारण आता नविन नगरपरिषदा होतात. पंचायतीच्या आणि त्याशिवाय कन्टॉनमेन्ट बोर्ड अशा पध्दतीचे शासन प्रणाली आहे. आणि लोकल ऑथोरीटी गर्व्हमेंट स्थानिक स्वराज्य संस्था हा शेवटचा गर्व्हमेंट आहे. हे सुपरसेंड बाय स्टेट गर्व्हमेंट आणि स्टेट गर्व्हमेंटला केंद्रशासन तर आता जुबेर इनामदार साहेबांनी जे सांगितलेले आहे ३७ मध्ये ३७ ए हा क्लॉज सेन्शन आहे. पावर ऑफ स्टेट गर्व्हमेंट प्लानिंग ऑथोरीटी परमिट टेम्परराी चेंज ऑफ आणि कुठलाही विकास किंवा नियोजन हे स्टॅटीक्स नसते. आऊट गोईंग असते आणि कालांतराने बदल होणारे असते. हे जर ग्रामपंचायत आपण पाहिले आणि आजची महापालिका पाहिली आमुलाग्र बदल आहे. १९५० ची मुंबई पाहिली आजची मुंबई पाहिली तर आमुलाग्र बदल आहे. याचा अर्थ कुठलाही कायदा करुन तोडावे हा नाही आहे. चेंज हा परमिटेबल असतो. ७ बेट होती आज कुठे आहेत ते बेट. तर यामध्ये वेळोवेळी जे कायद्याने आपण काही गोष्टी मानतो. नो डेव्हलपमेंट झोन हा दोन प्रकारचा असतो. एक नॉट परमिटेड फॉर फ्युचर अलसो आणि काही रिन्युव्हल फॉर फ्युचर असतो. आता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आपण डिक्लेअर केलेले आहे. इट इज रिझर्व्ह तो सुध्दा नो डेव्लपमेंट झोन आहे. पण एखादी नगरपरिषद, एखादी महापालिका असेल आपल्या ७९ कि.मी मध्ये सगळाच यल्लो झोन करत नाही कारण लोक वाटेल तिथे घरे बांधतील पण आपल्याला त्याला ॲक्सेस करणे कॉस्टली होणार लोकांना मेन शहरात येणे कॉस्टली होणार तर कॉम्पॅक्ट सिटी प्लानिंग पहिला असते जिथे गाव असतात तेथील त्याची प्लानिंग सुरु होते आणि शेवटी ती जाते आणि जसा जसा शहराचा विकास होतो तो रिझर्व्ह एरिया दर रिव्हाईज डेव्हलपमेंटमध्ये यल्लोमध्ये ॲड होत जातो. मुद्दा हा समजून घ्या आणि जुबेर इनामदार साहेबांनी जे काही मुद्दे मांडले. प्रेझेन्ट डी.सी.आर आपला हा प्रेझेन्ट डी.सी.आर हा १९९७ चा आहे. फक्त त्यामध्ये २००४ मध्ये काही ऑर्डनियन्स काढून सुधारणा केलेल्या आहेत. तर त्यामध्ये मेजर सुधारणा एकच आहे. जिथे चिफ ऑफिसर आहे तिथे कमिशनर वाचावे जिथे डेफ्टी डायरेक्टर आता त्याची गरज नाही. पण नो डेव्हलपमेंट झोनमध्ये जे काही बाबी आहेत तुमचे सर्व मान्य आहे. हा वेगळा प्रयोग आहे. शासनाने ह्या ठिकाणी तुम्ही काही गोष्टी समजून घेतल्या पाहिजे. कदाचित हा उद्या राज्याला लागू होईल.

**जुबेर इनामदार :-**

नो डेव्हलपमेंट झोनचा का बळी देत आहेत.

**मा. आयुक्त :-**

तो तुमचा हक्क आहे मांडण्याचा पण शासन हा सुप्रिम आहे ॲक्टमध्ये आणि शासन हा कदाचित लार्ज स्किल ऑफ पिपल बेनिफिट असतो. एक व्यक्ती म्हणून कधी नसतो आणि रिझनल झोनमध्ये २०१५ मध्ये शासनाने मान्य केलेले आहे. फाईव्ह स्टार हॉटेल नो डेव्हलपमेंट झोनमध्ये फक्त त्यामध्ये शहरांचा समावेश नाही. आता हाईट ऑफ बिल्डींग स्कोस ऑफ बिल्डींग तुम्ही समजा एक एफ.एस.आय तिथे अनुज्ञेय केला तर त्याला हाईट किती असावी ते अधिकार स्थानिक कमिशनरचे आहेत. ह्या डी.सी.आर मध्ये सेक्शन आहे. जर तो एफ.एस.आय. कन्झ्युम होत नसेल आणि तुमच्या मंजूर डी.सी.आर मध्ये जर लिमिट असेल तर त्याला फायर सेफ्टी हेल्थ सेफ्टी, पब्लीक सेफ्टी ह्या गोष्टी विचारात घेऊन कमिशनर ॲज पावर टू डिसाईड हाईट्स असे नंबर ऑफ सेक्शन आहेत. आपण एखादे सेक्शन वाचून तिथे त्याला सिमित केले आणि तुम्ही ३० मीटर म्हणलात ॲट जॉईनिंग रुट साईट मार्जिंग सोडल्यानंतर काय १० फुटात काय हॉटेल बांधणार. वेदर इट इज प्रॅक्टीकल हा सुध्दा कन्सेप्ट आहे हे समजून घेण्याचा.

**जुबेर इनामदार :-**

ग्राऊंड प्लस वन साईट मार्जिंग किती असतो?

**मा. आयुक्त :-**

पर्सनली कायदे हा त्या-त्या वाक्यापुरता वाचले तर त्याचा ग्रास अर्थ निघत नाही. आपल्याला खोल कायदे वाचावे लागतात. आपण जे जे म्हणालात ते १०० टक्के सत्य आहे. जर ही अनुमती नसेल

तर राज्य शासनाने स्टार कॅटेगरी अनुमती दिली नसती तर ते तुमचे मान्यच होते. कोणी गैर करणार नाही. उद्या समजा हे हॉटेल सोडून दुसरा माझ्याकडे आला नो डेव्हलपमेन्टमध्ये मला ही हॉटेल बांधायची परवानगी द्या मी तुम्हाला खंबीरपणे सांगतो मला देता येत नाही. कारण कायद्यात तरतुद नाही. ह्या प्रकरणाला शासनाने विशेष अनुमती दिली तशी कोणीतरी ती अनुमती आणावी लागेल किंवा ह्या डी.सी.आर मध्ये सुधारणा करावी लागेल. तेव्हा मला जनरलाईज ते देता येईल. हा सुध्दा महत्वाचा मुद्दा आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब अनुमती देता आली नाही म्हणून त्याला तुम्हाला ३७ खाली हा विषय आणला की रहिवासी क्षेत्र करा. साहेब बोलताना हा विषय कसा आहे तुम्ही अनुभवी आहात. तुमच्याकडून खतगावकर साहेब आम्ही शिकलो आहोत. म्हणून बोलतत्ना तो विचार करा.

**मा. आयुक्त :-**

मला २-३ मुद्दे तुमचे क्लीअर करायचे आहेत. तो आर.पी. चा झोन हा राज्याचा पूर्ण निर्णय आहे. आणि ह्या ठिकाणी तुम्ही जे मुद्दे मांडलेले आहेत ते नो डेव्लपमेंट रिलेटेड मुद्दे मांडलेले आहेत. हे नो-डेव्हलपमेंट झोनमध्ये दिलेले रिलॅक्सेशन आहे. शासनाने तर यामध्ये आम्ही ते २ एफ.एस.आय. चे करता येत नव्हते. तो एक एफ.एस.आय. धीस एफ.एस.आय फ्रॉम टू अॅन्ड पॉईंट ८ एफ.एस.आय. विथ प्रिमीयम. हा निर्णय आम्ही घेतलेला आहे. आता जर विकासकाला जास्तीचा एफ.एस.आय. लागत असेल तर शासनाने जे आपल्याला निर्देश दिलेले आहेत. ते ३७ करणे क्रमप्राप्त आहे आणि ह्या ठिकाणी तुम्ही जे स्टॉप वर्क म्हटलेले आहे आणि सी.आर.झेड तर हा सब्जेक्टेड फ्लॅट २३२५८ स्क्वेअर मीटरचा आहे. आणि त्यामध्ये ४८८० हा सी.आर.झेड प्रोटेक्टेड आहे आणि ते अबाधीत ठेवलेले आहे. आणि त्यामध्ये माती भराव झाल्यामुळे त्यावेळेस त्याला स्टॉप वर्क किंवा त्याला काम न करु नये कम्पाऊंड बांधण्याचे काम होत होते. त्याठिकाणी करु नये असे आदेश आहेत आणि हा जो विकास आहे. सी.आर.झेड सोडूनचा आहे आणि तुमचा दुसरा मुद्दा होता की यामध्ये डेफ्टी डायरेक्टर टाऊन प्लानिंगचा २००४ च्या अधिनियमामध्ये शासनाने मॉडीफिकेशन केलेले आहे. नगरपालिका असताना त्यामध्ये डेफ्टी डायरेक्टरचा रोल होता पण कार्पोरेशन झाल्यानंतर डेफ्टी डायरेक्टरच्या लेव्हलचे आपल्याकडे ए.डी.टी.पी. असल्यामुळे परत त्याला घ्यायची गरज नाही. परंतु मी इनसिस्ट करत होतो. आपल्याकडे स्टार हॉटेलला कमिटी आहे. एम.डी, एम.टी.डी.सी., पोलिस कमिशनर आणि डेफ्टी डायरेक्टर पण २००४ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणामध्ये डेफ्टी डयरेक्टर हा शब्द वगळलेला आहे. तर ते डेफ्टी डायरेक्टर तयार होत नव्हते. तुम्ही आम्हाला कशाला हे करत आहेत. तुमच्याकडे आमची यंत्रणा आहे तुम्ही ते निर्णय घ्या मी तुमची वस्तुस्थिती खुलासा करतो. याबाबतीत प्रधान सचिवांकडे बैठक झाल्यानंतर त्यांनी प्रचलित नियमानुसार तुम्ही पॉईंट टू एफ.एस.आय इट इज बेस्ट आज आपण ते पॉईंट ३३ दिलेले आहे. जिमनॅशीयम तुम्हाला मी सांगतो ५७ च्या ५ मध्ये आहे.

**जुबेर इनामदार :-**

क्लब हाऊस कुठे आहे?

**मा. आयुक्त :-**

जिमनॅशियम.

**जुबेर इनामदार :-**

जिमनॅशियम आणि क्लब हाऊसमध्ये फरक असु शकतो.

**मा. आयुक्त :-**

नामाचा उल्लेख पेक्षा तिथला वापर महत्वाचा आहे.

**जुबेर इनामदार :-**

जिमनॅशियम का दिला मुद्दाम दिला जिमनॅशियम.

**मा. आयुक्त :-**

आता तर शासनाने २०१७ मध्ये त्याठिकाणी.

**जुबेर इनामदार :-**

साहेब त्याच्यामध्ये दारु विकली जाते, जिमनॅशियममध्ये दारु विकली जात नाही.

**मा. आयुक्त :-**

आता तिथे काही विकले जात नाही.

**जुबेर इनामदार :-**

म्हणून क्लब हाऊस दिला.

**मा. आयुक्त :-**

काहीच विकले जात नाही.

**जुबेर इनामदार :-**

काहीच विकले जात नाही. उद्या विकले जाईल.

**मा. आयुक्त :-**

आता शासनाने स्टार अलाऊंडच केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब अलाऊड केले नाही. तुमच्याकडे पाठवून दिलेले आहे ३७ खाली करा आणि पाठवून द्या. मग विचार करु.

**मा. आयुक्त :-**

एक एफ.एस.आय ला स्टार अलाऊडच केलेले आहे. मी आपल्याला खुलासा देऊ इच्छितो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

हा ३७ आपण अंतिम करु शकत नाही. आज आपला ठराव झाला तर उद्या त्याला सजेशन ऑब्जेक्शन राहणार. सजेशन ऑब्जेक्शन नंतर तो अधिकार महासभेचा असतो.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय आपल्या निदर्शनास आपल्याला अवगत करणे जरुरी आहे. तुम्ही आज कमिशनर होऊन आलात याच्याआधी आम्ही तुमच्याबरोबर काम केलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

शासनाचे निर्देश सभागृहासमोर ठेवणे आमचे कर्तव्य आहे. आम्ही सभागृहासमोर ते ठेवलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

१९/२/२०१८ चे पत्र आहे. महाराष्ट्र शासन प्रति, आयुक्त महानगरपालिका मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सेव्हन इलेव्हन हॉटेलच्या त्यासाठी केलेला पाच रस्ता बांधुन बांधुन पर्यावरणाचा ऱ्हास बाबत पत्र आलेले आहे. त्याच्यामध्ये शेवटचे वाक्य वाचतो. उपरोक्त निवेदनात नमुद केलेल्या मुद्दयाचा सविस्तर चौकशी करुन केलेल्या कारवाईचा अहवाल मा. पर्यावरण मंत्री यांना सादर करावयाचा आहे. तरी याबाबत अहवाल प्राप्त होईपर्यंत कोणतीही परवानगी देऊ नये. याच्यामध्ये त्यांना माहित असते की, स्टॉप वर्क नोटीस दिली तर कदाचित हे पत्र दिले नसते. साहेब हे सर्व काही तुमच्या समोर जगजाहिर पध्दतीने सभागृहाच्या मिनिट्समध्ये आणलेले आहे. चौकशी करा केल्यानंतर करा. तुम्हाला ३७ खाली पाठवायचे असेल तर पाठवा. आम्हाला काही ऑब्जेक्शन घ्यायचे ते आम्ही घेऊ.

**मा. आयुक्त :-**

नाही शासनाचे निर्देश सभागृहासमोर आणणे आणि सभागृहाचा निर्णय शासनाला देणे हे माझे कर्तव्य आहे.

**जुबेर इनामदार :-**

याच्याआधी गेलेले पत्र म्हणून तर बोलतो साहेब त्यांचे संच मागवा आणि बघा काय त्याच्यामध्ये उल्लेख केलेला आहे. काय दिशाभूल शासनाची केलेली आहे. म्हणून त्यांनी पत्र पाठवले.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**गिता जैन :-**

साहेब खुप काही इनामदार साहेबांनी बोलले म्हणून मला काही जास्त बोलायचे नाही. फक्त एकच विचारायचे आहे यांचे जे बोलणे होते. त्यामधून वांरवार ग्राऊंड प्लस वन एफ.एस.आय. ग्राऊंड प्लस वन मग नेमके काय ग्राऊंड प्लस वन आहे, २ आहे, ३ आहे, ४ आहे काय आहे.

**मा. आयुक्त :-**

मामुली बांधकामामध्ये सिल प्लस ग्राऊंड प्लस वन आहे. जे नो डेव्हलपमेंटमध्ये अलाऊड आहे. ते आहे त्यांनी ते बरोबर मांडलेले आहे. पण शासन तिथे स्टार कॅटेगरी अलाऊड केले आणि एक एफ.एस.आय दिला तर कमिशनरला अधिकार आहे. त्याची हाईट ठरवण्याची प्रोव्हाईडेड तो एफ.एस.आय. कमी होण्याबाबत.

**गिता जैन :-**

तुम्ही त्या अधिकाराचा वापर कधी करणार.

**मा. आयुक्त :-**

वापर करणार जस हॉटेल होईल तसा.................

**गिता जैन :-**

तुमची जी नविन सी.सी. आहे ग्राऊंड प्लस २,३,४ ची असेल.

**मा. आयुक्त :-**

ते शासनाचेच मान्य केलेले आहे.

**गिता जैन :-**

आपण येथुन सी.सी. दिली की नाही फक्त तेवढे विचारले.

**मा. आयुक्त :-**

मी तेच तुम्हाला सांगत आहे वन एफ.एस.आय करायची त्यांची जी हाईट रिलॅक्सेशन करुन त्यांनी ती मान्य केलेले आहे.

**गिता जैन :-**

साहेब आपण पत्रव्यवहार करताना तिथे कांदळवन होते, मँग्रोज होते. त्यावर गुन्हे दाखल केले हे सर्व त्याच्यात नमुद केलेले आहे का?

**मा. आयुक्त :-**

ह्या प्रकरणामध्ये गुन्हे दाखल आहेत. सी.आर झेडचे ते गुन्ह्याचे अधिकार कायम ठेऊन त्या विकासकाला जो फाईनल निर्णय होईल तो सब्जेक्टेड अधीन हे कामकाज असते. कुठल्याही गुन्ह्याचा निर्णय होईपर्यंत तो गुन्हा लॅप्स करण्याचा अधिकार इम्प्लीमेंट ऑथोरीटीला नसतो त्याची जबाबदारी त्या विकासकावर असते. आणि त्या परवानगीमध्ये ती अट नमुद केलेली आहे.

**गिता जैन :-**

साहेब जसे यांनी गुगल मॅप बघितला मी ही बघितला तर गुगल मॅपमध्ये अजुनही तिथे कांदळवन दिसत आहे. जस्टीस ओक आताच आलेला निर्णय तुम्हाला ही माहित असेल नसेल तर मी सभागृहासमोर वाचुन दाखवते. त्या ऑर्डरच्या मी ए चा ३ वाचते. पूर्ण ऑर्डर मी वाचत नाही. दोन तीन जे महत्वाचे मुद्दे आहेत ते मी वाचते. Regardners ownership of the land having mangrose and a area of the land all construction take in place with in 50 mitter on all site of mangroves area shall be for with stop the area 50 mitter shall be crept free of construction accept construction of a compound wall no development permission what save shall be should by any authority in the state of Maharashtra and respect of any area under mangroves all authorities incliding the planning authorities shall not that all mangroves lands is respectable feet for area will fall in CRZ. One as per both crz notification of 1991 and 2011 in case of all mangroves areas of thousand square mitter or no a buffzone of 50 mitter a long the mangroves will also be a part of CRZ one.

**मा. आयुक्त :-**

त्यांची अंमलबजावणी पूर्ण राज्यात केली जाते. आपल्याकडे सुध्दा केली जाते.

**गिता जैन :-**

साहेब फक्त बघुन घ्या मी वाचते. ते योग्य वाटले तर ओकचा निर्णय आहे. We a direct that it is obligation of the state to replant distracted mangrove and to restore mangroves areas which are illigaly reclent said areas shall be restore twits original condition the committee should identity the honorable the mangroves the areas in the state and direct its come to survilance by the police forest guard, security guards of Maharashtra security corporation the committee shall and show the daricate and are irected for preventing the entry of vehicals in search wallnrable areas.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये त्याचे एखादे ब्रीज बांधायचे आहे. एखादा मोठा रस्ता करायचा आहे. तर शासनाला कम्पन्शन असेल. तर तो रिॲबीलीट केला पाहिजे. आता आपले जे सी.आर.झेड बाधीत ११ नाले आहेत. आपण त्यातले मँगोज रिॲबिलेटसाठी परवानगी मागितलेली आहे.

**गिता जैन :-**

The commercial and should the criminal law is said in notion against all those who comit offainsase punishable under section 50 of the say dect of 1986 it observe in the judgement. साहेब आता मला एक सांगा इथे क्रिमीनल ऑफेन्स कोणी परवानगी दिली त्यांच्यावर आहे. आज तुम्ही ह्या महासभा पुढे परवानगीला मात्र ३७ अ मध्ये असेल तरी पण तिथे मँग्रोज होते. गुगल मॅप आजही दाखवत आहे. म्हणजे तुम्ही आमच्या खांद्यावर बंदुक धरुन आमच्या सगळ्यांवर क्रिमीनियल ऑफेन्स करुन तुम्हाला हे पास करुन घ्यायचे आहे का? साहेब मी इंग्लीशमध्ये वाचले आहे. एवढे सोपे इंग्लिश तुम्हालाही कळते.

**मा. आयुक्त :-**

मॅंग्रोज सब्जेक्टेड डेव्हलपमेंट आपल्याला जिथे करायचे असेल आणि पब्लीक इंटरेस्टमध्ये तर त्याला सी.आर.झेड ची विशेष परवानगी घ्यावी लागते आणि त्या बदल्यात ते मॅंग्रोज आपल्याला इयर्स विथ फॉरेस्ट कन्सेन्स...............

**गिता जैन :-**

Is not all were it should be restore by…….

**मा. आयुक्त :-**

आता मला इथे ब्रीज बांधायचा आहे तिथे कसा रिस्टोअर करता येईल. त्याचा प्रोटेक्शन करुन तेवढा एरिया आपल्याला दुसरीकडे डेव्हलप करावा लागतो.

**गिता जैन :-**

तसे सबमीशन आपल्याकडे आहे का? मग तिथे गुन्हा का नोंदविला मॅंग्रोज नष्ट झाले म्हणून.

**मा. आयुक्त :-**

त्या गुन्ह्याचे कन्फ्युजन काय येईल ते त्या विकासकाला बांधील आहे.

**गिता जैन :-**

बांधील आहे पण तिथे गुन्हा आपण नोंदविला. एफ.आय.आर झाली आणि तिथे परमिशन नाहीच आहे.

**मा. आयुक्त :-**

सी.आर.झेड मध्ये कोणी कम्पाऊंड करते व कोणी भराव करते तर त्याला त्याच्यावर गुन्हा होतात आणि तो गुन्हा पोलिस अंडर आणि कोर्ट अंडर आहे. त्याचा जो निर्णय होईल तो त्यांना कम्पलसरी आहे.

**गिता जैन :-**

साहेब ती परमिशन आमच्याकडून कशाला इथे.

**मा. आयुक्त :-**

सी.आर.झेड एरिया सोडूनचा हा प्रस्ताव आहे. सी.आर.झेड आम्ही हे ३७ प्रस्तावित नाही करत.

**गिता जैन :-**

सी.आर.झेड सोडून दर्शवत आहात. तिथेही गुगल मॅपप्रमाणे मॅंग्रोज होते. ते साबीत झाले आहे. तुम्ही गुगल मॅप स्टडी केली का? आपण परमिशन देताना तिथे मॅंग्रोज होते ते स्टडी झाले आहे का? आताच जुबेर इनामदारांनी सांगितले तिथे गुगल मॅप आता त्यांनी दिलं तिथे परमिशन द्यायच्या आधी कोण जाऊन स्टडी करुन आला आहे का तिथे मॅंग्रोज होते की नाही. मग आपण परमिशन दिली कशी?

**मा. आयुक्त :-**

मॅपप्रमाणे तिथे मॅंग्रोज होते. कोण सर्टिफाय केले नाही आणि कुठला डॉक्युमेंट आहे मला द्या आपण त्याच्यावर विचार करु. हे बोलुन नाही चालत.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

गुगल मॅपवर काय परमिशन देतात का?

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

ह्या सभागृहात हा विषय आणताना स्पष्ट म्हटलेले आहे की, भागशः सी.आर.झेड आणि जो सी.आर.झेड ने बाधीत आहे त्याच्यात कुठचीही परवानगी मागितलेली नाही किंवा तसा विषय देखील नाही या विषयात प्रशासनाकडून आपली भूमिका स्पष्ट करण्यात आली. आपले अजून काही प्रश्न असतील ते प्रश्न विचारा वेळ काढायचा म्हणून प्रश्न विचारण्यापेक्षा तुमचा ठराव असेल तर ठराव मांडा अजून ज्यांना काही सुचना करायच्या असतील त्या सुचना प्रत्येकाला करू द्या, परंतु ती थोडक्यात करावी.

**रवि व्यास :-**

धन्यवाद महापौर मॅडम। मॅडम जैसे की यह जो विषय लिया गया है। प्रशासनने एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ सेक्शन ३७ के अंतर्गत लिया गया है। जोकी हमारा जो कानुन जिसकी अनुमती दे रहा है। उसी हिसाब से लिया जा रहा है। तो इस विषय के अंदर कुछ भी गलत नही हो रहा है। सबसे पहली बात और आज मुझे जुबेर भाई से यह सिखने मिला की, किस तरीकेसे आधा सच बोलकर झूठ को गलत साबीत किया जाता है यह मुझे सिखने को मिला है।

(सभागृहात गोंधळ)

**रवि व्यास :-**

महापौर मॅडम, यह जो डी.सी. रूल की बुक है। यह हमे महानगरपालिका से सभी नगरसेवको को फ्री में मिलती है। जुबेर भाई ने यही बुक के अंदर १-२ लाईन बताई और इस तरीके से पेश किया की नो डेव्हलपमेन्ट झोन में जो ॲक्टीव्हिटी परमिश्नेबल नहीं है। वो हमने जबरदस्ती हम लोग इललिगल तरीके से हम लोग यहा पे पास कर रहे है। इन्होंने पहली लाईन बताई की, ॲग्रिकल्चर हूवा, हॉर्टीकल्चर हूवा ह्युमन हसबन्ड्री इसके अलावा किसी चिजकी अनुमती नही है। लेकिन उसी पेज पे अगर आगे पढेंगे तो उसी सेक्शन के अंदर क्लॉज ५ के अंदर सबक्लॉज ई के अंदर स्ट्रक्चर फोर एमसिडरी ॲक्टीव्हिटी सच ॲज ॲडमिनीस्ट्रेटिव्ह ऑफिस एक्झीबिशन हॉल, ऑडिटेरियम, रेस्टॉरेन्ट, स्पेसिफिकली यह कहा गया है। रेस्टोरन्ट है, ओपन थिएटर है, इसेन्शीयल स्टाफ कॉटर है, स्टोर बिल्डींग है, फास्ट फुड ॲन्ड चौक है, म्युझियम है, सोल्युलर है, थिएटर शॉप, मॉल्स है। एम्सीडरी स्ट्रक्चर है, स्विमींगपुल है, मे बी परमिटेड।

**मा. आयुक्त :-**

हे सर्व वाचले पाहिजे.

**रवि व्यास :-**

तो यह सारी चिजे डी.सी रुल में लिखी गई है। तो आप क्यों गुमराह कर रहे हो। जुबेर भाई आपको जितना अच्छा बोलना नही आता है प्रेझेन्टेशन आपके जितना नही है। लेकिन लॉ की थोडी जानकारी हम लोग भी रखते है। मुझे यह फिरसे बोलने की जरुरत नही थी, लेकिन बोलना इसी लिए पडा क्योंकी जिस लोगो को इस विषय की जानकारी नही उन्हें तो यह लगेगा हम लोग कितना गलत काम कर रहे है। खतगावकर साहबने इस विषय पर बहुत ही क्लिअर जानकारी दी है इसके अंदर कोई भी पॉईंट ऐसा नही है जो उन्होंने बाकी रखा। इललिगली टेक्नीकली लेकिन जैसे की इन्होंने परमिटेबल पर्सन है उनकी एक बोलने की मर्यादा है। इसके लिए वह क्लिअर कट इसका जवाब यह नही हो सकता है की, जुबेर भाई जो आपने बोला है वह गलत बोला या फिर आप बोल रहे है वह इसके संबंधित नही है। लेकिन यह चिज का खुलासा करते है। दुसरा विषय ऐसा था की, जुबेर भाईने सी.आर.झेड का एक मॅप दिया उन्होंने कहाँ की यह जो कन्स्ट्रक्शन हो रहा है, वह सी.आर.झेड में हो रहा है। मैंने भी इस चिज की क्लिअर कट जानकारी ली जो कन्स्ट्रक्शन हो रहा है वह सी.आर.झेड में हो रहा है की नही हो रहा है? तो वह ऑफिशिअली नगरपालिकाने लिख के दिया की, यह एरिया सी.आर.झेड से इफेक्टेड नही है। तो ऑन रेकॉर्ड नगरपालिका बोल रहे है की यह चिज सी.आर.झेड में नही है। तो हम लोग सभागृह के अंदर झुट क्यों बोल रहे है? महापौर मॅडम आपसे विनंती करता हूँ, अगर कोई भी सदस्य चाहे वह हमारी पार्टी का हो, दुसरी पार्टी का हो अगर ऑन रेकॉर्ड कोई भी गलत बात बोलता है, तो उसके खिलाफ आप स्ट्रीक्ट ॲक्शन लिया जाए और इस सभागृह के अंदर सस्पेंड किया जाए। दुसरी बात मैं यह कहना चाहूँगा की, वहाँ पे प्रत्यक्ष जब सेम प्रोजेक्ट थी परमिशन है वह कलेक्टर डिपार्टमेंट ने दि है। शासन ने इसको मंजुरी दे दी गई है। महापालिका ने उसको सी.सी. दी गई है। वहाँ पे कन्स्ट्रक्शन का काम चालु है, और हम लोग वहाँ पे बोल रहे है की वहाँ पे मँग्रोज है। कहाँ है मॅग्रोज? और इसके अंदर कोई एफ.आय.आर दाखल भी हो गया अभी मुझे दो दिन पहले सदस्य ने मेरे पुराने मित्र राजू गोयलजी उन्होंने मुझे एक पत्र भेजा की, यह आप विषय पास करोगे तो आपके उपर एफ.आय.आर हो जाएगी तो मैंने बोला की कही देखते है। मेरे मित्र बोले की व्हेरीफाय कर लेंगे। वह सही के अंदर इस तरीके से कुछ गलत काम हो रहे है क्या तो सारी चिजे देखी इसके अंदर कही पर भी कुछ भी इस तरीके से कुछ भी नही दिखाया गया है। महानगरपालिकाने कही उल्लेख किया है नाही किसी पुलीस डिपार्टमेंटने सेम सर्व्हे नंबर का उल्लेख किया है। मेरी एक चिज यह समझ में नही आती है। जिस राजीव गोयलजी के उपर एक्सटेन्शन की एफ.आय.आर सेम प्लॉट पे की गई है। यही राजीव गोयलजी हमें इस तरीके के ऑन रेकॉर्ड लेटर भेजते है। सारे नगरसेवक को ठिक है हाला की यह व्यक्तीगत विषय है।

**मा. आयुक्त :-**

यह सभागृह की बात नही है। उसका क्या मतलब है।

**रवि व्यास :-**

साहब कैसा है की हमारी पार्टी की छबी इससे खुलती है। इसके लिए हमें यह सारी चिजे बोलनी जरुरी है। दुसरी बात मैं यह बोलना चाहता हूँ की, इसके पहले कुछ सालो पहले १९६६ ॲक्ट का यह जो सेक्शन है यह ३७ का प्रस्ताव पहले भी आ गया है। मुळ प्रस्ताव का हमारे प्रस्ताव में तो कम से कम शासनने हमें परमिशन दी है। शासन ने महापालिका को कहाँ है की, इसके उपर आपका अभिप्राय

लिजीए। यहाँ पे ऐसे भी प्रस्ताव लिए गए है। महापालिका से बिना शासन के अभिप्राय लिए उनकी परवानगी ली। हम लोगोने यहाँ पे हॉस्पीटल बांध दिए, रिझर्व्हेशन में फेरबदल कर के।

**मा. आयुक्त :-**

मेरी विनंती है यह विषय का नही है.........

**रवि व्यास :-**

कमिशनर साहब मैं आपसे विनंती करुंगा मैं महापौर मॅडम की परवानगी से बोल रहा हूँ। कमिशनर साहब आप कृपा करके बिच में मत बोलिए।

**मा. महापौर :-**

उनको चर्चा करने दिजीए।

**रवि व्यास :-**

मैं यह कहना चाहता हूँ की, उमराव हॉस्पीटल हालाकी मुझे यह बोलना नही चाहिए था, लेकिन जब इन डायरेक्टली हमारे किसी व्यक्ती पर अगर टीका टिप्पणी होगी तो उसका जवाब देना हमारा कर्तव्य बनता है। मैं यह कहना चाहूँगा की उमराव हॉस्पीटल का जो शासन के निर्णय के उपरोक्त किया गया है। ३७ के अंतर्गत फेरबदल करके जो उमराव हॉस्पीटल की परमिशन ली तब यह कहाँ गया था की, २० पॅसेज उसके जो बेड है, वह महापालिका के ताबे में रहेंगे। जो भी पेशंट रहेंगे उनको फायदा मिलेगा लेकीन आज मै आपको पुछता हुँ क्या वोकार्ड हॉस्पीटल के अंदर किसी भी नगरसेवको को ५ टक्का डिस्काऊंट मिलता है। या किसी भी पेशंट का फ्री में इलाज किया जाता है। कमिश्नर साहब क्या आपके पास भी २० टक्का बेड है? मरीजो को फ्री मे इलाज किया जाता है। आप बताईये है या नही है। आज मिरा भाईंदर के अंदर फाईव्ह स्टार हॉटेल अगर बनने जा रहा है तो हमारे शहर मे वह चार चाँद लगाने जा रहा है। इसके अंदर कोई गलत चिज नही है। मैं यह कहना चाहता हूँ की अगर इसके अंदर कोई भी उल्लंघन हो कमिश्नर साहब तो जरूर उस पर कारवाई किया जाये। लेकीन अगर इस मे कोई भी उल्लंघन नही किया जाये यह लॉ के हिसाब से सारी परमिशन हो रही है, तो शहर के दृष्टीकोन से, विकास के दृष्टीकोन से जो हमारा लक्ष जिस गती से आप भी काम कर रहे है। जिस गती से भारतीय जनता पार्टी और बाकी महापौर मॅडम काम कर रहे है, उस गती से इस विकास के रथ को आगे बढाया जाये और सहकार्य किया जाये धन्यवाद।

**राजेंद्र जैन :-**

कमिश्नर साहब ने बोला की, इस विषय का विषयांतर नही किया जाये मेरा यह कहना बहूत जरूरी है की हम ५० बेड का हॉस्पीटल नही कर सकते है, लेकीन हमने यह जो सन २०१० का यहाँ पर मेरे पास रिकॉर्ड पडा है की मैने बोला था उस समय की अखबार मै चर्चा आयी थी की बडे बडे हॉस्पीटल के अंदर पेशंट जाते है। उसका युज नही होता है। उस समय भी मैने लास्ट दो मिटींग मे मैने आप ही साहब यहापर डिस्कस किया हूँआ है, की वोकार्ड का यूज हम नही कर पा रहे है, तो आपने कहा था गंभीर विषय मे इसपर चर्चा करुंगा पर दुःख की बात यह है की अभी तक इस पर कोई फैसला नही हूँआ है। मॅडम विषयांतर नही है। इस विषय की बात है, जिस रुल अंदर हमने उनको जमीन दी आगे गलत होगा फिर हम देखेंगे लेकीन जो हो चुका है, इससे उन्होने जो बोला हूँआ है। वो हम करेंगे कमिश्नर साहब ने बोला है। हम कमिटी बनायेंगे। १० साल पहले मॅडम बोला हूँआ है, ८ साल पहले कमिटी बनायेंगे, सिस्टीम धारण करेंगे, ४० टक्का बेड बंधनकारक है। खूला रखना लेकिन अभी तक उस पर कारवाई नही हो रही है। तो मेरी आपसे रिक्वेस्ट है आप पहले काम यह किजीए यह हम ५० बेड नही कर सकते है। वहाँ २०० बेड है। हम किसी भी पेशंट को फॅसिलिटी नही दे पा रहे है। वहाँ पर स्ट्रक्चली केअर हमारे साधन दिए हमने शर्ती दिए इस शर्त पर जमीन दी है की, यह हॉस्पीटल बांधी है। लेकिन हमारे लोगो को फॅसिलिटी मिलनी चाहिए। अभी भी छोटी डिलीव्हरी के लिए, सिजर के लिए नायर भेजना पडता है। हार्ट के ऑपरेशन हो नही पाते है। ऑपरेशन नही हो पाते है सिर्फ ओ.पी.डी. के अंदर हलके से करने से उनको ४० टक्का बेड रिझर्व्ह करना पडेगा। मैंने लास्ट टाईम बोला था की, डॉ. रमेश जैन खुद मैंने जब फोन किया जो वह बोले हमारे पास बेड नही है। कम्पलसरी ४० टक्का बेड रिझर्व्ह करना चाहिए और जुबेर इनामदार साहबने जो बात बोली यह टेक्नीकली बात बोली। मैंने लास्ट भाषण बाजी से बोला था पिछली बार मिटींग में तो वह बोले ठिक है। आप ॲक्शन किजीए जब यहाँ इतना कानुन लगाते है तो आप भी बोलते मेन्शन कर लेते थे। मुझे बोलते है आप इस चर्चा का मेन्शन कर लिजीए। कानुन की बात आप करते है तो कानुन का पालन करवाईए ना साहब।

**मा. महापौर :-**

ठिक है।

**मा. आयुक्त :-**

ह्या विषयामध्ये जे महापालिकेने किंवा राज्य शासनाने सवलत दिलेली आहे. त्याचे कार्यपालनसाठी आपले पदाधिकारी आणि गटनेत्यांची आणि त्यांचे मॅनेजमेंटचे लोक बोलवून एकदा मिटींग घेऊन ते कार्यपालन आपण करुन घेऊ.

**अनिल सावंत :-**

साहेब त्याच्या रिपोर्ट स्टेड मेडीकल ऑफिसर जवळ प्रत्येक महिन्याला रिपोर्ट जातो.

**मा. आयुक्त :-**

डायरेक्टर हेल्थ त्याचे नियंत्रण करतात. आपल्या माहितीसाठी आपण एकदा खाली बैठक घेऊ.

**मा. महापौर :-**

ठीक आहे त्याची आपण चौकशी करावी.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आयुक्त साहेब आपण प्रस्ताव पाठवतो तो सर्वांना लागु होईल ना?

**मा. आयुक्त :-**

रॉड्रीक्स साहेब याच्यामध्ये मी तेच सांगितले.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मी तेच सांगतो नो डेव्हलपमेन्ट झोन मध्ये कोणाला फाईव्ह स्टार बिल्डींग...............

**मा. आयुक्त :-**

ह्या ठरावात अट अशी टाका की राज्यात इतर महानगरपालिकेत आणि इतर शहरात सगळयांना लागु होईल असे शासनाने निर्णय करावे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हा निर्णय पाठवतो म्हणुन मी सांगत आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही त्याच्यात टाका.

**जुबेर इनामदार :-**

सर्व महानगरपालिका, नगरपालिका सर्वांना लागु करावे.

**मा. महापौर :-**

आप अभी ठराव पढीये। इस विषय पे बहूत चर्चा हो गई है।

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब हा जो आपण गोषवारा दिलेला आहे. त्याच्यामध्ये विकासकाचे नाव दिले असते तर फरक पडला नसता. इथे काय म्हटलेले आहे, सेव्हन इलेव्हन हॉटेल्स आहे ना चांगले आहे आणि त्याच्यामध्ये तुम्ही इथे म्हटलेले आहे विकासकाने महानगरपालिकेकडे मागणी केल्याप्रमाणे.

**मा. आयुक्त :-**

आपण विकासक हा शब्द बारबार वापरतो.

**अनिल सावंत :-**

विकासकांनी म्हणजे अनेक वचनी आहे की रिस्पेक्टेड आहे.

**मा. आयुक्त :-**

एकच आहे सेव्हन इलेव्हन.

**अनिल सावंत :-**

सेव्हन इलेव्हनच आहे बाकी कोण नाहीत. आता इथे जे तुम्ही मायनर मॉडीफिकेशन करणार आहात त्याच्यामध्ये जवळ-जवळ सर्व्हे नंबर जे आहेत ते साधारण १२ ते १३ आहेत. त्या सर्व्हे मध्ये असलेले सर्व करणार आहात की पार्टली करणार आहात आणि पार्टली करायचे ३७ मध्ये मायनर मॉडीफिकेशनचे प्रोव्हिजन आहे का? कारण आपण आरक्षण करतो.

**मा. आयुक्त :-**

काय झाले शासनाकडे जे विकासकाने किंवा सेव्हन इलेव्हन डायरेक्टरने प्रस्ताव दिला आणि शासनाने जे निर्देश आपल्याला दिले हे काही स्पेशल पॉवर ऑफ गव्हरमेन्ट आहे म्हणुन ते सभागृहासमोर शासनाने जे आम्हाला निर्देश दिले ते सभागृहासमोर ठेवलेले आहेत.

**अनिल सावंत :-**

बरोबर आहे साहेब क्लिअर नाही ना कुठच्या सर्व्हेची किती जमीन आहे.

**मा. आयुक्त :-**

तेवढीच जमीन.

**अनिल सावंत :-**

साहेब याच्यामध्ये नाही. जे सर्व्हे नंबर दिलेले आहेत त्यांची १०० टक्के आहे. जे सर्व्हे नंबर दिले आहेत ते १०० टक्के आहे.

**मा. आयुक्त :-**

देशमुख तो मुद्दा क्लिअर करा.

**नगररचनाकार :-**

जे सर्व्हे नंबर साठी शासनाला त्यांनी विनंती केली होती त्याच सर्व्हे नंबर पुरता हा मॉडीफिकेशन प्रपोज केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे त्या सर्व्हे मध्ये असलेली पुर्ण जागा.

**नगररचनाकार :-**

त्या पार्ट व्हाईज.

**मा. उपमहापौर :-**

जेवढा हिस्सा असेल तेवढीच.

**मा. आयुक्त :-**

सावंतजी तुम्ही गफलियत करू नका. एखादा सर्व्हे नंबर २०० हेक्टरचा राहतो. १०० हेक्टरचा राहतो तो तसा नाही. तो जो प्रोजेक्ट आहे आणि तो एरिया हे तेवढाच.

**अनिल सावंत :-**

साहेब ह्या ठिकाणी कांदळवण होते ६ गुन्हे दाखल झालेले आहेत. महानगरपालिकेचे प्रतिज्ञापत्र न्यायालयामध्ये दाखल झालेले आहे. त्याच्या विषयी काही तुम्ही गोषवाऱ्यामध्ये दिलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

पहिलेच वाक्य आहे सी.आर.झेड. क्षेत्र सोडून तुम्ही दुसरा पॅरेग्राफ बघा.

**अनिल सावंत :-**

आणि जास्त आता बरेचसे मुद्दे राहिले आहेत. ते नंतर देतो आता कालच राज्य शासनाने एक कमिटी स्थापन केलेली आहे. कांदळवनाचे एक क्षेत्रीय संवर्धन त्यामध्ये आपल्या मिरा भाईंदरचा पण समावेश आहे. विकास प्रकल्पाची सारखी कामे होत अतिक्रमण करत. कांदळवनाची सरास कत्तल होत आहे भराव टाकून या भागांचा वापर करण्याचा प्रयत्न होत आहे. या पार्श्वभूमीवर या समाजकटंकांना लवाद घालण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणुन कांदळवन संरक्षण समितीची स्थापना करण्यात येणार आहे. आणि हे १ डिसेंबर पासुन लागू आहे. कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ही समिती आहे आणि ही मिरा भाईंदरसाठी सुद्धा लागू आहे. त्यामुळे ह्या सभागृहात हे जे नगरसेवक आहेत. पहिला प्रयोग तुम्ही करायला जात आहेत आणि कांदळवनासारख्या जमिनीमध्ये कांदळवन संवर्धनाच्या अनुषंगाने सगळ्या प्रशासकीय यंत्रणांचा समन्वय राखणे. कांदळवन...........

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

शासनाकडून आलेल्या आदेशावरती आपण कारवाई करतो.

**अनिल सावंत :-**

आम्ही सभागृहात दाद मागायची..........

**मा. उपमहापौर :-**

आता एवढी चर्चा झाली ना.........

**अनिल सावंत :-**

कुठे चर्चा झली. काही मुद्दे राहीले ना.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही वृत्तपत्र वाचता?

**अनिल सावंत :-**

मी कांदळवन संवर्धन समितीचे सांगतो. गुन्हे दाखल झाले आहेत. राज्य शासनाचे आदेश आहेत. ५ ऑक्टोबर ला कंपनीने राज्यशासनाला पत्र दिले. ६ ऑक्टोबरला त्याचे उत्तर येते. त्याच्यामूळे म्हटले

आहे की, महानगरपालिका ३७ खाली करू शकते. करा असे म्हटले नाही. त्यामूळे सभागृहाची दिशाभूल करू नका, शासनाने सांगितले आहे की करू शकते. करा म्हणून सांगितले नाही.

**मा. महापौर :-**

आपका ठराव रहेगा तो तो पढीए। बहोत चर्चा हो गई है। आप बैठ जाइए।

**मा. आयुक्त :-**

सावंतजी जो मुद्दा मांडला त्या निर्णयासाठी महासभेसमोर ठेवलेले आहे.

**स्नेहा पांडे :-**

मा. मॅडम यह जो रूल्स ॲन्ड रेग्यूलेशन ३७ के अंदर हो रहा है। यह सामान्य लोगों के लिए लागू होना चाहिए। सर्व सामान्य आदमी हॉटेल बनाना चाहता है तो उसके लिए यह रूल लागू होना चाहिए। आपका निर्णय सबके लिए समान होना चाहिए। कमिशनर साहेब आप सब सेक्शन पढके इसको मान्यता देनी चाहिए।

(सभागृहात गोंधळ)

**अश्वीन कासोदरीया :-**

मॅडम आप आयुक्त के ऊपर आरोप लगा रहे हो।

**स्नेहा पांडे :-**

मैं कमिशनर साहेब से बात कर रही हूँ। आप बिच मे मत बोलिए।

**सुरेश खंडेलवाल :-**

आप को मॅडम ने परमिशन नही दिया फिर भी आप बोल रहे है।

(सभागृहात गोंधळ)

**स्नेहा पांडे :-**

सर्व संमती से पास किया जाए।

**मा. आयुक्त :-**

सर्वसामान्याला तर आपण पहिले प्राधान्य द्यायचे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-**1296/847**/सीआर-**162/96**/युडी-**12,** दि.**14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि .**15/07/97** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र . टीपीएस-**1298/941**/सीआर-**89/98**/युडी-**12,** दि.**25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि .**15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे**.**

**मिरा भाईंदर क्षेत्रात मंजूर विकास योजनेप्रमाणे मौजे नवघर, स.क्र. 266/2,3,5,6, 267/3, 265/4 या जागा ना विकास क्षेत्रात समाविष्ट असून 300 मी विकास योजना रस्ता व भागश : सी.आर.झेड ने बाधीत होत आहेत. विकासक मे. सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांनी वास्तुविशारद मार्फत दि. 15/02/2008 अन्वये प्रस्ताव सादर केला असता सदर प्रस्तावास मिरा भाईंदर महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/4217/07-08, दि. 16/02/2008 विकास नियंत्रण नियमावलीच्या अनुज्ञेय चटईक्षेत्र 0.2 च्या मर्यादेत रेखांकन नकाशे मंजूरीसह अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी (CRZ बाधीत क्षेत्र वगळून) ना हरकत दाखला दिलेला आहे.**

**मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील मंजूर तरतुदीनुसार 30.00 मी. किंवा त्यापेक्षा जास्ती रुंदीच्या रस्त्यालगतच्या नाविकास क्षेत्रामध्ये 30.00 मी. अंतरापर्यंत रहिवास वापर अनुज्ञेय असल्यामुळे त्याप्रमाणे परवानगी मिळणेसाठी विकासकांनी महानगरपालिकेकडे मागणी केल्याप्रमाणे याबाबत शासनाकडे दि .07/07/2016 व दि.06/11/2017 केलेली असून तद्नंतर विकासकांनी विषयांकित जागा 30.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यालगत असून त्याबाबत शा सनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे विषयांकित जागेमध्ये तारांकीत हॉटेल्ससाठी (1 + 1) चटईक्षेत्रासाठी बांधकाम परवानगी मिळणेस दि .22/03/2018 रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्याप्रमाणे याबाबत शासनाने दि .13/04/2016 रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस अर्जदार यांनी अपेक्षिलेला वापर राष्ट्रीय महामार्ग / राज्य महामार्गालगत अनुज्ञेय असल्यामुळे अर्जदाराची विनंती मान्य करणेत येत असल्याचे कळविलेले आहे**

सदर विषयांकित जागेमध्ये तारांकीत हॉटेल साठी अनुज्ञेय करावयाच्या मुळ चटईक्षेत्र निदेशांकासह प्रिमियम आकारुन अनुज्ञेय करावयाच्या अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकाबाबत मार्गदर्शन मिळणेस महानगरपालिकेने दि. 05/09/2018 अन्वये शासनास विनंती केलेली आहे.

नियोजन प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 मधील तरतुदीनुसार मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल पस्तावित करुन मंजूरीसाठी शासनास सादर करु शकत असल्यामुळे अर्जदार त्यांच्या विनंतीस अनुसरून मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल शासनास प्राप्त झाल्यास त्यावर शासन गुणवत्तेवर निर्णय घेणार असल्यामुळे शासनाने दि . 06/10/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे असा गोषवारा मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने मंजूरीसाठी मा. महासभेने प्रस्तावित केलेला आहे.

त्यानंतर विकासक यांनी मिरा भाईंदर हे शहर मुंबई - ठाणे लगतचे प्रमुख व झपाट्याने वाढणारे शहर असून राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 लगत असल्यामुळे तसेच शहरामध्ये व शहरालगत एस्सेलवर्ल्ड, पॅगोडा, ज्युडीशियल ॲकेडमी, सुभाषचंद्र बोस मैदान (ज्यामध्ये प्रस्तावित स्टेडियम आहे) असे अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे वास्तु व अम्युझमेंट पार्क असल्यामुळे येथे येणा -या उद्योजक व पर्यटकांसाठी तसेच शहरामध्ये असलेल्या स्टुडिओमुळे शहरात येणा-या अनेक कलावंतासाठी (गोरेगांव ते सुरत दरम्यान तारांकीत हॉटेलची सोय नसल्यामुळे) विश्रांतीची सोय होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच केंद्र शासनाच्या Make in India व राज्य शासनाच्या Make in Maharashtra अंतर्गत रोजगार निर्मीतीसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे . त्याप्रमाणे शहरामध्ये तारांकी त हॉटेल झाल्यास सुमारे 500-600 जणांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून मौजे नवघर , स.क्र. 259/4, 260/3, 265/2,4, 266/1 ते 6, 267/2,3 या जागेतील सी.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र वगळून त्यांच्या तारांकीत हॉटेल बांधकामासाठी (मुळ 1.0 + अतिरिक्त 1.0) याप्रमाणे चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करणेबाबत किंवा सदर जागा रहिवास / वाणिज्य वापरामध्ये फेरबदल करणेस शासनास विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने नियोजन प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 मधील तरतुदीनुसार मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्ता वित करुन मंजूरीसाठी शासनास सादर करु शकत असल्यामुळे अर्जदार यांच्या विनंतीस अनुसरुन मंजूर विकास योजनेतील फेरबदल शासनास प्राप्त झाल्यास त्यावर शासन गुणवत्तेवर निर्णय घेणार असल्याचे शासनाने दि.06/10/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

त्याप्रमाणे मौजे नवघर, स.क्र. 267/1 ते 3, 259/4, 260/3, 265/2 ते 4, 266/1 ते 6 व इतर जागा सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे ना -विकास क्षेत्रामधून रहिवास वापरामध्ये समाविष्ठ करणेसाठी महाराष्ट्र प्राधिकरण व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेसाठी हि महासभा मंजुरी देत असून त्या अनुषंगिक सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतीम मंजूरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा. आयुक्त सो., यांना हि महासभा अधिकार देत आहे.

ठराव :-

उपरोक्त विषयासाठी मे . सेव्हन इलेव्हन हॉटेल्स प्रायव्हेट लि . यांना प्रथमत: CRZ बाधित क्षेत्रामध्ये मनपा/नर/4217/2007-08 दि. 16/02/2008 विकास नियंत्रण नियमावलीच्या ना -विकास क्षेत्रासाठी अनुज्ञेय चटई क्षेत्र 0.2 च्या मर्यादेत मंजूरी देण्यात आली होती . तद्नंतर जावक क्र . मिभा/मनपा/नर/4830/2016-17 दि. 18/02/2017 अन्वये सुधारीत बांधकाम प्रारंभ पत्र सुधारित नकाशासह मंजुरी प्रदान केलेली आहे. सदरची मंजुरी ना-विकास क्षेत्रात 0.33 प्रमाणे क्लब हाऊस, बेसमेंट, तळ+ 1 अशा स्वरुपाची देण्यात आलेली आहे . मिरा भाईंदर विकास नियंत्रण नियमावली 57 ना विकास क्षेत्र निष्कर्षा अनुसार सदर जागी क्लब हाऊस बांधण्याची तरतूद नाही तसेच 57 चे पोट कल Xiii (13) ला अधीन राहूनच चटईक्षेत्र अनुज्ञेय होईल. मुळात देण्यात आलेली मंजुरीत दोष आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने CRZ ने बाधित क्षेत्रामध्ये विकासकास मंजूरी देताना MCZNA व स्टेट ग्राउंड वॉटर ऑथोरिटी या प्राधिकरणाची पूर्वपरवानगी न घेता बांधका म मंजूरी दिलेली आहे. तसेच, MOEF सुचना दि. 1991 ला अनुसरुन तयार करण्यात आलेले प्रारुप CRZ नकाशा अहवालामध्ये नमूद संदर्भ बिंदू 121-122 प्रमाणे मंजूर केलेले बांधकाम क्षेत्र सीआरझेड बांधीतच आहे.

सदरचे बांधकाम राष्ट्रीय / राज्य महामार्ग सलग्न/लगतचे नाही तरी, ज्याअर्थी नगरविकास विभाग सूचना टीपीएस -1813/3067/सीआर/492/13/डीपी/यूडी13, दि.05/01/2015 लागू होत नाही . विषयांकित जागेपासून राष्ट्रीय/राज्य महामार्ग 3 किमीच्या अंतरावर आहे. त्याअर्थी प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये शासनाची दिलेली सूचना दिशाभूल करणारी आहे.

सदरचे बांधकाम महाराष्ट्र शासन राजपत्र बुधवार , जून 11, 1997 भाग 1 कोकण विभागीय पुरवणी 14 मे, 1997 विकास नियंत्रण नियमावली भाग 57 (Ziii)(D) नवीन समाविष्ट करण्यात आले. त्याप्रमाणे भूखंडाला लागत 30-45 मी. विकास रस्ता असल्यास ना-विकास क्षेत्रामध्ये 30 मी. अंतरापर्यंत रहिवास बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होऊ शकते . या जागी विकासकाने 30 मी. हून अधिक अंतर्गत क्षेत्रात नियमबाह्य बांधकाम केलेले आहे . व विकास नियंत्रण नियमावली अनुसार अनुज्ञेय असलेले चटई क्षेत्र निर्देशांक देई/होईल तसे, तळ+ 1 मजलाच स्टीलसहित इमारत बांधता येईल असे स्पष्ट कळविलेले आहे व त्याचा उल्लेख नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग , मध्यवर्ती इमारत, पुणे, संचालक नगररचना यांनी 23/09/2013 पत्रान्वये आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना कळविलेले आहे.

सदर प्रकरणी विकासका विरोधात स्वयंसेवी सामाजिक संस्था/जागरुक नागरिक/पत्रकार यांनी CRZ प्राधिकरणाकडे तक्रारी करुन अनेक गुन्हे दाखल केलेले आहेत व त्याची नोंद मिरारोड पोलिस ठाण्यामध्ये नमूद आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने नगरविकास विभाग टीपीएस -1218/4313/नवि 12, दि. 06/10/2018 च्या सुचनेअनुसार मे. सेव्हन इलेव्हन हॉटेल्स प्रा.लि. यांचेतर्फे बांधण्यात येत असलेल्या मौजे नवघर सर्व्हे क्र. 26771 ते 258/4, 260/3, 265/2 ते 4, 266/1 ते 6 या जागेतील सीआरझेडचे क्षेत्रा वगळून तारांकित हॉटेलला अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यास मंजूरी देणेबाबत अथवा क्षेत्राचा रहिवास/वाणिज्य वा पर अनुज्ञेय करणेबाबत प्रस्ताव बहुमताने मंजूर करुन शासनास निर्णयासाठी पाठवण्यास सूचित केले आहे . शहर विकास योजनेत काही अंतर्भूत करायचे असल्यास महाराष्ट्र राज्य प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये किरकोळ दुरुस्ती (Minor modification) करणे प्रस्तावित आहे. मंजूर विकास आराखड्यातील क्षेत्र वापर बदलण्याची तरतूद नाही . (Where a modification of any part of or proposal made in final development plan is of a nature that it will not change the Character of such development plan) अर्थात ना-विकास क्षेत्राला MRTP 37 खाली रहिवास/वाणिज्य क्षेत्र रुपांतर करण्याचा प्रस्ताव पाठवता येत नाही.

मिरा भाईंदर शहराचा आराखडा / विकास योजना भविष्यात वाढती लोकसंख्या गृहीत धरुन तयार करण्यात आलेला आहे . प्रत्येक शहराला पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून ना -विकास क्षेत्रा, CRZ पाणथळ, वनक्षेत्र इ. खुले क्षेत्र श्वास घेण्यासाठी गरजेचे आहे . शहरात अवाढव्य सीमेंट, पोलादचे जंगल तयार केले तर, भौगोलिक नियोजनात बिघाड होईल तसेच आटोक्यात न येणारी प्रदूषणाची परिस्थीती निर्माण होऊन मानव व प्राणी जातीच्या आरोग्याचा बळी जाईल.

तरी, मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने विकासकाच्या दबाव तंत्राखली अनियमित उपहापोह करु नये. विकासकाम आर्थिक फायदा पोहोचवताना , भ्रष्टाचाराच्या माध्यमातून कायदे व नियमांची पायमल्ली करण्याच्या कृतीला विराम द्यावा . पर्यावरणाचे संरक्षण प्रत्येक नागरिकाचे परम कर्तव्य आहे . त्याला अनुसरुन जागतिक तापमानवाढीला अंकुश लावावे त्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सिंहाचा वाटा असणे गरजेचे आहे

मा. आयुक्त यांनी उपरोक्त प्रकरणामध्ये दिलेल्या बांधकाम परवानगीची फेरचौकशी करावी. CRZ, पाणथळ क्षेत्राचे थेट सर्वेक्षण करुन योग्य प्राधिकरणांकडून अहवाल प्राप्त करावे . विषयांकित जागी सध्या सुरु असलेले बांधकाम थांबवावे, अनधिकृत बांधकाम निष्कासित करावे. तसेच प्रशासनाने दिशाभूल करणारा गोषवारा रद्द करावा असा मी ठराव मांडत आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

दोन ठराव आले आहेत. सचिवांनी मतदान घ्यावे.

**नगरसचिव :-**

प्र. क्र. ८३ करीता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. प्रशांत दळवी. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. धृवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५४, विरोधात २८, तटस्थ १ इतकी मते पडली आहेत. श्री. धृवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ८३ :-**

**मौजे नवघर स.क्र.२६७/१ ते ३, २५९/४, २६०/३, २६५/२ ते ४, २६६/१ ते ६ या जागेच्या वापरामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत.**

**ठराव क्र. ८४ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-**1296/847/**सीआर-**162/96/**युडी-**12,** दि.**14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि **.15/07/97** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र . टीपीएस-**1298/941/**सीआर-**89/98/**युडी-**12,** दि.**25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि **.15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे**.**

**सदर जागेपैकी मौजे नवघर, स.क्र. 265/2,4, 266/1 ते 6, 267/2,3 या जागेमधील सी.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र वगळून उर्वरीत सी.आर.झेड. ने बाधीत नसलेल्या क्षेत्रामध्ये जिमनॅशियम व क्लब हाऊसच्या इमारतीसाठी दि.18/02/2017 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी अन्वये देण्यात आलेली आहे.**

**मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील मंजूर तरतुदीनुसार 30.00 मी. किंवा त्यापेक्षा जास्ती रुंदीच्या रस्त्यालगतच्या नाविकास क्षेत्रामध्ये 30.00 मी. अंतरापर्यंत रहिवास वापर अनुज्ञेय असल्यामुळे त्याप्रमाणे परवानगी मिळणेसाठी विकासकांनी महानगरपालिकेकडे मागणी केल्याप्रमाणे याबाबत शासनाकडे दि .07/07/2016 व दि.06/11/2017 केलेली असून तद्नंतर वि कासकांनी विषयांकित जागा 30.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यालगत असून त्याबाबत शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे विषयांकित जागेमध्ये तारांकीत हॉटेल्ससाठी (1 + 1) चटईक्षेत्रासाठी बांधकाम परवानगी मिळणेस दि .22/03/2018 रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्याप्रमाणे याबाब त शासनाने दि .13/04/2016 रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस अर्जदार यांनी अपेक्षिलेला वापर राष्ट्रीय महामार्ग / राज्य महामार्गालगत अनुज्ञेय असल्यामुळे अर्जदाराची विनंती मान्य करणेत येत असल्याचे कळविलेले आहे**

**सदर विषयांकित जागेमध्ये तारांकीत हॉटेल या प्रयोजनासाठी मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांनी दि.27/06/2018 अन्वये व मा. व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी दि.29/06/2018 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस नाहरकत दाखले दिलेले आहेत.**

**त्यानंतर विकासक यांनी मिरा भाईंदर हे शह र मुंबई - ठाणे लगतचे प्रमुख व झपाट्याने वाढणारे शहर असून राष्ट्रीय महामार्ग क्र. 8 लगत असल्यामुळे तसेच शहरामध्ये व शहरालगत एस्सेलवर्ल्ड, पॅगोडा, ज्युडीशियल ॲकेडमी, सुभाषचंद्र बोस मैदान (ज्यामध्ये प्रस्तावित स्टेडियम आहे) असे अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे वा स्तु व अम्युझमेंट पार्क असल्यामुळे येथे येणा -या उद्योजक व पर्यटकांसाठी तसेच शहरामध्ये असलेल्या स्टुडिओमुळे शहरात येणा-या अनेक कलावंतासाठी (गोरेगांव ते सुरत दरम्यान तारांकीत हॉटेलची सोय नसल्यामुळे) विश्रांतीची सोय होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच केंद्र शासनाच्या Make in India व राज्य शासनाच्या Make in Maharashtra अंतर्गत रोजगार निर्मीतीसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे .**

त्याप्रमाणे शहरामध्ये तारांकीत हॉटेल झाल्यास सुमारे 500-600 जणांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून मौजे नवघर , स.क्र. 259/4, 260/3, 265/2,4, 266/1 ते 6, 267/2,3 या जागेतील सी.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र वगळून त्यांच्या तारांकीत हॉटेल बांधकामासाठी (मुळ 1.0 + अतिरिक्त 1.0) याप्रमाणे चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करणेबाबत किंवा सदर जागा रहिवास / वाणिज्य वापरामध्ये फेरबदल करणेस शासनास विनंती केलेली आ हे. त्याअनुषंगाने नियोजन प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 मधील तरतुदीनुसार मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्तावित करुन मंजूरीसाठी शासनास सादर करु शकत असल्यामुळे अर्जदार यांच्या विनंतीस अनुसरुन मंजूर विकास योजनेतील फेरबदल शासनास प्राप्त झाल्यास त्यावर शासन गुणवत्तेवर निर्णय घेणार असल्याचे शासनाने दि.06/10/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

त्याप्रमाणे मौजे नवघर, स.क्र. 267/1 ते 3, 259/4, 260/3, 265/2 ते 4, 266/1 ते 6 व इतर जागा सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे ना -विकास क्षेत्रा मधून रहिवास वापरामध्ये समाविष्ठ करणेसाठी महाराष्ट्र प्राधिकरण व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेसाठी हि महासभा मंजुरी देत असून त्या अनुषंगिक सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतीम मंजूरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा. आयुक्त सो., यांना हि महासभा अधिकार देत आहे.

सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | १.जैन गीता भरत |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरधर | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | यादव मिरादेवी रामलाल | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | शाह रिटा सुभाष | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | गोहिल शानू जोरावर सिंह | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १३ | पाटील अनिता जयवंत | |
| १४ | भोईर सुनिता शशिकांत | १४ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | रावल मेघना दिपक | १६ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १७ | मोकाशी दिपाली आनंदराव | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | पाटील धनेश परशुराम | |
| १९ | अरोरा दीपिका पंकज | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | नाईक विविता विवेक | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | भावसार वंदना संजय | २१ | परदेशी गिता हरीश | |
| २२ | बेलानी हेमा राजेश | २२ | पाटील नरेश तुकाराम | |
| २३ | भोईर विणा सुर्यकांत | २३ | पाटील वंदना विकास | |
| २४ | सोनार सुरेखा प्रकाश | २४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | भोईर कमलेश यशवंत | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २६ | अहमद साराह अकरम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | म्हात्रे परशुराम पदमाकर | २७ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २८ | म्हात्रे मोहन गोपाल | २८ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २९ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३० | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| ३१ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३२ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३३ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३४ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३५ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३६ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३७ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३९ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४० | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४१ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४२ | राय विजयकुमार सिस्थ्न नारायण | | | |
| ४३ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४४ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४५ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४६ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४७ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४८ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४९ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५० | व्यास रवि वासुदेव | | | |
| ५१ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५२ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५३ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५४ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८४, **मौजे भाईंदर स.क्र. ७७१ (जुना), ८१ (नविन), स.क्र. ७७२ (जुना), १११ (नविन) या शासकीय जागा Bus Bay साठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास योजनेत फेरबदल करणेबाबत.**

सुरेश खंडेलवाल :-

प्रकरण क्र. ८४, **मिरा भाईंदर महा नगरपालिका हद्दीतील मौजे भाईंदर , स.क्र. 771 (जुना), 81 (नविन), स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) सह इतर सार्वजनिक उपक्रमासाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे कार्यालयात दि.01/10/2018 रोजी बैठक पार पडलेली आहे. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.**

**मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून ) ही दि.14/05/1997 रोजी मंजूर होवून दि .15/07/1997 पासून अंमलात आलेले असून वगळलेल्या भागाची विकास योजना ही दि.25/08/2000 रोजी मंजूर होवून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.**

**मंजूर विकास योजनेनुसार मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन) ही जागा भागशः 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा रहिवास विभागात सामाविष्ट आहे. तसेच स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) ही जागा मंजूर विकास योजनेनुसार भागशः 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा वाणिज्य विभागात (C-2) मध्ये सामाविष्ट आहे.**

**सदर जागा 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यालगत असल्याने तसेच सदर जागेची मालकी सरकारी असल्याने या जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करून घेऊन 45.0 मी. रूंद रस्त्यालगत सार्वजनिक वाहतुकीच्या बस सेवेस चालना मिळणेस व वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीकोनातून Bus Bay साठी उपयोगात येऊ शकणार असल्याची मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे समक्ष मा.आ.श्री. नरेंद्र मेहता, मा.आयुक्त सो., यांचे उपस्थितीत चर्चा होवून याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगरररचा अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार विकास योजनेमध्ये 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्यासाठी फेरबदल करणेसाठी प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीने शासानास सादर करणेबाबत चर्चा झालेली आहे.**

**सबब 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्या लगतच्या स .क्र. मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन), स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) या जागा Bus Bay साठी 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्याच्या आखणीमध्ये सामाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेसाठी हि सभा मंजुरी देत असून त्या अनुषंगीक सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतीम मंजुरीसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेसाठी मा . आयुक्त सो., मिरा भाईंदर महानगरपा लिका यांना हि महासभा अधिकार देत आहे.**

**वैशाली रकवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**नयना म्हात्रे :-**

माझ्या लक्षवेधीमध्ये मी कुत्र्यांचा विषय घेतला होता. माझी आयुक्तांना, महापौरांना अशी विनंती आहे की कुत्र्यांसाठी दफनभूमीची व्यवस्था करण्यात यावी. कारण हा गंभीर प्रश्न आहे. कारण कुत्रा मेला तर त्याला कुठे न्यायचे आणि कुठे गाडायचे हा मोठा प्रश्न उपस्थित होतो.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. नविन डेव्हलपमेंट प्लान्ट होगा तभी हम करेंगे।

**नयना म्हात्रे :-**

ठीक आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

सर्व्हे नं. ७७१ साठी तुम्हाला शासनाकडून लेटर आले आहेत का? ही जागा घ्यायची बोलता.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय शिवसेना गटनेते आमगावकर ह्यांनी विचारल्याप्रमाणे हा विषय मा. जिल्हाधिका-यांकडे आम्ही जेव्हा मेट्रोच्या बाबतीत चर्चा करत होतो. त्यावेळी काशिमिराच्या काही भागाच्या ठिकाणी एक्सेस साईड मार्जीन आहे. ती जागा महसूली लॅन्ड आहे. भविष्यात मोठी बस वगैरे पार्क करायची झाली तर ती रस्त्यावर येते आणि मागे ट्राफीक जाम होते. इंटरनॅशनल सिटीमध्ये किंवा बाहेरच्या देशामध्ये बस थोडी साईडला घेऊन पार्क केली जाते. ती जागा डी.पी. मध्ये सरकारी असल्यामुळे ती रस्त्याचा भाग म्हणून आपण मागणी केली तर तसा निर्णय घेणे ती मिळवण्यासाठी आपण प्रस्ताव करतो. अशी माहिती समोर येते मी सभागृहाला सांगू इच्छितो ही जागा खाजगी विकासकांनी किंवा वापरधारकांनी त्यांच्यासाठी मिळावी म्हणून त्यांच्या उपक्रमांसाठी मिळावी म्हणून काही अंशतः गार्डन, काही पार्क आणि रस्ता आणि इतर वापर ह्याच्यासाठी हा प्रस्ताव निर्णयासाठी महसूल मंत्रालयाकडे पेंडींग आहे. आणि जुना प्रस्ताव जिल्हाधिका-यांनी महापालिकेकडून आवश्यक ते अभिप्राय घेऊन सबमीट झालेला आहे. ही माहिती माझ्याकडे किंवा जिल्हाधिकारी महोदयांकडे नव्हती. ती वस्तूस्थिती अशी आहे की जागा लगतचे वापरधारक किंवा त्या ठिकाणचे विकासक किंवा इतर ते आवश्यक नियोजनासाठी शासनाकडे जागा

मागणी केलेली आहे. ते अंतिम मंजूरीच्या टप्प्यात आहे. आम्हाला ही कल्पना नव्हती. परंतु हा प्रस्ताव आम्ही जिल्हाधिकारी आणि आमची चर्चा झाली. त्यामुळे हा प्रस्ताव सभागृहासमोर दिलेला आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

कमिशनर साहेबांनी माहिती दिली तर हा ठराव मागे घेतला तर बरे होईल. त्यांना माहिती नव्हते. गोषवाऱ्यामध्ये दिले होते.

**धृवकिशोर पाटील :-**

आमगावकर साहेब ही जागा माहित आहे का? जुन्या पेट्रोल पंपच्या समोर मच्छीवाले बसतात ती जागा.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

याची मागणी आपण केलेली आहे. तिथल्या विकासधारकाने साहेबांनी सांगितल्याप्रमाणे केलेली आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

मग जर त्यांना भेटली तर आपल्याला नुकसान आहे. महापालिकेला भेटली तर याच्यामध्ये फायदा आहे. याच्यामध्ये लोकांना फायदा होईल.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

पुऱ्या मिरा भाईंदरची तुमच्याकडे हिस्ट्री देऊन ठेवलेली आहे वाटते.

**जुबेर इनामदार :-**

साहेब सर्व्हे नंबरमध्ये काही चुक झाली आहे का?

**मा. आयुक्त :-**

मुद्दा असा आहे ही जागा आपण प्रस्ताव महासभेला देण्यापूर्वी २०१५ मध्ये म्हणजे आपल्या नगरपालिकेच्या आणि जिल्हाधिकाऱ्याचा अभिप्राय घेऊन थर्ड पार्टी सर्व्हे क्रमांक ८१........

**जुबेर इनामदार :-**

७७१ आणि ७७२ एस.के.स्टोनला लागून असलेल्या जागेत त्या ७७१ च्या सर्व्हे नंबर आजपर्यंत कोणाला सापडतच नाही. तो ७७१ कोठुन शोधुन आणला? आणि हे जे बोलत आहेत. जुन्या पेट्रोल पंपच्या समोर तो ७७१ चा सर्व्हे नंबरच नाही.

**मा. आयुक्त :-**

काशिमीरा रोडवर सगळयात मोठा साईट मार्जिग असलेला तो पट्टा आहे. तिथे गार्डन, गॅरेज असा वापर होत आहे. समृध्दी प्लाझाच्या समोर मोठा पट्टा आहे. ह्यामध्ये २००० मध्ये महानगरपालिकेकडून अभिप्राय घेतले गेले. २०१५ मध्ये हा प्रस्ताव शासनाकडे गेला. तत्कालिन कलेक्टर ने ह्यामध्ये अभिप्राय दिलेले आहेत. हे प्रायव्हेट लोकांनी ही जागा लगतच्या लोकांसाठी पार्किंग, गार्डन याच्यासाठी ते मागणी केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब थोडेसे क्लेरिफिकेशन द्या. जागा कुठे आहे कारण एक जागा जी आहे, ती एस.के.स्टोनच्या पुढे आहे. तो सर्व्हे नंबर ७७२ आहे. तो बरोबर आहे. ७७१ कुठे आहे?

**मा. आयुक्त :-**

त्याच्या लगतचाच.

**जुबरे इनामदार :-**

ठरावामध्ये जी चर्चा झालेली आहे.

**मा. आयुक्त :-**

गोडदेव जुना सर्व्हे क्र. ८१.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे. आता जो ठराव वाचला, तो रोडच्या पलिकडचा आहे.

**मा. आयुक्त :-**

रोडच्या बाजुचाच ना आपण येताना.

**जुबेर इनामदार :-**

जुना पेट्रोल पंपच्या समोर.

**मा. आयुक्त :-**

मला तसे नाही सांगता येणार.

**जुबेर इनामदार :-**

प्रफुल्ल पाटील साहेबांच्या जुना पेट्रोल पंप.

**मा. आयुक्त :-**

प्रफुल्ल पाटील साहेबांच्या पेट्रोल पंपच्या अपोझीट.

**जुबेर इनामदार :-**

अपोझीट राहीला तर सर्व्हे नंबर चेक करा.

**मा. आयुक्त :-**

हे बघा, मागे प्रायव्हेट जागा आहे आणि मध्येच एक निमुळता गव्हरमेंट पट्टा आहे. फार छोटा आहे तो, तर त्याचा प्रस्ताव ऑलरेडी महसुल मंत्र्याकडे अंतीम निर्णयासाठी आहे. आता नवीन डॉक्युमेंट आपल्याला उपलब्ध झालेले आहेत. तर त्यांची विनंती आहे की, ही माहिती सभागृहाला द्या. दोन प्रस्ताव अननेसेसरी झाले नाही पाहिजे.

**प्रकरण क्र. ८४ :-**

**मौजे भाईंदर स.क्र. ७७१ (जुना), ८१ (नविन), स.क्र. ७७२ (जुना), १११ (नविन) या शासकीय जागा Bus Bay साठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास योजनेत फेरबदल करणेबाबत.**

ठराव क्र. ८५ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन), स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) सह इतर सार्वजनिक उपक्रमासाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे कार्यालयात दि.01/10/2018 रोजी बैठक पार पडलेली आहे. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.**

**मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) ही दि.14/05/1997 रोजी मंजूर होवून दि.15/07/1997 पासून अंमलात आले ले असून वगळलेल्या भागाची विकास योजना ही दि.25/08/2000 रोजी मंजूर होवून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.**

**मंजूर विकास योजनेनुसार मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन) ही जागा भागशः 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा रहिवास विभागात सामाविष्ट आहे. तसेच स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) ही जागा मंजूर विकास योजनेनुसार भागशः 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा वाणिज्य विभागात (C-2) मध्ये सामाविष्ट आहे.**

**सदर जागा 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्या लगत असल्याने तसेच सदर जागेची मालकी सरकारी असल्याने या जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करून घेऊन 45.0 मी. रूंद रस्त्यालगत सार्वजनिक वाहतुकीच्या बस सेवेस चालना मिळणेस व वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीकोनातून Bus Bay साठी उपयोगात येऊ शकणार असल्याची मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे समक्ष मा.आ.श्री. नरेंद्र मेहता, मा.आयुक्त सो., यांचे उपस्थितीत चर्चा होवून याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगरररचा अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार विकास योजनेमध्ये 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्यासाठी फेरबदल करणेसाठी प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीने शासानास सादर करणेबाबत चर्चा झालेली आहे.**

**सबब 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्या लगतच्या स.क्र. मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन), स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) या जागा Bus Bay साठी 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्याच्या आखणीमध्ये सामाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदल करणेसाठी हि सभा मंजुरी देत असून त्या अनुषंगीक सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतीम मंजुरीसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेसाठी मा. आयुक्त सो., मिरा भाईंदर महानगरपालिका यांना हि महासभा अधिकार देत आहे.**

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदक :- सौ. वैशाली रकवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८५, **मतिमंद मुलांकरिता शाळा बांधणे.**

राकेश शाह :-

**मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे आ.क्र. 246 हे “खेळाचे मैदान” साठी आरक्षित असून सदर आरक्षणाचे विकास योजनेप्रमाणे एकूण क्षेत्र 20000 चौ.मी. असून त्यापैकी 14486.90 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले आहे.**

**मिरा भाईंदर शहरामधील वाढत्या लोकसंख्येचा व शहरामधील जनतेच्या गरजा विचारात घेता विकास योजनेमध्ये विविध आरक्षणे प्रस्तावित आहेत. तथापि शहरामधील मतीमंद मुलांकरिता शाळेचे आरक्षण विकास योजनेमध्ये प्रस्तावित नसून मतीमंद मुलांसाठी शहरामध्ये एकही शाळा उपलब्ध नाही.**

**दि. 08/12/2017 रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. 46 अन्वये ठरविलेले मौजे गोडदेव, स.क्र. 327/1,2,4,5,6,8,9,11,12,14,16,17,18,21,22,25, 328/1,2,3,4पै.,5,7,11, 340/1,2,3,4,6,8,9,12, 341/6 या जागेच्या मंजूर रेखांकनातील नागरी सुविधा क्षेत्रामध्ये महिला व बालकल्याण भवन ऐवजी महानगरपालिका अधिकारी निवासस्थानाचे बांधकाम करुन मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील मंजूर तरतूदीनुसार खेळाचे मैदान या आरक्षणामध्ये 15% प्रमाणे बांधीव क्षेत्र अनुज्ञेय होत असल्यामुळे सदर क्षेत्राच्या मर्यादित आ.क्र. 246 ”खेळाचे मैदान” मध्ये मतीमंद मुलांसाठी शाळेचे बांधकाम तसेच महिला व बालकल्याण भवन किंवा मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे अनुज्ञेय असलेले बांधकाम करावे.**

**तथापि सदर बांधकामासाठी महानगरपालिकेचा निधी खर्च होणार असून चालु वर्षाच्या आर्थिक तरतूदीमध्ये याबाबत तरतूद करणेत आलेली नाही. यास्तव दि.05/09/2018 रोजी मा. महासभेने ठराव क्र. 64 अन्वये ठरविलेल्या धोरणाप्रमाणे शहरामधील विकासक महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्रासाठी शुल्काचा भरणा करुन भूखंडाची मागणी केल्यास त्याबाबत विकासकाला विकासासाठी मिळणा-या 30% जागेमध्ये वर नमुद केल्याप्रमाणे मतीमंद मुलांसाठी शाळेचे बांधकाम तसेच महिला व बालकल्याण भवन किंवा मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे अनुज्ञेय असलेले बांधकाम विकासक विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधून देत असल्यास आ.क्र. 246 मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील जागा ठरलेल्या धोरणाप्रमाणे जागेसाठीच्या रक्कमेचा भरणा करुन घेऊन एक खास बाब म्हणून विकासकास महापालिकेच्या ताब्यातील जागा हस्तांतरीत करणेसाठी व त्याअनुषंगीक सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देण्यासाठी हि सभा मंजूरी देत आहे.**

**काही कारणास्तव जर विकासक वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस तयार नाही झाल्यास सदर आ.क्र. 246 ”खेळाचे मैदान” या आरक्षणामध्ये महानगरपालिकेने मतीमंद मुलांसाठी शाळेचे बांधकाम तसेच महिला व बालकल्याण भवन किंवा मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे अनुज्ञेय असलेले बांधकाम करावे व त्यासाठी आवश्यक पुर्न:विनियोजन करणेसाठी हि सभा मंजूरी देत आहे.**

अनिल विराणी :-

माझे अनुमोदन आहे.

स्नेहा पांडे :-

मा. महापौर मॅडम, जहातक मेरी ऐसी जानकारी है की, गव्हरमेंट ने अभी मतिमंद बच्चों के लिए अलग से स्कुल का परमिशन देना बंद किया है। उनको मेन स्ट्रीम मे ही पढाना है। ऐसा प्राईम मिनिस्टर साहब का ऑर्डर है। और सुप्रीम कोर्ट का जी.आर. भी है। तो स्कुल का परमिशन मिला हुआ है क्या? नही तो हम लोग कंस्ट्रक्शन करेंगे बाद में हम तो परमिशन भी नही मिलेगा। ऐसे बच्चो को दिव्यांग बच्चो को मेनस्ट्रीम में ही जनरल बच्चो के साथ, नॉर्मल बच्चो के साथ ही पढाया जायें। ताकी उनको देख देखके वह कुछ सिख सके। स्पेशल स्कुलो में स्पेशली बच्चे होते है। दिव्यांग बच्चे होते है। तो उनका डेव्हलपमेंट कम हो रहा है। इस तरह का सर्व्हे हूँआ है। जी.आर. मे ऐसा आया है तो अपने को परमिशन मिला है क्या? मतीमंद बच्चो के स्कुल के लिए।

**प्रभात पाटील :-**

दिव्यांग याचा अर्थ मतीमंद. मतीमंद डाऊन सिन्ड्रम हे लक्षात घ्या. इथे मतीमंदाचा विषय आहे. मतीमंद मुलं नॉर्मल मुलांबरोबर शिकू शकत नाही. त्यांचा शिक्षणाचा पोर्षणच नसतो. त्यांना फक्त त्यांचा वेळ काढुपणा करायचा असतो. त्याच्यांकडून हस्तकलाच्या वस्तु वगैरे करून घेणे एवढेच अपेक्षित असते. म्हणून आपण जे बोलतात जे दिव्यांग मुलं म्हणजे, अपंग मुलं आणि डाऊन सिन्ड्रम जी मतीमंद मुलं हा फरक लक्षात घ्या.

**स्नेहा पांडे :-**

दिव्यांग बच्चे जो कर्ण बधीर होते है, अनको एरींग इम्पेक्ट जो एम.आर. होते, मेन्टली रिटायर्ड, जो मतीमंद होते है। सबका अलग अलग डिपार्टमेंट है। उसके लिए हम लोग अलग अलग सेंटर चालू कर सकते है। स्कूल का परमिशन मिला है क्या? इतनाही मैं कमिशनर साहब से पुछ रही हु। जो बच्चे बोल नही सकते उनके लिए फिजियोथेरेपी दी जाती है। जो बच्चे सुन नही सकते उनके लिए साऊंड प्रुव्ह रूल बनाके उन्हको ऑडीनेटरी तरीके से पढाया जाता है। मैं भी एक स्पेशल टिचर हूँ। इसलिए मुझे स्पेशल बच्चों कि सारी जानकारी है। इसलिए मैंने पूछा है। मेन्टली रिटायर्ड बच्चा एम.आर. और मतीमंद दोन्हो मे काफी डिफरन्स है। और उनको एक टिचर सिखा नही सकती। कमिशनर साहब इसका खुलासा करेंगे तो अच्छा रहेगा।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलतोय. मा. आयुक्त साहेब, एक तर ठराव काय वाचलं ते कळलं नाही. कुठे बनवणार आहेत काय आहे. एक कॉपी मिळाली असती तर बरं झालं असतं. म्हणजे त्या अनुषंगाने आम्ही मा. आयुक्त साहेब ह्या विषयाला प्रशासनाचा गोषवारा नाही कारण काय?

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, गंभीर विषय असला तर तुम्हाला गोषवारा द्यायला पाहिजे प्रशासनाने.

**अनिल सावंत :-**

हे आरक्षण आहे, २४६ नंबर आरक्षण आहे. खेळाचे मैदान ह्या शहरामध्ये बरीचशी आरक्षण खेळाची मैदानं आपण गळप करायच्या मार्गावर आहेत. त्यातला हा एक प्रकार आहे. २४६ आरक्षण आहे खेळाचे मैदान त्या खेळाच्या मैदानामध्ये महिला-बालकल्याण भवन आणि मतीमंद शाळा आपण बांधू शकतो का? अनुज्ञेय आहे का?

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाचा हा विषय नाही. महापौर आणि पदाधिका-यांनी हा विषय घेतलेला आहे. ठराव आम्ही हंडरेड परसेंट तपासून जर कायद्यात बसत असेल, तर त्याची आम्ही अंमल करू नाही तर अनुज्ञ केले जाईल.

**अनिल सावंत :-**

आज ह्या ठिकाणी २४६ नंबर आरक्षण आहे. जवळ जवळ ७० ते ८० टक्के जागा आपल्या ताब्यात आहे. खेळाचे मैदान आपण त्या ठिकाणी बनवलेला आहे. फक्त २० टक्के जागा विकासकाकडे आहे. आणि परत आपण येथे संपुर्ण आरक्षण विकासकाला द्यायच्या मागे लागलेलो आहेत.

**मा. आयुक्त :-**

आज जरी महासभा ह्या बाबतीत निर्णय घेतला तर तो ठराव आपल्याकडे आल्यानंतर प्रशासन त्याच्यावर लिगल आणि ए.डी.टी.पी. चे अभिप्राय घेऊन आणि तो धोरणात्मक जे काही निर्णय असेल तर सभेसमोरच तो विषय येईल. परस्पर प्रशासन निर्णय घेणार नाही.

**अनिल सावंत :-**

भाईंदर ईस्टला जे मतीमंद मुलांची शाळा आहे त्याची काय परिस्थिती आहे. चालू आहे का ती?

**मा. आयुक्त :-**

मतीमंद मुलांची शाळा आम्ही आता चालू करतोय. मी स्वतः जाऊन पाहणी करुन आलेलो आहे. साधारणतः दिपावलीच्या पुर्वी आपली शाळा होती, ती आम्ही चालू करू.

**अनिल सावंत :-**

साधारण शहरामध्ये किती मुलं आहेत, शाळेत किती मुलं आहेत, आपल्याकडे काही नोंद वगैरे आहे का? किती साधारण बघून घ्या. त्यांच्यासाठी मतीमंद मुलांची शाळा बांधा. महिला-बालकल्याण भवन सुध्दा बांधा पण याठिकाणी खेळांची मैदानाची वाट लावू नका किंवा खेळांची मैदान पूर्ण विकासकाच्या घशात घालू नका.

**मा. आयुक्त :-**

नियमात बसत असेल आणि महासभेला ते करता असेल तर निश्चित तो प्रस्ताव तपासून महासभेसमोर सादर केला जाईल.

**गिता जैन :-**

टाऊन प्लॅनिगचे येथे बसलेले आहेत. बसते कि नाही ते तुम्ही आता विचारू शकता पुढे कशाला.

**मा. आयुक्त :-**

मी सुध्दा पुर्ण ठराव ऐकलेला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, ठरावामध्ये क्लिअरकट म्हटलेले आहे की, खेळाच्या मैदानामध्ये जे आरक्षण आहे. त्या आरक्षणामध्ये १५ टक्के प्रमाणे बांधू शकतो. अनुज्ञेय होत आहे. आणि त्याच प्रमाणे बांधतोय. त्याच्यामध्ये महिला-बालकल्याण किंवा मंजुरी विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे अनुज्ञेय असलेले बांधकाम करावे. असा आम्ही क्लिअर म्हटले आहे. कि महापालिकेच्या जागेतील जागा हस्तांतरीत कराण्यासाठी व त्या अनुषंघाने सर्व कारवाई करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात आलेले आहेत. साहेब याच्यात काही चुकीचे नाही. आम्ही जे डी.सी. रूलमध्ये ॲप्लीकेबल आहे. आणि याचे संपुर्ण अधिकार आपणांस दिलेले आहेत. कोणतेही खेळाचे मैदान घशात आणि खिशात टाकायचा कुठलाही प्रकार नाही. हे लक्षात ठेवा.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमचा जो दृष्टीकोन आहे तो चेंज करा.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

अशा मोकळ्या जागांवरच तुमचा का डोळा असतो.

**सुरेश खंडेलवाल :-**

ते डी.सी. रूलमध्ये प्रोव्हीजन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महिला-बालकल्याण भवन बांधले पाहिजे. अंध-अपंगांची शाळा बांधली पाहीजे. हे आपले कर्तव्य आहे. आणि आपण चांगले काम केले आहे. ह्या शहरामध्ये आपण हे काम आरक्षण बांधकामात करू शकतो. त्याचमुळे आपण केलेले आहे. त्याचे सर्व अधिकार आपणाला दिलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

ते करु शकतो किंवा नाही करु शकत. त्याच्यासाठी आधी एक तर डी.सी. रुलचे आता यांनी नाव काढले. तो विकास नियंत्रण नियमावली मध्ये स्पष्ट उल्लेख आहे. १०० टक्के जागा ती तुमच्याच ताब्यात पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

जागा आल्यानंतरच ते होईल.

**जुबेर इनामदार :-**

नंतर तो विषय फेर प्रस्ताव आणा एवढी घाई कशाला? कोणाला दाखवत आहेत. हम यह बनायेंगे, हम वो बनायेंगे, हम १५ लाख देंगें, हम मेट्रो लायेंगे। हेच चालले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

एक विषयाचा खुलासा करतो. आपण विषयावर बोलु. सन्मा. पाटील आणि गिता मॅडम ने एक मुद्दा उपस्थित केला. खेळाचे मैदान आणि गार्डन यामध्ये आपल्याला इक्रियेशन १५ टक्के बांधकाम करता येतो. आपण शासनाकडून बाळासाहेब ठाकरेंचा निर्णय घेतलेला आहे. ग्राउंड फ्लोअरला काही भाग आणि अप्पर फ्लोअरला काही भाग जरी ठराव झाला तरी मी आपल्या सभागृहाला पुनःश्च सांगु इच्छितो. नियमाने जर चांगले करता येत असेल तो प्रस्ताव परत सभागृहासमोर येईल. आणि जे करता येत असेल ते केले जाईल, नाही तर अमलबजावणी केली जाणार नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब ठरावामध्ये यांनी विकासकाला अधिकार दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

डायरेक्ट कसे देता येईल. प्रस्ताव सभागृहासमोर येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब ह्यांनी चुकीचे वाचलेले आहे. साहेब आपण दोन्ही पर्याय ठेवलेले आहेत. सगळ्यांनी पण ठेवलेले आहे. एक प्रशासनाने पण ठेवलेले आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब रेफरन्स यांनी विकासकाला दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्या सभागृहाची सार्वभौम मान्यता घेऊनच पुढे काम केले जाईल. हा एखादा प्रस्ताव रिपीट झाला या माध्यमातुन एक विषय तयार झाला एवढे मी म्हणेन.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक चांगली शाळा म्हणजे वास्तु निर्माण होते ना साहेब?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आज एवढी महानगरपालिकेच्या ताब्यात ८० टक्के आलेली जागा विकासकाकडे कशाला द्यायची. महानगरपालिका आहे ना कॅपेबल.

**मा. आयुक्त :-**

दोन गोष्टी आहेत. विकासक तो घ्यायचा असेल तर आर.आर. प्रमाणे आपल्याला पैसे जमा करावे लागतात. आणि त्याचे १०० टक्के जो परसेंट असतो, तो खेळासाठीच मोकळा ठेवावा लागतो. त्याचे खुप धोरणे आहेत. आपण ते सभागृहासमोर आणु.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही त्या आरक्षणामध्ये विकासक एकच पाहिजे ना साहेब? त्याच्यासाठी एका माणसाची मालकी पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

यांनी मुद्दा काय मांडला विकासकाला का द्यायचे. ते आपण ओपनली सुध्दा टेंडर काढु शकतो.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मागच्या वर्षीपण ठराव झालेला आहे की, ह्या मिरा भाईंदर मध्ये भुमिपुत्रांचे आगरी भवन साठी आपण ठराव केला होता आणि तो ठराव आपल्याला त्या हिशोबाने तिथे ती जागा ८० टक्के जी महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. तिथे आपल्याला आगरी भवन बनवायचे प्रस्ताव.............

**मा. आयुक्त :-**

करता येईल, आगरी भवन करता येईल.आपल्याला महिला-बालकल्याण करता येईल. इथे आपल्याला संधी भेटेल. १५ टक्के मध्ये आपल्याला करता येईल.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न करत असेल तर हे योग्य नाही.

**दिनेश नलावडे :-**

१५ टक्के मध्ये आगरी भवन कसे बांधता येईल. आपण आगरी भवन साठी ऐवढी मोठी जागा उपलब्ध करून दिलेली आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

पहिला ठराव केलेला आहे. त्याठिकाणी १२२ आरक्षण क्र. १२२ त्याठिकाणी हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी विषय आला. त्यानंतर तिथे आगरी भवनाचा विषय मग तो विषय प्रलंबित आहे. आणि आपले आगरी भवन तिथे पास झालेले आहे. त्याच्यानंतर तिथे पण जागा भेटली नाही. तर ते २४६ आरक्षण क्रमांकमध्ये आपण ते आगरी भवनचा ठराव झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

मी तपासुन घेईल पुर्वीचा ठराव. आता झालेला ठराव आणि त्याच्यात नियमाने काही करता येत असेल तर ते सभागृहासमोर दुबार आणले जाईल.

**गिता जैन :-**

महिला-बालकल्यांणचा ठराव पहिलाही झाला होता त्याचे काय झाले?

**मा. आयुक्त :-**

मी सभागृहाला सांगु इच्छितो. महिला-बालकल्याण ज्याठिकाणी प्रस्तावित केलेले आहे. त्याची अमलबजावणी करता येणार नाही.

**गिता जैन :-**

मी तेच सांगत आहे साहेब जेव्हा अमलबजावणी करता येत असतील त्यांना द्या ना.

**मा. आयुक्त :-**

संबंधित विकासकाची आमची चर्चा चालु आहे आणि त्याठिकाणी अंतीम आपण १६ फ्लॅट अधिकाऱ्यांसाठी बांधुन देत आहोत.

**गिता जैन :-**

मग तिथे महिला-बालकल्याण भवन होऊ शकत नाही. पहिला आपण ठराव पास केलेला करायचा. आता परत दुसरं आता पण तेच वाद. कशाला वादावाद. एक क्लिअर जागा द्या. महिला बालकल्याण भवन द्यायचे आहे की नाही. तुमची नियत आहे की नाही द्यायची.

**मा. आयुक्त :-**

महिला बालकल्याणासाठी सुद्धा आम्ही जागा सोडतो.

**अनिल सावंत :-**

साहेब, ह्या ठरावामध्ये ठराव आपण व्यवस्थित ऐकला नाही.

**मा. उपमहापौर :-**

जुबेर साहेब आपला ठराव असेल तर मांडा. महिला बालकल्याण विषयी त्यांच्या स्वःतच्या प्लॉट बद्दल ते बोलत आहेत. विकासक म्हणजे ते आहेत.

**अनिल सावंत :-**

कुठचे २४६? ह्या ठरावामध्ये पालिकेच्या ताब्यातली जागा परत विकासकाला रिर्टन करायची सुद्धा ठरावामध्ये त्यांनी म्हटलेले आहे. मोबदला घेऊन.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण एवढे चांगल्याप्रमाणे समजून सांगितले तरी सावंत साहेबांची समजुन घेण्याची इच्छाच ठेवत नाही तर कसे समजणार.

**अनिल सावंत :-**

मी तुमचा ठराव वाचतो ना.

**सुरेश खंडेलवाल :-**

आमचा ठराव राहू द्या. तुम्ही तुमचा ठराव वाचा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठराव क्र. ६४ अन्वये ठरविलेल्या धोरणाप्रमाणे शहरामधील विकासक महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्रासाठी शुल्काचा भरणा करून भुखंडाची मागणी केल्यास त्याबाबत विकासकाला विकासासाठी मिळणाऱ्या ३० टक्के जागेमध्ये वर नमुद केल्याप्रमाणे मतिमंद मुलांसाठी शाळेचे बांधकाम तसेच महिला व बालकल्याण भवन किंवा मंजुर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे अनुज्ञेय असलेले बांधकाम विकासक विकास हक्क प्रमाण पत्राच्या मोबदल्यात बांधुन देत असल्यास आरक्षण क्रमांक २४६ मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील जागा ठरलेल्या धोरणाप्रमाणे जागेसाठीच्या रक्कमेचा भरणा करून घेऊन एक खास बाब म्हणून विकासकास महानगरपालिकेच्या ताब्यातील जागा हस्तांतरीत करणेसाठी व त्याअनुषंगीक सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देण्यात आलेले आहे. मा. महापौर मॅडम, आम्ही ठराव केलेला आहे. आमची आपणास विनंती आहे की, आपण ठराव मंजुर करावा. अन्यथा त्यांना सांगा ठराव ठेवा.

**गिता जैन :-**

साहेब, माझा छोटासा प्रश्न आहे. त्या मैदानामध्ये तुम्ही हे दोन बांधु शकतात का? अकॉर्डींग टू डी.सी. रूल हे तुम्ही करू शकता का?

**मा. आयुक्त :-**

मला काय म्हणायचे आहे. तुम्हाला स्पष्ट सांगतोय. परमिशनेबल अलाऊड असेल तरच हा प्रस्ताव............

**गिता जैन :-**

साहेब महासभेमध्ये विषय आणताना मला निदान हे तरी खात्री पाहिजे की हा विषय पुर्ण स्टडी झालेला आहे. होणार की नाही? ते तरी तुमच्या अधिकाऱ्यांनी सांगावे. होणार तर करू मग विषय कशाला आणताय.

(सभागृहात गोंधळ)

**गिता जैन :-**

विषय आणायचा त्यांचा अधिकार आहे मी मान्य करते. काहीही आणा पण त्यामध्ये प्रश्न विचारायला ते नियमात बसते की नाही ते विचारायचा आमचा हक्क आहे का? का तो ही नाही.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला सुरूवातीला स्पष्टपणे सांगितले आहे. नियमाने याच्यात काही शक्य असेल त्याचा पुर्ण अभ्यास केला जाईल. आवश्यक त्या बाबी तपासले जातील काही याच्यात प्रशासनाचे याच्यात काही अजुन काही कंडीशन टाकाव्या लागतील. महानगरपालिकेचा फायदा बधितला जाईल. तो सविस्तर प्रस्ताव सभागृहासमोर येईल. हा ठराव १०० टक्के इमप्लिमेन्ट होणार नाही.

**गिता जैन :-**

याचे अधिकार आपल्याला दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

दिले तरी मी कधी माझ्या आयुष्यात अधिकार वापरलेले नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब बोला ना माझा गोषवारा नाही. मी करणार नाही.

**मा. उपमहापौर :-**

मा. आयुक्त साहेब तुम्ही सभागृहाला चुकीची माहिती देऊ नका. हा महापौरांचा अधिकार आहे. महापौरांनी स्वतःच्या अधिकारात हा विषय आणला आहे. मग तुम्ही जर सांगत असाल महिला-बालकल्याण भवन का बदलले? का केले नाही तर त्याचे कारण पण सांगा कोणासाठी नाही केले. हे सभागृह सुप्रीम ॲथोरीटी आहे. सभागृहाने विषय का आणलेला आहे. ह्या शहराच्या हितासाठी हा विषय आणलेला आहे. आणि तो विषय आणला तो तिथे का बसला नाही. ती जागा आपली होती मग विकासकाला का दिली. मग त्याठिकाणी महिला बालकल्याण भवनच्या ठिकाणी आपण महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी फ्लॅट द्यायला कबुल केले तो ठराव चुकिचा नव्हता.

**गिता जैन :-**

मग करा ना. मग तिथे करा. तुम्ही का करत नाही.

**मा. उपमहापौर :-**

तिथे कुठे जागा खाली आहे. त्या त्या ठिकाणी आणि ही काही आमच्यासाठी वास्तु बनवत नाही. ह्या शहरातल्या मतिमंद मुलांसाठी जर आपल्याला आधार देत असेल तर आपण तो दिला पाहिजे. त्या ठिकाणी काही तरी माझे राजकारण चालते. मला बोलता येते म्हणुन बोलुन चालणार नाही. हा विषय गंभीरतेने घ्या. नाही त्या जागी झाला तर दुसऱ्या जागी करू.

**अनिल सावंत :-**

साहेब त्या ठिकाणी होणारच नाही तर तुम्ही कशाला ठराव करत आहात. दुसऱ्या जागी करा ना.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही केला आहे. आम्ही नाही केला आम्हाला जागा मिळाली नाही. पुढचा ठराव करू. देण्याची आमची मानसिकता आहे.

**अनिल सावंत :-**

हे होणारच नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ती देण्याची नाही घेण्याची आहे.

(सभागृहात गोंधळ)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

त्या समाजासाठी आगरी भवनासाठी आम्ही मागणी केलेली होती. तीच जागा तुम्ही परत इकडे............

**मा. उपमहापौर :-**

आम्ही स्थानिक भुमिपुत्र आहोत. आम्ही आगरी कोळीची काळजी करायला परिपुर्ण आहोत.

**मा. महापौर :-**

यह विषय डायव्हर्ट हो रहा है। आपका ठराव होगा तो आप पढीए।

**अनिल सावंत :-**

मतिमंद मुलांकरीता शाळा बांधणे उपरोक्त गोषवारा मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने दिलेला नाही. तरी सदर विषय फेटाळण्यात येत आहे सदर जागेत शासनाचा निर्णयाप्रमाणे करण्यात यावे. (क्र. टी.पी.एस.-१८१२/३०३७/प्र.क्र./४९२/१३)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

दोन ठराव आलेले आहेत. सचिव मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८५ करीता दोन ठराव आलेले आहेत.

पहिला ठराव सुचक श्री. राकेश शाह, अनुमोदन श्री. अनिल विराणी. दुसरा ठराव सुचक श्री. अनिल सावंत, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास पुकारतो. सुचक श्री. अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. राकेश शाह ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. राकेश शाह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४६, विरोधात २४, तटस्थ १ इतकी मते पडलेली आहेत. श्री. राकेश शाह यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ८५ :-**

**मतिमंद मुलांकरिता शाळा बांधणे.**

ठराव क्र. ८६ :-

**मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे आ.क्र. 246 हे "खेळाचे मैदान" साठी आरक्षित असून सदर आरक्षणाचे विकास योजनेप्रमाणे एकूण क्षेत्र 20000 चौ.मी. असून त्यापैकी 14486.90 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले आहे.**

**मिरा भाईंदर शहरामधील वाढत्या लोकसंख्येचा व शहरामधील जनतेच्या गरजा विचारात घेता विकास योजनेमध्ये विविध आरक्षणे प्रस्तावित आहेत. तथापि शहरामधील मतीमंद मुलांकरिता शाळेचे आरक्षण विकास योजनेमध्ये प्रस्तावित नसून मतीमंद मुलांसाठी शहरामध्ये एकही शाळा उपलब्ध नाही.**

**दि. 08/12/2017 रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. 46 अन्वये ठरविलेले मौजे गोडदेव, स.क्र. 327/1,2,4,5,6,8,9,11,12,14,16,17,18,21,22,25, 328/1,2,3,4पै.,5,7,11, 340/1,2,3,4,6,8,9,12, 341/6 या जागेच्या मंजूर रेखांकनातील नागरी सुविधा क्षेत्रामध्ये महिला व बालकल्याण भवन ऐवजी महानगरपालिका अधिकारी निवासस्थानाचे बांधकाम करुन मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील मंजूर तरतूदीनुसार खेळाचे मैदान या आरक्षणामध्ये 15% प्रमाणे बांधीव क्षेत्र अनुज्ञेय होत असल्यामुळे सदर क्षेत्राच्या मर्यादित आ.क्र. 246 "खेळाचे मैदान" मध्ये मतीमंद मुलांसाठी शाळेचे बांधकाम तसेच महिला व बालकल्याण भवन किंवा मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे अनुज्ञेय असलेले बांधकाम करावे.**

**तथापि सदर बांधकामासाठी महानगरपालिकेचा निधी खर्च होणार असून चालु वर्षाच्या आर्थिक तरतूदीमध्ये याबाबत तरतूद करणेत आलेली नाही. यास्तव दि.05/09/2018 रोजी मा. महासभेने ठराव क्र. 64 अन्वये ठरविलेल्या धोरणाप्रमाणे शहरामधील विकासक महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्रासाठी शुल्काचा भरणा करुन भूखंडाची मागणी केल्यास त्याबाबत विकासकाला विकासासाठी मिळणा-या 30% जागेमध्ये वर नमुद केल्याप्रमाणे मतीमंद मुलांसाठी शाळेचे बांधकाम तसेच महिला व बालकल्याण भवन किंवा मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे अनुज्ञेय असलेले बांधकाम विकासक विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधून देत असल्यास आ.क्र. 246 मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील जागा ठरलेल्या धोरणाप्रमाणे जागेसाठीच्या रक्कमेचा भरणा करुन घेऊन एक खास बाब म्हणून विकासकास महापालिकेच्या ताब्यातील जागा हस्तांतरीत करणेसाठी व त्याअनुषंगीक सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देण्यासाठी हि सभा मंजूरी देत आहे.**

**काही कारणास्तव जर विकासक वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस तयार नाही झाल्यास सदर आ.क्र. 246 "खेळाचे मैदान" या आरक्षणामध्ये महानगरपालिकेने मतीमंद मुलांसाठी शाळेचे बांधकाम तसेच महिला व बालकल्याण भवन किंवा मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे अनुज्ञेय असलेले बांधकाम करावे व त्यासाठी आवश्यक पुर्न:विनियोजन करणेसाठी हि सभा मंजूरी देत आहे.**

सुचक :- श्री. राकेश शाह    अनुमोदक :- श्री. अनिल विराणी

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | १.जैन गीता भरत |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | नलावडे दिनेश दगडु | |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | शिर्के अनंत गेणू | |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | सोंस निला बर्नाड | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | मोकाशी दिपाली आनंदराव | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १६ | अरोरा दीपिका पंकज | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | नाईक विविता विवेक | १७ | शेख रुबीना फिरोझ | |
| १८ | भावसार वंदना संजय | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | बेलानी हेमा राजेश | १९ | परदेशी गिता हरीश | |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | २० | पाटील वंदना विकास | |
| २१ | सोनार सुरेखा प्रकाश | २१ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २२ | अहमद साराह अकरम | |
| २३ | शाह राकेश रतिशचंद्र | २३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २४ | शेट्टी अरविंद आनंद | २४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २६ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| २७ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २८ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २९ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३० | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३१ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३४ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३५ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३६ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३७ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३८ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४१ | **दुबे मनोज रामनारायण** | | | |
| ४२ | **व्यास रवि वासुदेव** | | | |
| ४३ | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | | | |
| ४४ | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| ४५ | **भोईर गणेश गजानन** | | | |
| ४६ | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८६, **महापालिका क्षेत्रात साजरे करण्यात येणारे सण /उत्सवाकरिता बांधण्यात येणाऱ्या मंडपाजवळ जाहिरात फलक, बॅनर्स यांना परवानगी देणेबाबत.**

**प्रशांत दळवी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बोर्ड/ बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण थांबविणेसाठी मा.महासभा दि.०५/०९/२०१८ ठराव क्र .७२ अन्वये अधिकृत होर्डिंग्ज , कॅन्टीलीवर, कमानी व्यतिरीक्त जाहिरात करण्यास मनाई करण्यांत आलेली आहे.

तथापी शहरातील सार्वजनिक जागेवर सर्वधर्मीयांमार्फत साजरे करण्यात येणारे सण / उत्सवा निमित्त प रवानगी घेऊन बांधण्यात येणाऱ्या मंडपाच्या शेजारी जाहिरातीचे फलक, बॅनर्ससाठी परवानगीची मागणी करण्यात येत आहे.

याअनुषंगाने मा .आयुक्त सो . यांचेकडे दि .०८/१०/२०१८ अन्वये टिपणी सादर करण्यांत आलेली आहे . सदर टिपणीस मान्यता देऊन मा .आयुक्त सो . यांनी मा .महापौर महोद या यांचे अध्यक्षतेखाली मा .पदाधिकारी व गटनेते यांची बैठक बोलविण्याकामी सुचविले होते . याअनुषागाने आज दि . ११/१०/२०१८ रोजी ठिक १२.०० वा. महानगरपालिकेच्या लाल बहादुर शास्त्री सभागृहात, (स्थायी समिती ) मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षेतेखाली बैठक बोलविण्यांत आली होती. सदर बैठकीत महानगरपालिकेचे सर्व प्रभाग अधिकारी, विभागप्रमुख अतिक्रमण विभाग तसेच सर्व राजकिय पक्षाचे गटनेते उपस्थित होते.

सदर बैठकीत विषयांकीत प्रकरणी साधक बोधक चर्चा होवून महानगरपालिका क्षेत्रात साजरा होणाऱ्या सर्वधर्मिय उत्सवासाठी, प्रदर्शने इ. सामाजिक व शैक्षणीक कार्यक्रम व उपक्रमांसाठी मंडपाला लागुन रस्त्यावरुन दिसणाऱ्या दर्शनी भागापूरतीच संबंधित मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण ) नियम २००३ च्या अधिन राहून एका बॅनर /कटआउट साठी मा .स्थायी समिती सभा दि .२९/०२/२००८ ठराव क्र .४३ अन्वये व मा .महासभा दि .१९/०३/२००८ ठराव क्र .३५ अन्वये निश्चित केलेल्या दराप्रमाणे जाहिरात फी वसुल करुन परवानगी देण्यांत यावी असे मा .महापौर यांनी घेतलेल्या बैठकीत निश्चित करण्यांत आले. सदर सुचनेनुसार मा.महासभा दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातच्या धोरणामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसुची 'ड' प्रकरण क्र.२ मधील नियम 'र' नुसार पारीत केलेल्या ठरावात फेरबदल करता येण्याची तरतुद आहे.

सदर तरतुदीच्या अधिन राहून मा .महासभा दि ०५/०९/२०१८ ठराव क्र . ७२ मध्ये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातीच्या धोरणामध्ये फेरबदल करण्यासाठी शिफारस आहे.

**ठराव क्र.:-**

शहरात महापालिकेचे जाहिराती बाबतचे दर यापूर्वीच निश्चित केलेले आहेत . त्या नियमानूसार यापूढे खालीलप्रमाणे जाहिराती लावणेकरीता परवानगी देण्यात यावी.

१) मिरा भाईंदर शहरात होणाऱ्या सार्वजनिक जागेवर धार्मिक , सांस्कृतिक, सामाजिक व क्रिडा विषयक कार्यक्रम महापालिकेने तात्पुरत्या स्वरुपात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

२) सदर कार्यक्रमाच्या निश्चित केलेल्या एक दिवस अगोदर , कार्यक्रमादिवशी व कार्यक्रमाच्या एक दिवसानंतर जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

३) कार्यक्रमाच्या प्रवेशद्वाराजवळ एकच बॅनर किंवा एकच कमान लावण्यास परवानगी देण्यात यावी.

४) सदर जाहिरातीवर महापालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणे आकारणी करण्यात यावी.

५) तसेच आरक्षि त जागेवर कार्यक्रमास परवानगी दिल्यास त्यांचेकडून फक्त दर्शनी भागात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी व त्यांचेकडून निश्चित केलेल्या दराप्रमाणे फी भरण्यात यावी . तसेच कार्यक्रमाच्या आतील भागात जाहिरात केल्यास त्याच्यावर जाहिरात कर लावण्यात येवू नये.

६) एखादा सार्वजनिक हिताचा खाजगी कार्यक्रम हाती घेतल्यास त्याला वरील अटीशर्तीवर परवानगी देण्यात यावी . तसेच सदर कार्यक्रमाचा दिशादर्शक व अतिमहत्वाचे व्यक्ती येणार असल्यास विशेष बाब म्हणून मा . आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात सदर कार्यक्रमाला परवानगी देण्यात यावी.

७) कार्यक्रमाचे विनापरवानगी जाहिरात केल्यास प्रती बॅनर वर रु.१०,०००/- दंडाची आकारणी करण्यात यावी तसेच सदर व्यक्तीने, संस्थेने दुसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्यावर देखील दंडाची कारवाई त्याच दराने करण्यात यावी व तिसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्या चे विरुध्द दंड व कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा.

८) शहरात सार्वजनिक जागा, भिंती यावर स्टिकर लावणे, रंगकाम करणे यावर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच सार्वजनिक भिंती रंगविणे, स्टीकर लावणे याकरीता परवानगी देण्यात येवू नये.

९) खाजगी वाहने, रीक्षा या माध्यमातून जाहिरात होत असतील तर त्यावर मंजुर दराप्रमाणे जाहिरात कर आकारणी करून फी वसुल करणे बंधनकारक राहिल.

१०) शाळा, कॉलेज, कंपनीची खाजगी वाहने यांना जाहिराती मधून वगळण्यात येत आहे.

११) खाजगी जागेत होर्डींग्ज , बॅनर, फलक लावले असतील त्यांना हे नियम लागू होणार नाहीत . मात्र रस्त्याच्या बाजूला दर्शनी भागात जाहिरात केल्यास त्याला जाहिरात फी लागू होईल.

१२) खाजगी संकुलने , खाजगी जागा यामधील जाहिरातींना कोणतीही परवानगी घेण्याची आवश्यकता नाही मात्र रोडच्या दर्शनी बाजूला जाहिरात केल्यास त्यांना जाहिरात फी लागू होईल.

१३) जी खाजगी आरक्ष णे, आरक्षित उद्याने महापालिकेच्या ताब्यात असतील व त्यांच्या सोयी सुविधा महापालिका पुरवित असेल व ती खाजगी संकुले असतील तरी त्यांना जाहिरात दर लागु होणार.

१४) कार्यक्रमाच्या मुख्य प्रवेशद्वारावर रस्ता सोडून कार्यक्रमाच्या प्रवेशद्वारावर नियमानूसार कमानीची परवा नगी देण्यात यावी.

१५) वरील जाहिरातीचे धोरण प्रामाणिक व कडक अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकेस मनुष्य बळ कमी पडणार आहे. त्यासाठी मा. आयुक्त यांनी साधन सामुग्री मनुष्यबळासह निविदा काढावी तसेच मा. आयुक्त यांनी दंडात्मक रक्कम वसुल झालेल्या रक्कमेतून ठेकेदारास ५० टक्के रक्कम प्रोत्साहनार्थ (इंन्सेटीव्ह) देण्यात येईल अशा प्रकारे ३ वर्षाकरीता निविदा काढण्यात यावी.

१६) नागरीकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारी ठेकेदारास प्राप्त झाल्यावर त्यांनी त्यांचेवर कारवाई न केल्यास त्यांचेवर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

वरील सर्व अटीशर्तीचे कठोरपणे कारवाई करावी.

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, गटनेत्यांच्या बैठकीमध्ये कारण जो जाहिराती संदर्भात जो ठराव झाला होता. 'क' च्या प्रस्ताव होता तो सर्वानुमते मान्य करण्यात आला. त्याला अजुन ३ महिने उलटले नाही. नवीन ठराव त्याच्यावरती होऊ शकत नाही. दुरूस्ती होती ती गटनेत्यांच्या बैठकीमध्ये आम्ही ती करून दिली. तेवढा पुरता विषय असायला पाहिजे. आता नवीन निविदा कोणाला काढून देता. थोडक्यात ३ महिने अजुन झालेले नाहीत. दुसरा ठराव मांडता येत नाही. हा असा लांबलचक ठराव मांडायची गरज नाही.

**सुरेश खंडेलवाल :-**

तो बंदीचा होता.

**प्रशांत दळवी :-**

ठराव तोच आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठराव तो नाही.

**प्रशांत दळवी :-**

ठराव तोच आहे. ठरावामध्ये थोड्याशा सुचना आणि बदल करण्यात आलेला आहे. बाकी ठराव तोच आहे.

**जुबेर इनामदार :-**

तुमच्या सुचनेमध्ये फक्त आणि फक्त मंडपवर एक जाहिरात...........

**प्रशांत दळवी :-**

तोच आहे. दुसरे नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तेच केलेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

तेच म्हटलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

बाकिचे कुठून आले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कार्यक्रमाचा प्रवेश द्वारा जवळ.

**जुबेर इनामदार :-**

विषय शाळेचा आला. विषय निविदेचा आला हा कुठून आला?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एकच बॅनर किंवा एकच कमान लावण्यास परवानगी देण्यात यावी.

**जुबेर इनामदार :-**

ठिक आहे. ती पण योग्य आहे मग बाकिचे काय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्या इमप्लिमेन्टेशनसाठी काही तरी केले पाहिजे ना.

**जुबेर इनामदार :-**

परंतु साहेब तुम्ही करू शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

इक्रोचमेन्टसाठी आहे. त्या संशोधनातुन किंवा जर त्याला वेगळी यंत्रणा करत असेल तर आयुक्तांना ते अधिकार आहेत. त्याला ठराव करण्याची गरज नाही. निविदा काढण्यासाठी.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला नवीन ठराव अशाप्रकारे त्याच्यामध्ये इतका मोठा रद्द बदल करणे हे तुम्हाला करता येत नाही तीन महिन्यासाठी. सचिवांनी सांगावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो आपण करू शकतो. ऐकुन घ्या.

**जुबेर इनामदार :-**

काय करू शकतो?

**ध्रुवकिशोर पाटील ::-**

प्रकरण क्र. २ अनुसुची (ड) प्रमाणे महानगरपालिकेने पारीत केलेला कोणत्याही ठरावात तो पारीत झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र अशा ठरावात एकुण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी १/३ पालिका सदस्यांनी किंवा कोणाच्या विवश्रीत बाबतीत या अधिनियमान्वये आवश्यक असेल अशा अधिक संख्येत त्या सदस्यांनी पाठींबा दिलेल्या आणि........... ठरावाने..............

**जुबेर इनामदार :-**

आम्ही १/३ मत देत नाही. विषय संपला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम क्लिअर कट याच्यात म्हटलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

विषय एवढाच आहे. आपण गटनेत्यांच्या बैठकीत ठरविलेला तो भाग सगळा त्याच्यात आहे. त्यांनी फक्त एक ॲड केलेले आहे. प्रस्तावकाने जे ॲड केलेले आहे ते आयुक्तांनी यासाठी यंत्रणा उभारावी. मला

वाटते त्याला ठराव करण्याची गरज नाही. ते आयुक्तांचे अधिकार आहेत. फक्त त्याला निधी कुठून उपलब्ध करता येईल ते मी तपासून घेईन. तो ठरावाचा भाग करू नका. ते आपण नियमानुसार पाहू.

**ध्रुवकिशोर पाटील:-**

साहेब हे आमचे सजेशन आहे. ठरावाची अंमलबजावणी करायची की नाही करायची हा तुमचा अधिकार आहे. तुम्ही त्याच्यामध्ये करा.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब हे आमचे सजेशन आहे.

**मा. आयुक्त :-**

माझी अपेक्षा एकमत होऊन पुढे जाण्याची.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमचे पण एकच मत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

त्या गटनेत्यांच्या मिटींगमध्ये काय झाले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यात अजिबात काहीच चेंज केले नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मग निविदा वगैरे हा काय प्रकार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

टेंडर प्रोसेस त्यांनी केली पाहिजे ना.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

कशाला का पाहिजे. पालिककेकडे माणसे नाहीत का. आता तर उलटे ताण कमी झालेला आहे. निविदा काढायची गरज काय? एक बॅनर लावायचे आहे तर त्या कार्यक्रमात एका बॅनरसाठी निवीदा कशाला काढायची.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आजही ह्या वर्षामध्ये अनेक बॅनर लागलेले आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

महापौर महोदय, मी सर्वपक्षीय मिरा भाईंदर वासीयांना धन्यवाद देतो.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मा. महापौर मॅडम शहरामध्ये बॅनर रितसर एक तारखेपासुन............

**मा. आयुक्त :-**

मी भाईंदरवासियांचे मनपुर्वक आभार व्यक्त करतो. ह्या सभागृहाचे आभार व्यक्त करतो की, फार मोठा क्रांतीकारी निर्णय आपण केलेला आहे. आणि आपण एक तारखेच्या नंतर कसोशीने प्रयत्न करतो. मला चांगला फॉरमॅट मध्ये हजारो मॅसेज गुड सहीत आलेले आहे. काही मेसेज हे सुध्दा आलेले आहेत. जिथे उल्लंघन झालेले आहे. पण जर मोठा सुमारे जर आपण शहराचा बघितला आणि इतर शहरे बघितले तर आपण कोणीही मान्य करता की आपल्या शहरामध्ये एक तारखेच्या नंतर मोठी क्रांती झालेली आहे. आणि त्याच्यात तुमच्या सर्वांचे योगदान आहे. तर आपण हा सिलसिला मोठ्या प्रमाणात ऐन्ड ऑफ द पॉइंट पर्यंत पुढे नेणे अपेक्षित आहे. वास्तविक गटनेत्यांची बैठक बोलविण्याचे त्यावेळेस आम्ही पदाधिकारी यांचे कारण असे होते की, जो उद्देशाने फंक्शन होतो तो उद्देश नागरीकांना नाही समजला तर त्या फंक्शनचा अर्थच राहणार नाही. पण सर्वानुमते त्याठिकाणी एक बॅनरची अनुमती आपण निश्चित केलेली आहे. मला वाटते की आपण ह्या उद्देशाने पुढे जाऊन आणि यापुढे तुम्ही जे लावले ते १० हजार फाईन ते ऑलरेडी आपल्याकडे आहे. आणि त्याच्यावर पोलीस केस करण्याची यापुढचे आमचे निर्देश आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो आपण ठराव केलेला आहे. आपण एक धोरण करतो ना. महासभेला धोरण ठरवण्याचा अधिकार आहे ना आणि एक आपण निर्णय घेतला की, कोणीही बॅनर लावू नये. आणि जर लावायचे असेल तर एकच लावावे.

**मा. आयुक्त :-**

याची चर्चा सर्व महानगरपालिकांमध्ये होते ही वस्तुस्थिती आहे.

**गिता जैन :-**

साहेब कोर्टाचे ऑर्डर काय आहे? आता आपण कमानी सांगतो मी ऐकले होते की, कोर्टाचे ऑर्डर आहे का कमानी लावायची नाही. आणि आता पण परमिशन देतो. तुम्ही नेमके कोर्टाचे काय ऑर्डर आहे ते तरी सांगा. कमानी लावायची की नाही लावायची?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कोणत्याही रस्त्यावरती कमानी लावायला परवानगी दिलेली नाही. रस्ता सोडून कार्यक्रमाच्या प्रवेश द्वारा जवळ रस्त्यावरती कमानी लावायला परवानगी दिलेली नाही.

**गिता जैन :-**

कार्यक्रम जर रोडवर असेल तर?

**जुबेर इनामदार :-**

असे कुठेही प्रोव्हीजन नाही.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एखादा कार्यक्रम ग्राउंड वरती आहे. त्या ग्राउंड वरती कमानी  लावु शकत नाही. मग मी तेच सांगितले. कुठेही म्हटलेले नाही की रस्त्यावरती कमानी  लावायला परमिशन द्या. आम्ही काय सांगितले रस्ता सोडून जर कार्यक्रम असेल तर कार्यक्रमाच्या मंडपाच्या प्रवेश द्वाराजवळ म्हणजे याच्यामध्ये रस्ते उल्लंघन केले नाही किंवा कुठलाही निर्णय आणला नाही............

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

मा. उपमहापौर साहेब, बॅनर मुक्त मिरा भाईंदर हा विषय आम्ही एकमताने पाठिंबा देतो. पण त्या विषयाचे काय परत तुम्हाला का गटनेत्यांची मिटींग घ्यावी लागली. सत्ताधाऱ्यांकडुन तो विषय आलेला. आणि हा विषय परत सभागृहामध्ये आला का आणावा लागला. हा विषय मा. महापौर मॅडम, आमचा विषय असा आहे की, तो विषय जेव्हा महासभेत आणला त्यावेळेला पुर्ण विचाराअंती का नाही घेऊन आले. मग त्याच्यावरती तुम्ही अंमलबजावणी का नाही केली. का ठाम राहिले नाही. त्या विषयावरती परत तुम्हाला मिटींग का घ्यावी लागली?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

टोटल रस्त्यावर त्या लोकांचे तुम्ही किती नुकसान केले.

(सभागृहात गोंधळ)

**कॅटलीन परेरा :-**

९ तारखेला गणेश शेट्टी बर्थ डे ची बॅनर लावले ...............

**मा. आयुक्त :-**

नवरात्रीमध्ये नवरात्री मंडळाने कुठेही बॅनर लावलेले नाहीत.

**कॅटलीन परेरा :-**

१० तारखेला कायदा बदली का?

**मा. आयुक्त :-**

मुळात जे नवरात्री मंडळ होते त्यांचे फंक्शन जे साजरा होत होते. त्याचे सुद्धा बॅनर आम्ही अलाउड  केले नाही.

**कॅटलीन परेरा :-**

तुम्ही लोकांना सांगितले १०.३० ला माझ्या दालनात या.

**मा. आयुक्त :-**

ते सर्वांना बोलावलेले होते सर्वानुमते एक बॅनर अलाउड केले.

**कॅटलीन परेरा :-**

साहेब सर्वप्रथम नवरात्रीचे बॅनर लागले असे का? का एफ.आय.आर. झाले नाही. आपल्या महानगरपालिकेचा सिम्बॉल पण लागलेला. का याच्यावर कारवाई झाली नाही. आम्हाला तुम्ही उत्तर द्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

त्या प्रकरणात माझ्याकडे तक्रार आल्यानंतर अधिका-यांना तिथे पाठवले पंचनामा करायला. तत्पुर्वी तो बॅनर काढला गेला असावा.

**कॅटलीन परेरा :-**

साहेब, तुम्हाला लोकांनी व्हॉट्सॲप पाठविले. माझ्या समोरची गोष्ट आहे. तुम्ही बोलले १०.३० ला माझ्या दालनात या.

**मा. आयुक्त :-**

जस्टीफिकेशन करण्यासाठी पंचनामा करण्यासाठी आमचे अधिकारी गेले. तेव्हा ते बॅनर तिथे नव्हते.

**गणेश भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, तुमच्या माहितीसाठी सांगतो. तुम्ही सर्वांचे धन्यवाद मानले त्याबद्दल मी तुमचे धन्यवाद मानतो. पण तुमचे काही गर्विष्ठ अधिकारी आहेत त्यांना मी वारंवार तक्रार करून त्यांनी दोन मंडळाचे बॅनर काढले सर्व फलक काढले.

**मा. आयुक्त :-**

मी सभागृहाला सांगतो उद्या इललिगली कुणाचेही एकही बॅनर असेल तर त्यांच्यावर पोलिस केस केली जाईल. आणि त्यांचा अहवाल पुढच्या सभेत आम्ही डिटेलमध्ये सादर करू.

**कॅटलीन परेरा :-**

ते फक्त सामान्य व्यक्तीसाठी आहे बाकी कोणाला नाही.

**मा. आयुक्त :-**

कोणीही असले तरी मी आपल्याला आश्वासित करतो यापुढे इललिगल कोणाचेही पोस्टर, बॅनर बेकायदेशीर लागतील त्याच्यावर पोलिस केस केली जाईल आणि तसा अहवाल येणाऱ्या सभेमध्ये सादर केला जाईल.

**गणेश भोईर :-**

मा. आयुक्त साहेब जर एखादा अधिकारी जर सांगतो, गुन्हा दाखल करतो आणि जर केला नाही तर काय करायचे?

**मा. आयुक्त :-**

केला नाहीतर सस्पेंड केले जाईल. तुम्हाला सांगतो याच्यावर आम्ही कनफॉम राहणार. आणि ह्या शहराने एक चांगला निर्णय घेतला आहे त्याचे आम्ही कार्यपालन करणार.

**गणेश भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, तुमच्या माहितीसाठी सांगतो मला त्या अधिका-याने अक्षरशः ३ दिवस सांगितले आज काढतो. नवरात्री संपली तरी त्याने काढली नाही. त्याला जरा सस्पेंड करा.

**कॅटलीन परेरा :-**

तुम्हाला कम्प्लेंट दिलेल्या आहेत तरी कोणी ॲक्शन घेतली नाही. म्हणजे आम्ही लावायचे नाही आणि दुस-यांनी लावायचे असे आहे का?

**मा. महापौर :-**

असे नाही.

**मा. आयुक्त :-**

इललिगल कोणाचे ही बॅनर प्रोटेक्ट केले जाणार नाही. मेजर कारवाई केल्या जातील.

**गिता जैन :-**

साहेब याला एकच विचारते ५ तारखेला आम्ही ठराव पास केला की, एकही बॅनर कुठेही लावायचे नाही. इरिस्पेक्ट आपण काही मेन्शन केले नव्हते. मंडपवर लावायचे, इथे लावायचे, तिथे लावायचे तसे काही नाही. की महासभेचा ठराव आहे तो होता की नाही? मग त्यानंतर आज आपण ठरावामध्ये अमेनमेंट आज करत आहोत. दॅट मिन्स मधल्या काळात जे काही बॅनर लागलेत ते इललिगल होते. कारण आपण अमेनमेंट आता करत आहोत. तो करून तो ठराव काढायचा होता. साहेब बरोबर आहे. मग जिथे जिथे

त्या काळात बॅनर लागले. एक लागला, दहा लागले, दोन लागले ते इललिगल होते की नाही? एफ.आय.आर. किती झाली?

**मा. आयुक्त :-**

अजुन एकही एफ.आय.आर. केलेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. जर सभागृहाला तशी अपेक्षा असेल तर, माझ्याकडे पुर्ण रेकॉर्ड आहे. मी लाईनने एफ.आय.आर. दोन दिवसात करून मोकळा होतो. मला त्याच्याबद्दल काही आक्षेप नाही. मला हे सांगायचे आहे, आपण एवढा मोठा चांगला निर्णय घेतलेला आहे. १-२ टक्के त्याच्यात दुरदृष्टीने झाल्या असतील ते मी मान्य करतो. कुठलाही चांगला निर्णय अंमल करायला वेळ लागतो. आणि याच्यामध्ये ९९ त्याने अप्रिशियेट केला आणि लोकांनी अंमल केलेला आहे. मी आपल्याला शब्द देतो याच्यापुढे कोणीही याच्यामध्ये कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केला तर कोणी कितीही मोठी व्यक्ती असेल त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील.

**गिता जैन :-**

आता त्याच्याबद्दल काही बोलायचे नाही. ओके डन. एक आणखीन साहेब, तुमचे सगळे जे प्रभाग अधिकारी आहेत. त्यांना प्रशिक्षण द्या. आता आपण त्यात म्हंटलेले आहे आणि कायदाही आहे. तुम्ही प्रायव्हेट जागेमधून जाऊ शकत नाही आणि तिथले बॅनर काढू शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

माझा याच्यावर मेजर आक्षेप आहे. तुम्ही जबाबदार माजी महापौर आहात. शहरामधल्या कुठल्याही जागेमध्ये मनपाच्या कोणाचाही अधिकाऱ्याला लोकहितार्थ आम्ही सेवेसाठी जाता येते. मी कायद्यामध्ये तुम्हाला प्रत्यक्ष वाचून दाखवतो. नाहीतर शासकीय काम होणारच नाही. कोणी म्हणेल ही माझी मक्तेदारी आहे तर कोणी येता येत नाही. सद्विवेक हेतूने आयुक्तांच्या अधिनस्त अधिकारी आणि आयुक्त हे कुठेही जाऊ शकतात.

**गिता जैन :-**

मी ॲग्री केल. पण साहेब प्रायव्हेट जागेमधून बॅनर काढू शकता का?

**मा. आयुक्त :-**

प्रायव्हेट जागेमध्ये सुध्दा बॅनर लावता येत नाही. महापालिकेच्या परवानगीशिवाय.

**गिता जैन :-**

आता हे काय केले आहे.

**मा. आयुक्त :-**

तीच आपली चर्चा होती ना. प्रायव्हेट जागेतसुध्दा बॅनर लावता येत नाही. महापालिकेच्या परवानगीशिवाय.

**गिता जैन :-**

माझ्या जागेची परमिशन का म्हणून घ्यायची मला. घ्यायची म्हणा मग तुम्ही तेच सांगत आहात. तुमची जागा आहे तुम्ही एन.ओ.सी. घ्या आणि लावा.

**मा. आयुक्त :-**

हायकोर्टाचे निर्देश आणि शासनाने केलेला नियम मॅडम, एवढा सरस आहे दर्शनी भागामध्ये स्वतःच्या जागेत सुध्दा मनपाच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परवानगी शिवाय व्हीजीबल काहीही करता येत नाही.

**गिता जैन :-**

ॲग्री. पण जे दर्शनीय फक्त त्या प्रायव्हेट रोडनेच आहेत त्याचे काय करायचे? साहेब म्हणून मी सांगते की, चक्क मंडळांना हैराण करुन घेतले आहे. प्रायव्हेट आपली जी बिल्डींग आहेत त्यांना हैराण करुन घेतले आहे माझे दुसरे काहीच उद्देश नाही. सांगायचे त्या बिल्डींगमधून बॅनर खेचले गेले आहेत. मला फक्त थांबवायचे आहे. माझा दुसरा काही उद्देश नाही तुम्हांला सांगायचा.

**मा. आयुक्त :-**

प्रायव्हेटला तुम्ही म्हणत आहात आम्ही १०० टक्के अंमलबजावणी झाली नाही म्हणून सदस्य आमच्या नावाने ओरडतात ना. हे काम करत असताना त्याला दोन एक टक्का वेळ लागतो. आपण आता फार पुढे आलेलो आहोत.

**गिता जैन :-**

तुम्ही त्यांना प्रशिक्षण द्या. कुठून काढायचे.

**मा. आयुक्त :-**

ह्या अधिनस्त सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. तुमचा ठराव असेल तर मांडा.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम आमचा ठराव आहे. मा. आयुक्त महोदय, स्थायी समितीमध्ये विशेष बैठक लावण्यात आली होती ह्या विषयावर दि. ०५/०९/२०१८ रोजी "क" चा प्रस्ताव होता. "क" च्या प्रस्तावाला सर्वांनी मान्यता दिली. मान्यतेच्या अनुषंगाने सर्वानुमते एक ठराव आयुक्त महोदय एक धोरणात्मक ठराव आम्ही ह्या सभागृहात केलेला आहे. खर तर ह्या कामासाठी तुम्हाला कुठलाही ठरावाची गरज नाही आणि हा विषय स्थायी समिती समोर आली चर्चा होते वेळी आपण केलेला आहे. साहेब तुम्हाला न्यायालये, सर्वोच्च न्यायालय, सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट या सर्वांचे स्पष्ट आदेश आहेत. महाराष्ट्र प्रीव्हेशन डिमॉलेशन प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ सेक्शन २ हा क्लीयर बोलाते. जी वस्तु डोळ्याच्या समोर दिसेल कुठलीही जाहिरात त्या जाहिरातीला तुम्ही .............

**मा. आयुक्त :-**

त्यांचा गोषवारा तसाच आहे. आपले गटनेते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये जे ठरले तेच आम्ही सभागृहासमोर ठेवलेले आहे. तुम्ही आमचा गोषवारा पहा. जी तुम्ही अनुमती दिलेली आहे तेच ठेवलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्यात तुम्ही तुमच्या गोषवाऱ्याची विल्हेवाट लावली आणि विल्हेवाट लावून त्याच्यामध्ये जे काही असेल नसेल त्याची भर टाकली. तुम्ही ते वाचल्यानंतर तुम्हाला वाटेल मी कशाला ही मेहनत केली. साहेब हे तुम्हाला करायची गरजच नाही. तुमचा अधिकार आहे ते केलेच पाहिजे. न्यायालयाचे आदेश तुम्हाला पाळावे लागतील. तुम्ही कन्टेम ऑफ कोर्ट करु शकता का? साहेब होर्डिंग्जसुध्दा अलाऊड नाहीत. हे आपण करतोय म्हणून करतोय. साहेब आपल्याला रेव्हेन्यू भेटतो. नाहीतर उद्या होर्डिंग्जसाठी कोणी गेले तर तुम्हाला साहेब कामाला लावेल. त्याच्यावर पी.आय.एल. दाखल आहेत. खर तर आपण करुच शकत नाही. कशाला चर्चा करतो. आम्ही काहीही देऊन द्यायचा तुम्हाला ठराव अंमलबलावणी करायची नाही करायची तुमचा अधिकार आहे ना साहेब. काय आहे साहेब, बहुमत असले तर आम्ही काहीही करु शकतो.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही तुमचा प्रस्ताव वाचा ना.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यात ठराव केला आणि आम्हाला वैती साहेबांनी शिकवले.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, महासभेमध्ये झालेला निर्णय तर तो गटनेत्यांच्या मिटींगमध्ये तो निर्णय फिरवू शकतात का? ते अधिकार गटनेत्यांच्या मिटींगला आहेत का? असे कुठे प्रोव्हिजन आहे का? महासभेमध्ये एखादा ठराव झाला तर गटनेत्यांची मिटींग बोलावून त्या मिटींगमध्ये त्या ठरावामध्ये बदल करता येतो का? गटनेत्यांची मिटींग बोलावून ह्या ठरावावर चर्चा काय झाली आणि निर्णय काय झाला?

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहेब, दि. ०५/०९/२०१८ रोजी हा सन्मा. महापौर मॅडमच्या मान्यतेने विषय आला. मिरा भाईंदर महानगरपालिका महाराष्ट्रातली अशी पहिली महानगरपालिका झाली ज्याच्यामध्ये बॅनरमुक्ती पासून त्या सभागृहात आपण पण होतात जेव्हा बॅनर काढायला घेतले. शहरामध्ये १४ ट्रक बॅनर निघाले तरी बॅनर संपले नव्हते आणि ज्यावेळेला नवरात्र महोत्सवाला त्यावेळी अनेक मंडळांचे अर्ज महापालिकेत आहेत. त्यांनी काय सांगितले निदान आमच्या मंडपाच्या दर्शनी भागात ते बॅनर असु देत. आम्ही त्यावेळी आपल्या सर्व वॉर्ड ऑफिसर आहेत. ह्या लोकांनी तिथे जाऊन एवढा हंगामा केला की, त्या नवरात्री मंडपाच्या आतमध्ये असलेले जे देणगीदार आहेत त्यांचे जे होर्डिंग्ज लागलेले होते. छोटे मोठे ते पण काढून टाकले. मी स्वतः दोंदे साहेबांना फोन केला. त्यांनी मला सांगितले तुमच्या ठरावाची अंमलबजावणी आम्ही करत आहोत आणि आपली गटनेत्यांची मिटींग ह्यासाठी बोलवलेली होती की, फक्त नवरात्री आहे म्हणून नाही ह्यानंतर येणाऱ्या प्रत्येक सणामध्ये हा विषय येणार. तेव्हा आपण काय चर्चा केली होती की, बाहेर दर्शनी भागात एक बॅनर राहणार आणि आतमध्ये जे बॅनर राहतील त्या विषयी चर्चा केली होती. त्याच्यावरती नाममात्र फी आकारावी अशी चर्चा केली होती. आजच्या ठरावात देखील असे विशेष काही नाही की ज्याच्यामध्ये आम्ही नविन काय करतो स्पष्ट उल्लेख केला की, रस्त्यावरती कमानी उभारता येणार नाही. हे हायकोर्टाचे डिसीजन आहेत आणि आपण जो ठराव केला त्या ठरावाची महत्वाची ओळ आहे. ह्या

महापालिकेच्या स्वतःच्या उत्पन्नाचा स्त्रोत व्हावा म्हणून जे आता सध्या बाहेर आपण दिलेल्या आहेत. त्या होर्डिंग्ज हे होर्डिंग्ज देखील महापालिका स्वतःच्या अधिकारात लावणार. हे ही ठरावात आहे. आणि ह्या ठरावात काही बदल केलेला नाही. तुम्हाला ह्या ठरावात काय बदल दिसत आहे.

**जुबेर इनामदार :-**

बराच बदल आहे.

**मा. उपमहापौर :-**

काय बदल आहे मला सांगा.

**अनिल सावंत :-**

साहेब तुम्ही विषयांतर करत आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मुख्य रस्त्यावर लाऊ नका. साईटमध्ये लावा ही कमानी कुठून आली. नविन टेंडरचे काही तरी निविदा प्रक्रिया...........

**मा. उपमहापौर :-**

नविन टेंडरची निविदा नाही. तुम्ही ऐकले नाही. त्याच्यात काय लिहिलेले आहे. जर असे अवैध होर्डिंग्ज कोणी लावत असेल तर ते एका तासात काढण्यासाठी ती माणसे नेमा असे त्यात लिहिलेले आहे. निविदा शब्दच नाही.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम एखाद्या शहरामध्ये आपण एक चांगला उपक्रम राबवत आहोत सन्मा. सदस्य जुबेरजी ऐका.

**मा. आयुक्त :-**

माझी सभागृहाला नम्र विनंती आहे आपण एक चांगला निर्णय घेतला. कार्यपालनामध्ये ५-१० टक्के काही चुका राहिल्या असतील ते मी मान्य करतो तर याला कोणी विषयांतर करु नये आणि त्याचा जो मुळ हेतु आहे तो कायम ठेवावा आणि गटनेत्यांच्या बैठकीत जे ठरले तेवढाच ह्या ठिकाणी ठराव करावा आणि याचे नियंत्रण करण्यासाठी जी आपली अपेक्षा आहे ती माझ्यावर सोडावे.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. वैती साहेबांनी सांगितले त्याला आमचे पूर्ण समर्थन आहे. महासभेमध्ये झालेल्या निर्णयावर गटनेता मिटींगमध्ये चर्चा होऊन निर्णय बदलु शकतो का?

**मा. आयुक्त :-**

निर्णय बदलले जात नाही. निर्णयाची अंमलबजावणी करताना जे लिमिटेशन येतात. उपमहापौर साहेब निर्णय कधी ही महासभेचे महासभेच्या मान्यतेने बदलले जातात किंवा राज्य शासनाकडून बदलले जातात. त्याची अंमलबजावणी करण्याचे जे आयुक्तांचे अधिकार आहेत त्यासाठी सुसुत्रता यावी. प्रशासन आणि लोकप्रतिनिधीमध्ये एकमत रहावे. म्हणून ही गटनेत्यांची बैठक पदाधिका-यांची बैठक घेऊन अंमलबजावणी बाबत काम केले जाते. निर्णय बदलले जात नाही.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये निर्णय बदलला ना त्या ठरावाच्या अनुषंगाने ह्या एक महिन्यामध्ये किती जणांवर कायदेशीर कारवाई केली.

**मा. आयुक्त :-**

आपण चांगला निर्णय घेतला त्याला तुम्ही लगेच..................

**अनिल सावंत :-**

सर्वांनी समर्थन दिले ना. साहेब काय झाले शहरामध्ये छोटे छोटे मंडप मी पूर्ण शहरभर फिरलो. छोटे-छोटे मंडप, छोटे बॅनर लावू शकले नाहीत आणि मॅक्सेस मॉलच्या बाजूला पूर्ण नवरात्री मोठा बॅनर लावला होता. त्याच्यावर कारवाई नाही आणि छोट्या मंडळाला बॅनर लावू दिले नाही.

(सभागृहात गोंधळ)

**राजीव मेहरा :-**

प्रायव्हेट प्रॉपर्टी में मैंने बॅनर लगाने के लिए पेमेंट करने के लिए भी तयार था। मुझे परमिशन नही दि गयी।

**जुबेर इनामदार :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बोर्ड/ बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण थांबविणेसाठी मा.महासभा दि.०५/०९/२०१८ ठराव क्र .७२ अन्वये अधिकृत होर्डिंग्ज , कॅन्टीलीवर, कमानी व्यतिरीक्त जाहिरात करण्यास मनाई करण्यांत आलेली आहे.

तथापी शहरातील सार्वजनिक जागेवर सर्वधर्मीयांमार्फत साजरे करण्यात येणारे सण / उत्सवा निमित्त परवानगी घेऊन बांधण्यात येणाऱ्या मंडपाच्या शेजारी जाहिरातीचे फलक, बॅनर्ससाठी परवानगीची मागणी करण्यात येत आहे.

याअनुषंगाने मा .आयुक्त सो . यांचेकडे दि .०८/१०/२०१८ अन्वये टिपणी सादर करण्यांत आलेली आहे . सदर टिपणीस मान्यता देऊन मा .आयुक्त सो . यांनी मा .महापौर महोदया यांचे अध्यक्षतेखाली मा .पदाधिकारी व गटनेते यांची बैठक बोलविण्याकामी सुचविले होते . याअनुषागाने आज दि. ११/१०/२०१८ रोजी ठिक १२.०० वा. महानगरपालिकेच्या लाल बहादुर शास्त्री सभागृहात, (स्थायी समिती ) मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षेतेखाली बैठक बोलविण्यांत आली होती. सदर बैठकीत महानगरपालिकेचे सर्व प्रभाग अधिकारी, विभागप्रमुख अतिक्रमण विभाग तसेच सर्व राजकिय पक्षाचे गटनेते उपस्थित होते.

सदर बैठकीत विषयांकीत प्रकरणी साधक बोधक चर्चा होवून महानगरपालिका क्षेत्रात साजरा होणाऱ्या सर्वधर्मिय उत्सवासाठी, प्रदर्शने इ. सामाजिक व शैक्षणीक कार्यक्रम व उपक्रमांसाठी मंडपाला लागुन रस्त्यावरुन दिसणाऱ्या दर्शनी भागापूरतीच संबंधित मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण ) नियम २००३ च्या अधिन राहून एका बॅनर /कटआउट साठी मा .स्थायी समिती सभा दि .२९/०२/२००८ ठराव क्र .४३ अन्वये व मा .महासभा दि .१९/०३/२००८ ठराव क्र .३५ अन्वये निश्चित केलेल्या दराप्रमाणे जाहिरात फी वसुल करुन परवानगी देण्यांत यावी असे मा .महापौर यांनी घेतलेल्या बैठकीत निश्चित करण्यांत आले. सदर सुचनेनुसार मा.महासभा दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातच्या धोरणामध्ये फेरबदल करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सदर तरतुदीच्या अधिन राहून मा .महासभा दि ०५/०९/२०१८ ठराव क्र . ७२ मध्ये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातीच्या धोरणामध्ये उपरोक्त किरकोळ फेरबदल करण्यासाठी तसेच उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८६ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी, अनुमोदन श्री. मनोज दुबे. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. श्री. जुबेर इनामदार ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. प्रशांत दळवी ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेला ठरावाच्या बाजूने ४२, विरोधात २६, तटस्थ १ इतकी मते पडलेली आहेत. श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेला ठराव बहुमतांने मंजुर करण्यात येत आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने मी निवेदन करतो. माझी सभागृहाला अजूनही विनंती राहील आपण एक चांगल्या मोमेन्टवर आलेले आहोत. ह्या विषयात आपण ह्याच्यात माघार घेणार नाही. कृपा करुन सर्वांना अपेक्षा आहे की, कारवाई व्हायला पाहिजे. निश्चितच उद्यापासून ज्याचे ही अनधिकृत बॅनर असतील त्याच्यावर पोलिस केस होईल. ते बॅनर काढून त्याचा खर्च वसूल केला जाईल. ह्या ठरावामध्ये जे नियमाने मला शक्य आहे ते केले जाईल. जे नियमाच्या जास्तीचा असेल ते शासनाकडे विखंडनासाठी पाठवले जाईल.

**प्रकरण क्र. ८६ :-**

**महापालिका क्षेत्रात साजरे करण्यात येणारे सण /उत्सवाकरिता बांधण्यात येणाऱ्या मंडपाजवळ जाहिरात फलक, बॅनर्स यांना परवानगी देणेबाबत.**

**ठराव क्र. ८७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बोर्ड/ बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण थांबविणेसाठी मा.महासभा दि.०५/०९/२०१८ ठराव क्र .७२ अन्वये अधिकृत होर्डिंग्ज , कॅन्टीलीवर, कमानी व्यतिरीक्त जाहिरात करण्यास मनाई करण्यांत आलेली आहे.

तथापी शहरातील सार्वजनिक जागेवर सर्वधर्मीयांमार्फत साजरे करण्यात येणारे सण / उत्सवा निमित्त परवानगी घेऊन बांधण्यात येणाऱ्या मंडपाच्या शेजारी जाहिरातीचे फलक, बॅनर्ससाठी परवानगीची मागणी करण्यात येत आहे.

याअनुषंगाने मा .आयुक्त सो . यांचेकडे दि .०८/१०/२०१८ अन्वये टिपणी सादर करण्यांत आलेली आहे . सदर टिपणीस मान्यता देऊन मा .आयुक्त सो . यांनी मा .महापौर महोदया यांचे अध्यक्षतेखाली मा .पदाधिकारी व गटनेते यांची बैठक बोलविण्याकामी सुचविले होते . याअनुषागाने आज दि . ११/१०/२०१८ रोजी ठिक १२.०० वा. महानगरपालिकेच्या लाल बहादुर शास्त्री सभागृहात, (स्थायी समिती ) मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षेतेखाली बैठक बोलविण्यांत आली होती. सदर बैठकीत महानगरपालिकेचे सर्व प्रभाग अधिकारी, विभागप्रमुख अतिक्रमण विभाग तसेच सर्व राजकिय पक्षाचे गटनेते उपस्थित होते.

सदर बैठकीत विषयांकीत प्रकरणी साधक बोधक चर्चा होवून महानगरपालिका क्षेत्रात साजरा होणाऱ्या सर्वधर्मिय उत्सवासाठी, प्रदर्शने इ. सामाजिक व शैक्षणीक कार्यक्रम व उपक्रमांसाठी मंडपा ला लागुन रस्त्यावरुन दिसणाऱ्या दर्शनी भागापूरतीच संबंधित मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण ) नियम २००३ च्या अधिन राहून एका बॅनर /कटआउट साठी मा .स्थायी समिती सभा दि .२९/०२/२००८ ठराव क्र .४३ अन्वये व मा .महासभा दि .१९/०३/२००८ ठराव क्र .३५ अन्वये निश्चित केलेल्या दराप्रमाणे जाहिरात फी वसुल करुन परवानगी देण्यांत यावी असे मा .महापौर यांनी घेतलेल्या बैठकीत निश्चित करण्यांत आले. सदर सुचनेनुसार मा.महासभा दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातच्या धोरणामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसुची 'ड' प्रकरण क्र.२ मधील नियम 'र' नुसार पारीत केलेल्या ठरावात फेरबदल करता येण्याची तरतुद आहे.

सदर तरतुदीच्या अधिन राहून मा .महासभा दि ०५/०९/२०१८ ठराव क्र . ७२ मध्ये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातीच्या धोरणामध्ये फेरबदल करण्यासाठी शिफारस आहे.

**ठराव क्र.:-**

शहरात महापालिकेचे जाहिराती बाबतचे दर यापूर्वीच निश्चित केलेले आहेत . त्या नियमानूसार यापूढे खालीलप्रमाणे जाहिराती लावणेकरीता परवानगी देण्यात यावी.

१) मिरा भाईंदर शहरात होणाऱ्या सार्वजनिक जागेवर धार्मिक , सांस्कृतिक, सामाजिक व क्रिडा विषयक कार्यक्रम महापालिकेने तात्पुरत्या स्वरुपात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

२) सदर कार्यक्रमाच्या निश्चित केलेल्या एक दिवस अगोदर , कार्यक्रमादिवशी व कार्यक्रमाच्या एक दिवसानंतर जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

३) कार्यक्रमाच्या प्रवेशद्वाराजवळ एकच बॅनर किंवा एकच कमान लावण्यास परवानगी देण्यात यावी.

४) सदर जाहिरातीवर महापालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणे आकारणी करण्यात यावी.

५) तसेच आरक्षित जागेवर कार्यक्रमास परवानगी दिल्यास त्यांचे कडून फक्त दर्शनी भागात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी व त्यांचेकडून निश्चित केलेल्या दराप्रमाणे फी भरण्यात यावी . तसेच कार्यक्रमाच्या आतील भागात जाहिरात केल्यास त्याच्यावर जाहिरात कर लावण्यात येवू नये.

६) एखादा सार्वजनिक हिताचा खाजगी कार्यक्रम हाती घेतल्या स त्याला वरील अटीशर्तीवर परवानगी देण्यात यावी . तसेच सदर कार्यक्रमाचा दिशादर्शक व अतिमहत्वाचे व्यक्ती येणार असल्यास विशेष बाब म्हणून मा . आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात सदर कार्यक्रमाला परवानगी देण्यात यावी.

७) कार्यक्रमाचे विनापरवानगी जाहिरात केल्यास प्रती बॅनर वर रु.१०,०००/- दंडाची आकारणी करण्यात यावी तसेच सदर व्यक्तीने, संस्थेने दुसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्यावर देखील दंडाची कारवाई त्याच दराने करण्यात यावी व तिसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्याचे विरुध्द दंड व कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा.

८) शहरात सार्वजनिक जागा, भिंती यावर स्टिकर लावणे, रंगकाम करणे यावर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच सार्वजनिक भिंती रंगविणे, स्टीकर लावणे याकरीता परवानगी देण्यात येवू नये.

९) खाजगी वाहने, रीक्षा या माध्यमातून जाहिरात होत असतील तर त्यावर मंजुर दरा प्रमाणे जाहिरात कर आकारणी करून फी वसुल करणे बंधनकारक राहिल.

१०) शाळा, कॉलेज, कंपनीची खाजगी वाहने यांना जाहिराती मधून वगळण्यात येत आहे.

११) खाजगी जागेत होर्डींग्ज , बॅनर, फलक लावले असतील त्यांना हे नियम लागू होणार नाहीत . मात्र रस्त्याच्या बाजूला दर्शनी भागात जाहिरात केल्यास त्याला जाहिरात फी लागू होईल.

१२) खाजगी संकुलने , खाजगी जागा यामधील जाहिरातींना कोणतीही परवानगी घेण्याची आवश्यकता नाही मात्र रोडच्या दर्शनी बाजूला जाहिरात केल्यास त्यांना जाहिरात फी लागू होईल.

१३) जी खाजगी आरक्षणे , आरक्षित उद्याने महापालिकेच्या ताब्यात अस तील व त्यांच्या सोयी सुविधा महापालिका पुरवित असेल व ती खाजगी संकुले असतील तरी त्यांना जाहिरात दर लागु होणार.

१४) कार्यक्रमाच्या मुख्य प्रवेशद्वारावर रस्ता सोडून कार्यक्रमाच्या प्रवेशद्वारावर नियमानूसार कमानीची परवानगी देण्यात यावी.

१५) वरील जाहिरातीचे धोरण प्रामा णिक व कडक अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकेस मनुष्य बळ कमी पडणार आहे. त्यासाठी मा. आयुक्त यांनी साधन सामुग्री मनुष्यबळासह निविदा काढावी तसेच मा. आयुक्त यांनी दंडात्मक रक्कम वसुल झालेल्या रक्कमेतून ठेकेदारास ५० टक्के रक्कम प्रोत्साहनार्थ (इंन्सेटीव्ह) देण्यात येईल अशा प्रकारे ३ वर्षाकरीता निविदा काढण्यात यावी.

१६) नागरीकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारी ठेकेदारास प्राप्त झाल्यावर त्यांनी त्यांचेवर कारवाई न केल्यास त्यांचेवर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

१७) वरील सर्व अटीशर्तीचे कठोरपणे कारवाई करावी.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्री. मनोज रामनारायण दुबे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | १.जैन गीता भरत |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | सोंस निला बर्नाड | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | कदम अर्चना अरुण | |
| १४ | मोकाशी दिपाली आनंदराव | १४ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | अरोरा दीपिका पंकज | १६ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १७ | नाईक विविता विवेक | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | भावसार वंदना संजय | १८ | शेख रुबीना फिरोझ | |
| १९ | बेलानी हेमा राजेश | १९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | २० | परदेशी गिता हरीश | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | सोनार सुरेखा प्रकाश | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २२ | पाटील वंदना विकास | |
| २३ | शाह राकेश रतिशचंद्र | २३ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २४ | शेट्टी अरविंद आनंद | २४ | अहमद साराह अकरम | |
| २५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २५ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २६ | तिवारी अशोक सूर्यदेव | २६ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २७ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २८ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २९ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३० | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३१ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३४ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३५ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३६ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३७ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३८ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४१ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४२ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४३ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ४४ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४५ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४६ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८७, **मोर्वा येथे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राकरिता जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

जयेश भोईर :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोर्वा येथे नविन शाळा इमारत बांधलेली आहे . सदर शाळेत जागा रिकामी असुन सदर ठिकाणी जेष्ठ नागरीकांच्या विरंगुळा केंद्रासाठी जागा मागणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार मोर्वा शाळा इमारतीत जेष्ठ नागरीकांना विरंगुळा केंद्रासाठी जागा व त्यासाठी लागणारे वस्तु व साहित्य उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर विरंगुळा केंद्राची जागा संचलन व देखभालीसाठी मोर्वा गाव वरिष्ठ नागरीक संघटना यांनी मागणी केली असून त्यानुसार सदर जागे चा ताबा संचलन व देखभालीसाठी मोर्वा गाव वरिष्ठ नागरीक संघटना यांना देण्यात यावा.**

**तसेच पुढील सर्व प्रशासकीय कामकाज व आवश्यक निर्णय घेण्याचे अधिकार मा . आयुक्त यांना देण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.**

नयना म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८७ :-**

**मोर्वा येथे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राकरिता जागा उपलब्ध करुन देणेबाबत**

ठराव क्र. ८८ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोर्वा येथे नविन शाळा इमारत बांधलेली आहे . सदर शाळेत जागा रिकामी असुन सदर ठिकाणी जेष्ठ नागरीकांच्या विरंगुळा केंद्रासाठी जागा मागणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार मोर्वा शाळा इमारतीत जेष्ठ नागरीकांना विरंगुळा केंद्रासाठी जागा व त्यासाठी लागणारे वस्तु व साहित्य उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर विरंगुळा केंद्राची जागा संचलन व देखभालीसाठी मोर्वा गाव वरिष्ठ नागरीक संघटना यांनी मागणी केली असून त्यानुसार सदर जागेचा ताबा संचलन व देखभालीसाठी मोर्वा गाव वरिष्ठ नागरीक संघटना यांना देण्यात यावा**

**तसेच पुढील सर्व प्रशासकीय कामकाज व आवश्यक निर्णय घेण्याचे अधि कार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. जयेश भोईर अनुमोदक :- सौ. नयना म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८८, **ज्येष्ठ नागरीक धोरण मंजुर करणेबाबत**

गणेश भोईर :-

1) **विरंगुळा केंद्र :-**

**विरंगुळा केंद्र म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या व 60 वर्षावरील वयोगटातील नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातुन त्यांचे सामाजिक , सांस्कृतिक, आरोग्य विषयक हित जपले जावे यासाठी व दिवसाच्या ठराविक कालावधीसाठी वापरात आणण्यासाठी महानगरपालिका किंवा स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने निर्माण करण्यात आलेले केंद्र.**

2) **विरंगुळा केंद्राचे बांधकाम :-**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसा र विशेषत: "बगीचा" किंवा "करमणूकीची मैदाने " " आर.जी" यासाठी आरक्षित असलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेवर एकुण भुखंड क्षेत्राच्या तुलनेत 10% पेक्षा अधिक असणार नाही तथापि किमान 500 चौ.फुट बांधकाम उपलब्ध् होऊ शकेल अशा ठिकाणी विरंगुळा केंद्राचे बांधकाम करता येईल.**
- **सर्वसाधारणपणे दोन विरंगुळा केंद्रात किमान 2 किमी अंतर असावे.**

3) **विरंगुळा केंद्रात उपलब्ध करण्यात येणाऱ्या सोयी :-**

- **विरंगुळा केंद्रामध्ये खालील गोष्टी उपलब्ध करुन देण्यात येईल**

| अ.क्र. | तपशिल | साहित्य (नग) |
|---|---|---|
| 1 | बुध्दीबळ | 02 |
| 2 | कॅरम | 02 |
| 3 | दुरदर्शन संच | 01 |
| 4 | सेमी एक्झिक्युटीव्ह खुर्ची | 01 |
| 5 | वृत्तपत्रे | 03 |
| 6 | कपाट (मोठे) | 01 |

| | | |
|---|---|---|
| 7 | टेबल | 01 |
| 8 | प्लास्टिक खुर्ची | 50 |
| 9 | वजन मोजणी यंत्र | 01 |
| 10 | वाफ घेण्याचे इलेक्ट्रीक भांडे | 01 |
| 11 | शेकण्याची इलेक्ट्रीक बॅग | 01 |
| 12 | सिलिंग फॅन | 04 |
| 13 | प्रथमोपचार पेटी | 01 |
| 14 | कचरा कुंडी | 02 |
| 15 | कॉम्प्युटर | 01 |
| 16 | प्रिंटर व स्कॅनर | 01 |
| 17 | कॉम्पयुटर टेबल | 01 |
| 18 | स्टॅण्ड फॅन | 04 |
| 19 | लाईटचे फोकस | 06 |
| 20 | दिवाळी अंक | कोणतेही 04 |
| 21 | लायब्ररीसाठी पुस्तके | उपलब्धतेनुसार |
| 22 | वॉटर फिल्टर् | 01 |
| 23 | भजनासाठी वादवृंदासाठी हार्मोनियम, पखवाज, तबला-डगा | प्रत्येकी एक |
| 24 | शिसाचे टाळ | 10 नग |
| 25 | सांऊड सिस्टिम Mixer 12 Channel, Ahuja 500W, Amplifier | प्रत्येकी 1 नग |
| 26 | Ahuja speaker | 04 नग |
| 27 | योगा मॅटस | 100 नग |

- उदयानातील पाणी व विदयुत जोडणीमधुन विरंगुळा केंद्राकरीता पाणी जोडणी व विदयुत जोडणी देता येईल.
- सदर विरंगुळा केंद्र सुरु ठेवण्याची वेळ सकाळी 07.00ते 10.00 व संध्याकाळी 05.00 ते रात्री 09.00 वाजेपर्यंत असेल अपावादात्मक् परिस्थितीत वेळेत फेरबदल करण्याचा अधिकार संबंधित संस्थेस राहील.

4) विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी वितरीत करण्याची कार्यपध्दती :-

- महाराष्ट्र महानगरपालिका अधि नियम 1949 चे कलम 79 (क) व (इ) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने विकसित केलेली विरंगुळा केंद्रे नोंदणीकृत ज्येष्ठ नागरीकांच्या स्थानिक संस्थाना जास्तीत जास्त् तीन वर्षाच्या कालावधीकरीता देता येतील.
- सदर विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी देताना विरंगुळा क्षेत्रा च्या 500 मीटर परीघात वास्तव्यात असणाऱ्या ज्येष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थाना प्राधान्य देण्यात येईल
- सदरची कार्यवाही महानगरपालिकेच्या धोरणानुसार अर्ज मागवून करण्यात येईल.
- सदर विरंगुळा केंद्र वितरीत करण्याबाबत आयुक्तांचा अधिकार अंतिम असेल.

5) विरंगुळा केंद्राच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक अटी व शर्ती :-

सदर विरंगुळा केंद्र व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती प्रस्तावित करण्यात येत असुन त्याबाबत संबंधित संस्थाना रु.100 च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक असेल.

- विरंगुळा केंद्राचा व्यवस्थापन कालाव धी सदर केंद्र वितरीत केल्याच्या दिनांकापासून तीन वर्ष असेल.

- विरंगुळा केंद्र व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेस सदर केंद्र इतर व्यक्ती /संस्था/आस्थापना इत्यांदीनी हस्तांतरीत करता येणार नाही.
- विरंगुळा केंद्र हे केवळ ज्येष्ठ् नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातुन त्यां चे सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य् विषयक हित साधले जातील यासाठीच वापरणे अपेक्षित आहे . याव्यतीरीक्त इतर प्रयोजनासाठी त्याचा वापर करावयाचा झाल्यास त्याबाबत आयुक्त यांची लेखी पुर्वपरवानगी घेणे आवश्यक् राहील.
- सदर विरंगुळा केंद्रात परिसरातील ज्येष्ठ नागरीकांना को णताही भेदभाव न करता प्राधान्याने प्रवेश असेल व सदर प्रवेश नि:शुल्क् असेल.
- विरंगुळा केंद्र इमारतीच्या संरचनेत (Structuer) महानगरपालिकेच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही . जर संरचनेत काही बदल करण्यात आल्यास सदर विरंगुळा केंद्राच्या व्यवस्थापन करारपत्र रद्द करुन ते महानगरपालिका ताब्यात घेईल व इमारतीचे/केंद्राचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधीत व्यवस्थापन संस्थेकडुन करुन घेण्यात येईल.
- विरंगुळा केंद्राची देखभाल, देखरेख व संरक्षण खर्च व्यवस्थापन संस्थेने करणे आवश्यक् असेल.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे विरंगुळा केंद्रात पुरविण्यात आलेले साहित्य् व फर्निचर यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी व्यवस्थापन संस्थेची राहील.
- विरंगुळा केद्राकरीता संस्थेस महानगरपालिकेकडुन कोणतेही अनुदान , कर्मचारी इत्यांदी उपलब्ध् करुन दिले जाणार ना हीत. सदर बाबी संस्थेने स्वखर्चाने उपलब्ध् करावयाच्या आहेत.
- व्यवस्थापन संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेमध्ये सामावुन घेतले जाणार नाही व तसा कोणताही हक्क् सदर कर्मचाऱ्यांना असणार नाही . सदर कर्मचाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील . त्यातुन कोणतेही कायदेशीर , आर्थिक इत्यादी वाद निर्माण झाल्यास त्या संस्था स्वखर्चाने स्वत:च्या जबाबदारीवर दूर करेल. महानगरपालिकेला अशा वादाची झळ लागू देणार नाही.
  - विरंगुळा केंद्र इमारतीची महानगरपालिकेस गरज भासल्यास संबंधित संस्थेस सदरचे केंद्राची इमारत महानगरपालिकेस तात्काळ उपलब्ध करुन दयावी लागेल.
  - दिलेल्या इमारतीच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ व सुशोभित ठेवावा लागेल.
  - महानगरपालिकेसोबत संबंधित संस्थेने केलेल्या या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यास महानगरपालिका करारनाम्याची मुदत पुर्ण होण्यापुर्वी अथवा महानगरपालिकेस वाटेल त्यावेळी कोणतेही कारण न देता केव्हाही विरंगुळा केंद्राचा ताबा काढुन घेता येईल.
  - कोणत्याही कारणास्तव सदर केंद्राचे व्यवस्थापक सोडावयाचे झाल्यास त्याबाबत 30 दिवस अगोदर महानगरपालिकेस लेखी कळवुन जागा सुस्थितीत ताब्यात देणे आवश्यक् असेल.
  - विरंगुळा केंद्राची संपुर्ण मालकी महानगरपालिकेची राहील या मालमत्तेवर महापालिका व्यतीरिक्त इतर कोणाचाही अधिकार राहणार नाही.
  - सदर विरंगुळा केंद्रात व्यवस्थापन संस्थाव्दोर कोणत्याही कार्यक्रमाकरीता शुल्क् प्रवेश फी इत्यादी जमा करीत असल्यास त्या कार्यक्रमासाठी महानगरपालिकेमार्फ त फी/शुल्क्/भाडे आकरण्यात येईल व त्यासाठी संबंधित उप -आयुक्त (मुख्यालय) यांची लेखी परवानगी आवश्यक असेल.
  - सदर विरंगुळा केंद्रात मनोरंजनासाठी तसेच आरोग्य् विषयक कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.

- **विरंगुळा केंद्राच्या बाबतीत कोणताही वाद झाल्यास आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.**

**ज्येष्ठ नागरीकांसाठी काही नविन योजना राबवावयाच्या आहेत. सदर योजना खालीलप्रमाणे :-**

1. **ज्येष्ठ नागरीकांसाठी साहित्य् पुरवठा करणे.**
   **1) काठी, 2) वॉकर, 3) कमरेचा पट्टा, 4) मानेचा पट्टा,**
2. **ज्येष्ठ नागरीकांसाठी मनोरंजन कार्यक्रम आयोजित करणे.**
3. **ज्येष्ठ नागरीक दिन साजरा करणे.**
4. **ज्येष्ठ नागरीकांसाठी बैठे खेळाच्या स्पर्धांचे आयोजन करणे उदा . कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला, हस्तकला व इतर वेळोवळी ठरविण्यांत आलेल्या स्पर्धा**
5. **ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्राकरीता किरकोळ खर्चासाठी दरमहा रु.2000/- आर्थिक मदत करणे.**
6. **ज्येष्ठ् नागरीक महिलांसाठी हळदीकुंकू व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे**
7. **ज्येष्ठ नागरीकांकरीता सहलीचे आयोजन करणे.**

**ठराव क्र. :-**

**प्रस्तावित गोषवाऱ्यातील नविन योजना क्र.5 मध्ये ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्राकरीता किरकोळ खर्चासाठी दरमहा रु.10,000/- आर्थिक मदत करण्यात यावी तसेच ज्येष्ठ नागरीक संघटनेच्या सर्व सदस्यांची नोंदणी क्रमांकासह त्यांचे निवासी पत्त्यांची माहिती महापालिकेने मागवून घ्यावी . यासह वरील प्रस्तावानुसार ठराव मंजुर करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, ह्याच्यामध्ये ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राच्या बाबतीत धोरण ठरवायचे. ठरावामध्ये मासिक १० हजार आणि कुठची फॅसिलिटी दिली आहे? काय सांगितले आहे?

**मा. महापौर :-**

ती सर्व फॅसिलिटी ठरावामध्ये दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

फक्त तेवढेच द्यायचे आहे की आणखी काही द्यायचे आहे.

**मा. महापौर :-**

नाही.

**अनिल सावंत :-**

ह्या शहरामध्ये तीन ज्येष्ठ नागरिक संघटना आहेत. विरंगुळा केंद्र रामनगरला एक आहे आणि मला वाटते भाईंदर, नवघरला एक आहे आणि भाईंदर वेस्टला साधारण मिरारोडला जे आहे ते ४०० ते ५०० सदस्य आहेत. ज्या ज्येष्ठ नागरिक संघटनेचे, महापालिकेमध्ये ते नोंदणी करतील पण ही जी १० हजार जी अमाऊंट आहे ती कमी आहे की, माझी अशी सुचना आहे की त्याला २५ हजार करावे.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम, माझी एक विनंती होती आमचे जे भाईंदर पूर्वचे जे ज्येष्ठ नागरिक केंद्र आहे. त्याच्यामध्ये जवळ जवळ ७०० ते ८०० सदस्य आहेत. ठीक आहे पण सध्याची जी जागा आहे ती त्यांना फार अपुरी पडते. ते तिथेच महापालिकेच्या शाळेमध्ये एका जागेमध्ये बसतात. ७०० ते ८०० सदस्य एका खोलीमध्ये बसतात. तर ती त्यांना वाढवून मिळेल तर बर पडेल.

**मा. महापौर :-**

उनको ऑलरेडी बोला है की, उनके उपर जो जगह है फस्ट फ्लोअर पे दि जाएगी।

**प्रविण पाटील :-**

पहिल्या माळ्यावर देण्यापेक्षा ज्येष्ठ नागरिक आहेत तर ग्राऊंडलाच दिले तर बरं पडेल.

**मा. महापौर :-**

ठीक है। मा. आयुक्त साहेब तशी जागा असणार तर आपण देऊ.

**अनिल सावंत :-**

आणि त्यानंतर ज्येष्ठ नागरिक दिन आपण साजरा केला. दरवर्षी साजरा करतो. महानगरपालिका ह्या वर्षी साजरा केला, ज्या सभागृहामध्ये ज्येष्ठ नागरिक दिन साजरा केला त्या सभागृहामध्ये पंखे नाहीत. ४ तास ते ज्येष्ठ नागरिक तिष्ठत राहावं लागलं. त्यांना सफोकेशन झालं. काही लोक आजारी पडले. ते चार तास त्यांना सहन करावे लागले. काही पेपरमध्ये सुध्दा ती बातमी आली. ह्यापुढे जरा काळजी घ्यावी की ज्येष्ठ नागरिक दिन कशाप्रकारे साजरा करावा. त्यांची सुध्दा सुचना घ्यावी.

**मा. महापौर :-**

नक्कीच घेऊ.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, नवघर रोडला ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र आहे. त्याच्यामध्ये अनेक अडचणी आहेत. त्यांना व्यवस्थित पाणी नाही. त्यांना बसायची सोय नाही. याच्या व्यतिरिक्त महापौर मॅडम, एक दुसरी सुचना करतो. आमच्याकडे नवघर रोडला दोन गार्डन आहेत. आज योगा महिला सकाळी ६ वाजल्यापासून २०० महिला योगा करतात. त्यांना चार ठिकाणी आम्ही जागा बदली करुन मिळाली. मी बांधकाम डिपार्टमेंटला कळवले त्या महिलांना एखादी जागा योगासाठी ३ तास त्यांना जागेचे आपण प्रोव्हिजन करा. असे मी ह्या ठरावमध्ये नमूद केले तर अजुन चांगले होईल.

**मा. महापौर :-**

मला भेटायला सांगा मी त्यांना बोलते.

**दिनेश नलावडे :-**

ठीक आहे.

**प्रकरण क्र. ८८ :-**

**ज्येष्ठ नागरीक धोरण मंजुर करणेबाबत**

**ठराव क्र. ८९ :-**

1) **विरंगुळा केंद्र :-**

**विरंगुळा कें द्र म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या व 60 वर्षावरील वयोगटातील नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातुन त्यांचे सामाजिक , सांस्कृतिक, आरोग्य विषयक हित जपले जावे यासाठी व दिवसाच्या ठराविक कालावधीसाठी वापरात आणण्यासाठी महानगरपालिका किंवा स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने निर्माण करण्यात आलेले केंद्र.**

2) **विरंगुळा केंद्राचे बांधकाम :-**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार विशेषत : “बगीचा” किंवा “करमणूकीची मैदाने ” “ आर.जी” यासाठी आरक्षित असलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेवर एकुण भुखंड क्षेत्राच्या तुलनेत 10% पेक्षा अधिक असणार नाही तथापि किमान 500 चौ.फुट बांधकाम उपलब्ध् होऊ शकेल अशा ठिकाणी विरंगुळा केंद्राचे बांधकाम करता येईल.**
- **सर्वसाधारणपणे दोन विरंगुळा केंद्रात किमान 2 किमी अंतर असावे.**

3) **विरंगुळा केंद्रात उपलब्ध करण्यात येणाऱ्या सोयी :-**

- **विरंगुळा केंद्रामध्ये खालील गोष्टी उपलब्ध करुन देण्यात येईल.**

| अ.क्र. | तपशिल | साहित्य (नग) |
|---|---|---|
| 1 | बुध्दीबळ | 02 |
| 2 | कॅरम | 02 |
| 3 | दुरदर्शन संच | 01 |
| 4 | सेमी एक्झिक्युटीव्ह खुर्ची | 01 |
| 5 | वृत्तपत्रे | 03 |
| 6 | कपाट (मोठे) | 01 |
| 7 | टेबल | 01 |

| | | |
|---|---|---|
| 8 | प्लास्टिक खुर्ची | 50 |
| 9 | वजन मोजणी यंत्र | 01 |
| 10 | वाफ घेण्याचे इलेक्ट्रीक भांडे | 01 |
| 11 | शेकण्याची इलेक्ट्रीक बँग | 01 |
| 12 | सिलिंग फॅन | 04 |
| 13 | प्रथमोपचार पेटी | 01 |
| 14 | कचरा कुंडी | 02 |
| 15 | कॉम्प्युटर | 01 |
| 16 | प्रिंटर व स्कॅनर | 01 |
| 17 | कॉम्पयुटर टेबल | 01 |
| 18 | स्टॅण्ड फॅन | 04 |
| 19 | लाईटचे फोकस | 06 |
| 20 | दिवाळी अंक | कोणतेही 04 |
| 21 | लायब्ररीसाठी पुस्तके | उपलब्धतेनुसार |
| 22 | वॉटर फिल्टर् | 01 |
| 23 | भजनासाठी वादवृंदासाठी हार्मोनियम, पखवाज, तबला-डगा | प्रत्येकी एक |
| 24 | शिसाचे टाळ | 10 नग |
| 25 | सांऊड सिस्टिम Mixer 12 Channel, Ahuja 500W, Amplifier | प्रत्येकी 1 नग |
| 26 | Ahuja speaker | 04 नग |
| 27 | योगा मॅटस | 100 नग |

- उदयानातील पाणी व विदयुत जोडणीमधुन विरंगुळा केंद्राकरीता पाणी जोडणी व विदयुत जोडणी देता येईल.
- सदर विरंगुळा केंद्र सुरु ठेवण्याची वेळ सकाळी 07.00ते 10.00 व संध्याकाळी 05.00 ते रात्री 09.00 वाजेपर्यंत असेल अपा वादात्मक् परिस्थितीत वेळेत फेरबदल करण्याचा अधिकार संबंधित संस्थेस राहील.

4) विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी वितरीत करण्याची कार्यपध्दती :-

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) व (इ) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने विकसित केलेली विरंगुळा केंद्रे नोंदणीकृत ज्येष्ठ नागरीकांच्या स्थानिक संस्थाना जास्तीत जास्त् तीन वर्षाच्या कालावधीकरीता देता येतील.
- सदर विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी देताना विरंगुळा क्षेत्राच्या 500 मीटर परीघात वास्तव्यात असणाऱ्या ज्येष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.
- सदरची कार्यवाही महानगरपालिकेच्या धोरणानुसार अर्ज मागवून करण्यात येईल.
- सदर विरंगुळा केंद्र वितरीत करण्याबाबत आयुक्तांचा अधिकार अंतिम असेल.

5) विरंगुळा केंद्राच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक अटी व शर्ती :-

सदर विरंगुळा केंद्र व्यवस्थापनासाठी खालीलप्रमा णे अटी व शर्ती प्रस्तावित करण्यात येत असुन त्याबाबत संबंधित संस्थाना रु.100 च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक असेल.

- विरंगुळा केंद्राचा व्यवस्थापन कालावधी सदर केंद्र वितरीत केल्याच्या दिनांकापासून तीन वर्ष असेल.

- विरंगुळा केंद्र व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेस सदर केंद्र इतर व्यक्ती /संस्था/आस्थापना इत्यांदीनी हस्तांतरीत करता येणार नाही.
- विरंगुळा केंद्र हे केवळ ज्येष्ठ् नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातुन त्यांचे सामाजिक , सांस्कृतिक, आरोग्य् विषयक हित साधले जातील यासाठीच वापरणे अपेक्षित आहे . याव्यतीरीक्त इतर प्रयोजनासाठी त्याचा वापर करावयाचा झाल्यास त्याबाबत आयुक्त यांची लेखी पुर्वपरवानगी घेणे आवश्यक् राहील.
- सदर विरंगुळा केंद्रात परिसरातील ज्येष्ठ नागरीकांना कोणताही भेदभाव न करता प्राधान्याने प्रवेश असेल व सदर प्रवेश नि:शुल्क् असेल.
- विरंगुळा केंद्र इमारतीच्या संरचनेत (Structuer) महानगरपालिकेच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही . जर संरचनेत काही बदल करण्यात आल्यास सदर विरंगुळा केंद्राच्या व्यवस्थापन करारपत्र रद्द करुन ते महानगरपालिका ताब्यात घेईल व इमारतीचे/केंद्राचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधीत व्यवस्थापन संस्थेकडुन करुन घेण्यात येईल.
- विरंगुळा केंद्राची देखभाल , देखरेख व संरक्षण खर्च व्यवस्थापन संस्थेने करणे आवश्यक् असेल.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे विरंगुळा केंद्रात पुरविण्यात आलेले साहित्य् व फर्निचर यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी व्यवस्थापन संस्थेची राहील.
- विरंगुळा केद्राकरीता संस्थेस महानगरपालिकेकडुन कोणतेही अनुदान , कर्मचारी इत्यांदी उपलब्ध् करुन दिले जाणार नाहीत . सदर बाबी संस्थेने स्वखर्चाने उपलब्ध् करावयाच्या आहेत.
- व्यवस्थापन संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेमध्ये सामावुन घेतले जाणार नाही व तसा कोणताही हक्क् सदर कर्मचाऱ्यांना असणार नाही . सदर कर्मचाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील . त्यातुन कोणतेही कायदेशीर , आर्थिक इत्यादी वाद निर्माण झाल्यास त्या संस्था स्वखर्चाने स्वत:च्या जबाबदारीवर दूर करेल. महानगरपालिकेला अशा वादाची झळ लागू देणार नाही.
  - विरंगुळा केंद्र इमारतीची महानगरपालिकेस गरज भासल्यास संबंधित संस्थेस सदरचे केंद्राची इमारत महानगरपालिकेस तात्काळ उपलब्ध करुन दयावी लागेल.
  - दिलेल्या इमारतीच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ व सुशोभित ठेवावा लागेल.
  - महानगरपालिकेसोबत संबंधित संस्थेने केलेल्या या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यास महानगरपालिका करारनाम्याची मुदत पुर्ण होण्यापुर्वी अथवा महानगरपालिकेस वाटेल त्यावेळी कोणतेही कारण न देता केव्हाही विरंगुळा केंद्राचा ताबा काढुन घेता येईल.
  - कोणत्याही कारणास्तव सदर केंद्राचे व्यवस्थापक सोडावयाचे झाल्यास त्याबाबत 30 दिवस अगोदर महानगरपालिकेस लेखी कळवुन जागा सुस्थितीत ताब्यात देणे आवश्यक् असेल.
  - विरंगुळा केंद्राची संपुर्ण मालकी महानगरपालिकेची राहील या मालमत्तेवर महापालिका व्यतीरिक्त इतर कोणाचाही अधिकार राहणार नाही.
  - सदर विरंगुळा केंद्रात व्यवस्थापन संस्थाव्दोर कोणत्याही कार्यक्रमाकरीता शुल्क् प्रवेश फी इत्यादी जमा करीत असल्यास त्या कार्यक्रमासाठी महानगरपालिकेमार्फत फी/शुल्क्/भाडे आकरण्यात येईल व त्यासाठी संबंधित उप -आयुक्त (मुख्यालय) यांची लेखी परवानगी आवश्यक असेल.
  - सदर विरंगुळा केंद्रात मनोरंजनासाठी तसेच आरोग्य् विषयक कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.

- **विरंगुळा केंद्राच्या बाबतीत कोणताही वाद झाल्यास आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.**

**ज्येष्ठ नागरीकांसाठी काही नविन योजना राबवावयाच्या आहेत. सदर योजना खालीलप्रमाणे :-**

1. **ज्येष्ठ नागरीकांसाठी साहित्य् पुरवठा करणे.**
   **2) काठी, 2) वॉकर, 3) कमरेचा पट्टा, 4) मानेचा पट्टा,**
2. **ज्येष्ठ नागरीकांसाठी मनोरंजन कार्यक्रम आयोजित करणे.**
3. **ज्येष्ठ नागरीक दिन साजरा करणे.**
4. **ज्येष्ठ नागरीकांसाठी बैठे खेळाच्या स्पर्धांचे आयोजन करणे उदा. कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला, हस्तकला व इतर वेळोवळी ठरविण्यांत आलेल्या स्पर्धा.**
5. **ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्राकरीता किरकोळ खर्चासाठी दरमहा रु.2000/- आर्थिक मदत करणे.**
6. **ज्येष्ठ् नागरीक महिलांसाठी हळदीकुंकू व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.**
7. **ज्येष्ठ नागरीकांकरीता सहलीचे आयोजन करणे.**

**ठराव क्र. :-**

**प्रस्तावित गोषवाऱ्यातील नविन योजना क्र.5 मध्ये ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्राकरीता किरकोळ खर्चासाठी दरमहा रु .10,000/- आर्थिक मदत करण्यात यावी तसेच ज्येष्ठ नागरीक संघटनेच्या सर्व सदस्यांची नोंदणी क्रमांकासह त्यांचे निवासी पत्त्यांची माहिती महापालिकेने मागवून घ्यावी . यासह वरील प्रस्तावानुसार ठराव मंजुर करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. गणेश भोईर अनुमोदक :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८९, **सन २०१८/१९ या आर्थिक वर्षाकरिता डास नाशके , अळी नाशके खरेदी करणे कामाची निवीदा मागविणेबाबत.**

दिपाली मोकाशी :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे अंदाजित 79 चौ.किमी इतके विस्तृत आहे. महानगरपालिका क्षेत्राच्या तिन्ही बाजूने खाडी / समुद्र परिसर आहे. शहरातील नागरी, औद्योगिक वसाहतीतुन सांडपाण्याचा निचरा कच्चे, पक्के नाले व गटारातून खाडी / समुद्रात होत असतो. खाडी / समुद्रात सांडपाण्याचा निचरा होत असलेल्या ठिकाणी खाडीच्या पात्रात मोठया प्रमाणात कांदळवणे आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संथगतीने होत असतो. शहरातील मोकळया जागेत (ओपन प्लॉट) पावसाळया दरम्यान मोठया प्रमाणात पावसाचे पाणी जमा होऊन डबकी निर्माण होत असतात . त्याचप्रमाणे एकात्मिक नाले बांधणी अंतर्गत शहरामधील कच्चे नाले पक्क्या नाल्याच्या स्वरुपात बांधणेकामी बांधकामे, भुयारी गटार योजना बांधकामे इत्यादी सुरु असल्याने, ठिक ठिकाणी गटारे / नाल्यातील सांडपाण्याचा प्रवाह अडवून कामे पूर्ण करण्यात येत असतात.**

**एकदंर शहराची भौगोलिक रचना पाहता तसेच शहरातील वरील सर्व परिस्थितीमुळे मो ठया प्रमाणावर डासांची उत्पत्ती होऊन डासांचा प्रादुर्भाव होत असतो. सदरचा डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणेकामी शहरात डासनाशकाची व अळीनाशकांची मोठया प्रमाणावर फवारणी करणे आवश्यक असून दरवर्षीप्रमाणे विविध कंपनीची डास नाशे व इतर डासनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.**

**त्यानुसार खालीलप्रमाणे डासनाशके, अळीनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.**

| अ.क्र. | डास नाशके, अळी नाशकांचे नाव | वार्षिक अंदाजित परिणाम |
|---|---|---|
| 1 | Alphacypermtrin 10% AC | 2000 लिटर |
| 2 | Bacillus thurginsis var Israelensis 5% WP (TAC Approved) | 1000 किलो |

| | | |
|---|---|---|
| 3 | Bifenthrin 10% WP ISI mark | 200 किलो |
| 4 | Cyfluthrin 5%EW | 2000 लिटर |
| 5 | Deltamethrin 2.5% SC | 2000 लिटर |
| 6 | Dichlorovos 76% EC | 500 लिटर |
| 7 | Diflubenzeron 2% Tablet | 200 किलो |
| 8 | Diflubenzeron 25%WP | 200 किलो |
| 9 | Diflubenzuron 20% SC + Deltamethrin 2% | 500 लिटर |
| 10 | Harbal Sanitizer | 2000 लिटर |
| 11 | Jet Spray Machine | 5 |
| 12 | Lambda Cyhalothrin 9.7% CS | 500 लिटर |
| 13 | M.L.O. Oil | 10000 लिटर |
| 14 | Malathion 50% EC | 500 लिटर |
| 15 | Novaluron 10% EC | 200 लिटर |
| 16 | Polydimethylsioxane (PDMS) 70% | 200 लिटर |
| 17 | Propoxure 2% Bait | 100 किलो |
| 18 | Propoxure 20% E.C (ISI Mark) | 500 लिटर |
| 19 | Pyrethrum 2% E.C (ISI Mark) | 1000 लिटर |
| 20 | Pyrethrum 2% Ettract (ISI Mark) | 1000 लिटर |
| 21 | Pyrosene Oil E ISI mark | 5000 लिटर |
| 22 | Temephos 50% EC ISI mark | 3000 लिटर |
| 23 | Spray Pump (Bronze - 12 Liter ) | 100 नग |

**ठराव क्र. :-**

**उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात फवारणी करणेकरीता वरीलप्रमाणे डास नाशके, अळी नाशके खरेदी करणे कामी सन 2018-19 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात "एकात्मिक डास निर्मुलन योजना" या लेखाशिर्षाखाली रु. 3,00,00,000/- तरतूद शिल्लक आहे. उपरोक्त प्रमाणे वार्षिक निविदा मागविणेस अंदाजित रु . 2,00,00,000/- खर्च अपेक्षित असल्याने सदरचा प्रस्ताव इ-टेंडरव्दारे निविदा मागवून खरेदी करणेसाठी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**रक्षा भुप्तानी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८९ :-**

**सन २०१८/१९ या आर्थिक वर्षाकरिता डास नाशके , अळी नाशके खरेदी करणे कामाची निवीदा मागविणेबाबत.**

ठराव क्र. ९० :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे अंदाजित 79 चौ.किमी इतके विस्तृत आहे. महानगरपालिका क्षेत्राच्या तिन्ही बाजूने खाडी / समुद्र परिसर आहे. शहरातील नागरी, औद्योगिक वसाहतीतुन सांडपाण्याचा निचरा कच्चे, पक्के नाले व गटारातून खाडी / समुद्रात होत असतो. खाडी / समुद्रात सांडपाण्याचा निचरा होत असलेल्या ठिकाणी खा डीच्या पात्रात मोठया प्रमाणात कांदळवणे आहेत . त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संथगतीने होत असतो. शहरातील मोकळया जागेत (ओपन प्लॉट) पावसाळया दरम्यान मोठया प्रमाणात पावसाचे पाणी जमा होऊन डबकी निर्माण होत असतात . त्याचप्रमाणे एकात्मिक नाले बांधणी अंतर्गत शहरामधील कच्चे नाले पक्क्या नाल्याच्या स्वरुपात बांधणेकामी बांधकामे , भुयारी गटार योजना बांधकामे**

इत्यादी सुरु असल्याने, ठिक ठिकाणी गटारे / नाल्यातील सांडपाण्याचा प्रवाह अडवून कामे पूर्ण करण्यात येत असतात.

एकदंर शहराची भौगोलिक रचना पाहता तसेच शहरातील वरील सर्व परिस्थिती मुळे मोठया प्रमाणावर डासांची उत्पत्ती होऊन डासांचा प्रादुर्भाव होत असतो. सदरचा डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणेकामी शहरात डासनाशकाची व अळीनाशकांची मोठया प्रमाणावर फवारणी करणे आवश्यक असून दरवर्षीप्रमाणे विविध कंपनीची डास नाशे व इतर डासनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे डासनाशके, अळीनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | डास नाशके, अळी नाशकांचे नाव | वार्षिक अंदाजित परिणाम |
|---|---|---|
| 1 | Alphacypermtrin 10% AC | 2000 लिटर |
| 2 | Bacillus thurginsis var Israelensis 5% WP (TAC Approved) | 1000 किलो |
| 3 | Bifenthrin 10% WP ISI mark | 200 किलो |
| 4 | Cyfluthrin 5%EW | 2000 लिटर |
| 5 | Deltamethrin 2.5% SC | 2000 लिटर |
| 6 | Dichlorovos 76% EC | 500 लिटर |
| 7 | Diflubenzeron 2% Tablet | 200 किलो |
| 8 | Diflubenzeron 25%WP | 200 किलो |
| 9 | Diflubenzuron 20% SC + Deltamethrin 2% | 500 लिटर |
| 10 | Harbal Sanitizer | 2000 लिटर |
| 11 | Jet Spray Machine | 5 |
| 12 | Lambda Cyhalothrin 9.7% CS | 500 लिटर |
| 13 | M.L.O. Oil | 10000 लिटर |
| 14 | Malathion 50% EC | 500 लिटर |
| 15 | Novaluron 10% EC | 200 लिटर |
| 16 | Polydimethylsioxane (PDMS) 70% | 200 लिटर |
| 17 | Propoxure 2% Bait | 100 किलो |
| 18 | Propoxure 20% E.C (ISI Mark) | 500 लिटर |
| 19 | Pyrethrum 2% E.C (ISI Mark) | 1000 लिटर |
| 20 | Pyrethrum 2% Ettract (ISI Mark) | 1000 लिटर |
| 21 | Pyrosene Oil E ISI mark | 5000 लिटर |
| 22 | Temephos 50% EC ISI mark | 3000 लिटर |
| 23 | Spray Pump (Bronze - 12 Liter ) | 100 नग |

ठराव क्र. :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात फवारणी करणेकरीता वरीलप्रमाणे डास नाशके, अळी नाशके खरेदी करणे कामी सन 2018-19 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात "एकात्मिक डास निर्मुलन योजना" या लेखाशिर्षाखाली रु. 3,00,00,000/- तरतूद शिल्लक आहे. उपरोक्त प्रमाणे वार्षिक निविदा मागविणेस अंदाजित रु . 2,00,00,000/- खर्च अपेक्षित असल्याने सदरचा प्रस्ताव इ-टेंडरव्दारे निविदा मागवून खरेदी करणेसाठी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. दिपाली मोकाशी अनुमोदक :- श्रीम. रक्षा भुप्तानी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्रं. ९०, **सुधारित आकृतीबंधास मंजुरी देणेबाबत.** तसेच प्रकरण क्र. ९१, **सुधारित सेवाप्रवेश नियमास मंजुरी देणेबाबत.**

**मा. उपमहापौर :-**

ह्या दोन्ही विषयावर आपल्याकडे गोषवारे प्रशासनाने दिलेले नाहीत. त्याच्यामुळे त्याच्यावर आपण नेहमीप्रमाणे चर्चा करू शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

तरी पण मला बोलायचे आहे. गेल्या वर्षे भर हा विषय सारखा येतो. प्रत्येक वेळेला गोषवारा नाही. म्हणून आपण पुढे ढकलतो. इतका महत्त्वाचा विषय आहे. सेवा भरती नियम आणि आकृतीबंद मंजूर झाले. तर ह्या शहरामध्ये सगळ्या अमुक गोष्ट करा ठेक्यावर, कोणतीही गोष्ट करा ठेक्यावर, तिसरी गोष्ट करा ठेक्यावर इथे कायमस्वरुपी लोकांना रोजगार मिळेल. नोकऱ्या भेटतील हा प्रश्न मिटवायचा की नाही. प्रशासनाने एक आकृतीबंद सादर करण्यासाठी इतका वर्षभर वेळ लागतो. सेवाप्रविष्ठ नियम त्यांच बनलेले नाही. त्यांचा आकृतीबंद तयार नाही. प्रत्येक वेळेला हाच विषय लावणार आणि आपल्याला तुम्हाला, आम्हाला, सगळ्यांना ह्या गोष्टींपासुन वंचित राहावे. प्रत्येक वेळेला ही गोष्ट होणं चांगल नाही ना? एखाद्याला प्रमोशनच काय आहे. किती लोकांची १२ वर्षे सेवा दिले, कोणाची २४ वर्षे झाली त्यांना प्रमोशन मिळत नाही. एखादा आपला ओळखीचा असतो आणि आपला प्रमोशन करून घेतो. महापालिकेचा विषय आहे म्हणुन, हे सगळे काही ठिक चाललेले नाही. प्रशासनामध्ये आवश्यक सुधारणा सौम्य आणि सगळ्यांना समभाव द्यायचा असेल तर तुम्हाला हा विषय तातडीने मंजूर करा. मा. महापौर मॅडम ही तुम्हाला रिक्वेस्ट आहे की, त्यांची सेवा भरती नियम किंवा त्यांच्यावर आकृतीबंद तयार नसेल तर येणाऱ्या महासभेमध्ये वेळ घालवू नका.

**मा. उपमहापौर :-**

यासंदर्भात मी प्रशासकीय अधिकारीशी चर्चा झाली आणि मला असं माहिती मिळाली आहे की, येणाऱ्या महासभेसमोर निश्चितपणे तो विषय त्यांचच फक्त एक-आठ-दहा दिवसाचे काम बाकी आहे. विविध डिपार्टमेंटच्या वेगवेगळ्या माहित्या कलेक्ट झाल्या. अतिशय थोडस काम बाकी आहे. पण येणाऱ्या १० दिवसात ते पुर्ण माहिती तयार होईल.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९२, **मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. २१३/२०१३ च्या निर्णयानुसार मानधनावर कार्यरत असणा-या संगणक चालक/लघुलेखक यांना समान काम समान वेतन लागू करणेबाबत.**

**राकेश शाह :-**

**प्रशासनाने सदरचा विषय पुढील मा . महासभेत परिपूर्ण माहितीसह सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ९२ :-**

**मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. २१३/२०१३ च्या निर्णयानुसार मानधनावर कार्यरत असणा-या संगणक चालक/लघुलेखक यांना समान काम समान वेतन लागू करणेबाबत.**

**ठराव क्र. ९१ :-**

**प्रशासनाने सदरचा विषय पुढील मा. महासभेत परिपूर्ण माहितीसह सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदक :- श्री. मनोज दुबे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९३, **मतीमंद मुलांना शिकविणा-या व बालवाडी शिक्षकांना शिक्षकांच्या मानधनात वाढ करणे.**

**प्रशांत दळवी :-**

**प्रशासनाने सदरचा विषय पुढील मा . महासभेत परिपूर्ण माहितीसह सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, चार विषयाला क्रमशः आपण गोषवारा नाही म्हणून पुढे ढकलतो आहे. माझी प्रशासनाला विनंती आहे. खरोखर तुम्हाला करायचा असेल. ह्या कामामुळे, ह्या नियमामुळे ह्या कोणाच्यातरी इच्छेखातीर हे आपण करू शकत नाही अशी काही तुमची भूमिका आहे की काय? ह्याला अनेकाची ह्याच्यामध्ये भविष्य आहे, भवितव्य आहे, काही अपेक्षा आहेत. किंवा जे काम करतात ते लोकांची ही आमच्याबद्दल ही अपेक्षा आहे. त्यांना असं वाटतं की, आम्ही आता सत्तेत आहोत. आम्ही हा कामकाज चालवतो आम्हाला न्याय मिळेल. जे नियमात असतो तोच न्याय द्यायचा आहे. नियमात बसणाऱ्यालाच जर वेळ लागत असेल वर्षे दीड वर्षे लागत असेल तर हे बरोबर नाही. एका व्यक्तीवर बोट ठेवायचा असा ही नाही. ते कार्यपध्दतीनुसार विषय आहे, असे कसे काय हिंमत तरी कशी होते. पुढच्या मिटींगमध्ये घेवूया असे सांगा आम्ही त्यांचे स्वागत करू. पुढच्या मिटींगमध्ये घेतल्यानंतर तो निर्णय होईल याची आम्ही स्वागतच करू पण लागोपाट चार विषय महापौर मॅडमने दिलेले विषय असले तरी आमची अशी अपेक्षा आहे. आणि तेच अपेक्षित असले पाहिजे. त्याच्यावर आपलं खुलासा होणं गरजेचे आहे. असे विषय घेता कामा नये.

**प्रभात पाटील :-**

शहराच्या विकासाच्या दृष्टीने आणि शहराच्या प्रगतीच्या दृष्टीने विषय घ्यायचे आणि प्रशासनाने त्याच्यावरती गोषवाराच द्यायचा नाही. नामुष्कीची गोष्ट आहे. त्यामुळे ह्याच्यापुढे असे होणार नाही, याची प्रशासनाने काळजी घ्यावी.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहब से निवेदन है कि, सभी गोषवारा अगली महासभा में देके सभी विषय वापीस लिए जाए।

**प्रकरण क्र. ९३ :-**

**मतीमंद मुलांना शिकविणा-या व बालवाडी शिक्षकांना शिक्षकांच्या मानधनात वाढ करणे.**

**ठराव क्र. ९२ :-**

**प्रशासनाने सदरचा विषय पुढील मा . महासभेत परिपूर्ण माहितीसह सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९४, **शहरातील लेखक, कवी, नाटककार यांच्या कार्यालयाकरीता मिरारोड येथील इंदिरा गांधी हॉस्पिटलमध्ये जागा देणेबाबत धोरण ठरविणे.**

**मनोज दुबे :-**

**मिरा भाईंदर क्षेत्रात लेखक, कवि, नाटककार या वर्गातील मोठ्या प्रमाणावर वरीष्ठ नागरीक असून त्यांच्या मार्फत विरंगुळा केंद्र उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात येत आहे . मिरारोड इंदीरा गांधी रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावर जागा उपलब्ध असून त्याठिकाणी त्यांना महानगरपालिकेच्या धोरणानुसार वरीष्ठ नागरीक साहित्यिक , कवि व नाटककार यांचेसाठी विरंगुळा केंद्र सुरु करुन जागा उपलब्ध करुन देण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**वंदना भावसार :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम, काय आपल्याकडे धोरण निश्चित नाही. कुठले कलाकार आता प्रविण बसून मस्त डिझाईन काढतो. त्यालाही तिथे बसु द्यायच की मी खूप चांगली कविता लिहितो म्हणून मलाही बसु द्यायचं की जुबेर इनामदार पुर्णपणे वाचतच राहतात. काही ना काही त्यांना ही बसु द्यायंच.

**मा. महापौर :-**

फक्त कवी लोकांना.

(सभागृहात गोंधळ)

**गिता जैन :-**

त्यांना द्यायचं असेल तर छान जागा द्या.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम, चांगला विषय आहे. सदरचा विषय व्यवस्थित आपण नीट गोषवारा द्या. कलाकार कोण असायला पाहिजे. त्याचे कुठलेतरी, काहीतरी असायला पाहिजे. नंतर गोषवारा व्यवस्थित द्या त्याच्यानंतर विषय घ्या.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, उधर सभी लोगो को जो जगह दिया गया है। शायद इनको मालूम नही कि, वहा ऑलरेडी लायब्ररी कितने सालों से चालू है। वही पढा जाता हैं, और लायब्ररी के बाजू में जगह खाली है। वह जगह दिये जा रही है। बच्चे लायब्ररी में शांती से पढ सके तो कवी लोगो को क्यू नही शांती से पढ सकते। और कमिशनर साहब ने दौरा किया था। कि यह जगह उनको बरोबर रहेंगी इसके लिए यह विषय लाया गया है। और मेरा ऐसा मानना है की, उनको भी जगह देनी चाहिए। क्योंकि वहा पे बहुत सालों से डिमांड है। कवि नाके पे उधर बैठ के कविता ये करते मिरा भाईंदर के लिए। तो हमेशा अपने यहा का गौरव हो तो उनके लिए भी एक जगह होनी चाहिए और वह एक अच्छी जगह है। और वो कवि है, वो बाहर आदमी से पुरस्कृत भी है। और वह जगह खाली पडी हुँई है।

**गिता जैन :-**

नही नही आप खाली है, देना विषय भी बहुत अच्छा है। मैं यह नही बोल रही हु कि नही देना है। मैं यह बोल रही हुँ कि, किसको वहा बैठने देना है, ऐसा क्रायटेरिया हम पहले नक्की करे।

**नगरसचिव :-**

ठराव वाचुन दाखवले.

**जुबेर इनामदार :-**

इंदिरा गांधी रूग्णालयात देत आहे ना? साहेब तो आरक्षण रूग्णालय आणि ग्रंथालयाचा आहे. तिथे सध्या असलेली अभ्यासिका ती जागा कमी पडते. मुलांची मांग आहे. त्याचा फायदा मुलांना झालेला आहे. विषय चांगला आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपली अभ्यासिका केवढी मोठी आहे. अजुन त्याच्यामध्ये कितीतरी विद्यार्थी बसतील. तिकडे पुरवठा करू शकतो.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तिथे मुलं भरपुर येतात. त्या ऐवजी दुसरी चांगली जागा शोधा. विषय व्यवस्थित गोषवारा सहीत प्रशासनाने आणावं. मांडावा आमची सहमती आहे. कुणाचाही विरोध होणार नाही.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, पहिले माले पें भी जगा बहुत सी है, खाली पडी हुँई है। वहाँ पे अपने आधार कार्ड का केंद्र लगाया था। वही पुरी जगह खाली पडी हुँई है। सेकंड फ्लोअर के अंदर खाली है। जो लायब्ररी है, लायब्ररी के आधी जगह और आधी जगह खाली पडी हुँई है। क्योंकि मैं तीन-चार बार में विझिट अभी अभी करके आया हूँ। क्योंकि वह पुरा ऐसे है कि खाली होने से वजह से नुकसान होता है। अगर अच्छे काम के लिए दे रहे है, अगर काम के लिए वह जा रही है। तो उसकी लिए सभी सभागृह को सहमती करके ठराव पास करना चाहिए।

**जुबेर इनामदार :-**

साहेब मिरारोडच्या नंतर सरळ भाईंदरला टेंबा हॉस्पीटल आहे. हॉस्पीटलचे आरक्षण आहे. तिथे जागा त्या कामासाठी आहे त्यासाठी जागासाठी ठेवायला पाहिजे. अन्यथा त्याचा गैरउपयोग होईल, लोकांना तिथे गैरसोय होईल, अजून आपल्याला हॉस्पीटलचे डिपार्टमेंट वाढवायचे आहेत. अशा प्रकारे

एकतर प्रशासनाचा गोषवारा नाही आणि असा आलेला मोघम थातूरमातूर गोषवारा शिवाय मान्य करू नये. हा विषय सुध्दा तुम्ही विखंडनासाठी पाठवा.

**दिनेश जैन :-**

जुबेरजी अगर बोल रहे है की, वह हॉस्पीटल की जगह है। वहाँ पे बच्चे लोगों के लिए स्टडी के लिए लायब्ररी कितने सालो से कैसे चल रही है।

**मा. उपमहापौर :-**

जे वास्तव आपण ज्यांनी लिहले आहे त्यांनाच बसायला गोष्ट करतोय.

(सभागृहात गोंधळ)

**अशरफ शेख :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. १९/१०/२०१८ प्रकरण क्र. ९४, शहरातील लेखक, कवी, नाटककार यांच्या कार्यालयाकरीता मिरारोड येथील इंदिरा गांधी हॉस्पीटलमध्ये जागा देणेबाबत धोरण ठरविणेबाबतचा विषय विषयपत्रिकेवर प्रस्तावित केलेला आहे. परंतु, प्रशासनाने सदर विषयाबाबतचा गोषवारा दिलेला नाही. त्याअर्थी प्रशासनाची भुमिका या विषयावर स्पष्ट होत नाही.

तरी सदरचा विषय प्रशासनाचा गोषवारा नसल्या अभावी फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**नरेश पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

दोन ठराव आले आहेत, मतदान करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण ९४ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव आहेत, सुचक श्री. मनोज दुबे अनुमोदक श्रीम. वंदना भावसार. दुसरा ठराव आहे, सुचक श्री. अशरफ शेख अनुमोदक श्री. नरेश पाटील. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. श्री. अशरफ शेख ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. मनोज दुबे ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. मनोज दुबे यांनी मांडलेला ठरावाच्या बाजूने ४३, विरोधात २४, तटस्थ १ इतकी मते पडलेली आहेत. मनोज दुबे यांनी मांडलेला ठराव बहुमतांने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९४ :-**

**शहरातील लेखक , कवी, नाटककार यांच्या कार्यालयाकरीता मिरारोड येथील इंदिरा गांधी हॉस्पिटलमध्ये जागा देणेबाबत धोरण ठरविणे.**

ठराव क्र. ९३ :-

**मिरा भाईंदर क्षेत्रात लेखक, कवि, नाटककार या वर्गातील मोठ्या प्रमाणावर वरीष्ठ नागरीक असून त्यांच्या मार्फत विरंगुळा केंद्र उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात येत आहे . मिरारोड इंदीरा गांधी रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावर जागा उपलब्ध असून त्याठिकाणी त्यांना महानगरपालिकेच्या धोरणानुसार वरीष्ठ नागरीक साहित्यिक , कवि व नाटककार यांचेसाठी विरंगुळा केंद्र सुरु करुन जागा उपलब्ध करुन देण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. मनोज रामनारायण दुबे** **अनुमोदक :- श्रीम. वंदना भावसार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | १.जैन गीता भरत |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | नलावडे दिनेश दगडु | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | सौंस निला बर्नाड | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | कदम अर्चना अरुण | |
| १४ | मोकाशी दिपाली आनंदराव | १४ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | अरोरा दीपिका पंकज | १६ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १७ | नाईक विविता विवेक | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | भावसार वंदना संजय | १८ | शेख रुबीना फिरोझ | |
| १९ | बेलानी हेमा राजेश | १९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | सोनार सुरेखा प्रकाश | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २२ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २३ | शाह राकेश रतिशचंद्र | २३ | अहमद साराह अकरम | |
| २४ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २४ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २५ | तिवारी अशोक सूर्यदेव | २५ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २६ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २७ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २८ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| २९ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३० | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३२ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३३ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३४ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३५ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३६ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३७ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३८ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ३९ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४० | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४१ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ४२ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४३ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९५, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १०७-अ अन्वये स्थानिक निधी लेखपरिक्षण विभाग यांचेकडील सन २०१३-१४ व २०१४-१५ चा लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत .** अवलोकन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, वैती साहेब, काय प्रचलित पध्दत असायची आपल्याकडे अहवाल सादर होत होता. आता अहवाल येऊन ठेवला सचिव कार्यालयामध्ये तिथे जायचं आणि वाचायचं हे नवीन पध्दत सुरू झाली.

**मा. उपमहापौर :-**

आपल्याला असं अपेक्षित होतं की, ते सदस्यांकडे द्यायला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

दिलं पाहिजे. आधी द्या नंतर विषय आणा.

**मा. उपमहापौर :-**

सभेच्या दिवशीच सभागृहात आणुन ठेवला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तो विषय द्या. आम्ही त्याचा अभ्यास करु. आम्हाला कॉपी द्या. आम्ही त्याचा अभ्यास करु. नंतर आम्हाला काही शंका असेल तर मा. आयुक्तांना सांगू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम आप सचिवसाहब को बोलो कि, जो कॉपी आई हुॅई है। तो सारी कॉपी सभी नगरसेवक को दे दो।

**मा. महापौर :-**

कॉपी आहे ना तुमच्याकडे सर्व नगरसेवकांना द्या.

**मा. उपमहापौर :-**

आताच्या आता काय झेरॉक्स निघणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

ते बरोबर नाही ना. आणल्यानंतर थोडे पुढे घ्या. येऊ द्या विषय प्रशासनाला कमीत कमी समजले पाहिजे. हा नवीन पायंडा कुठुन पाडला. आजपर्यंत देत आले. साहेब गिते साहेबांनी चांगला फोल्डर बनवून दिलेला गेल्यावेळी. वरती खाली लाल रंगाचे फित्ते लावून दिले होते.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, हा लेखा परिक्षण अहवाल थोडासा नजरेखालुन घालायची वेळ आहे. आलो होतो त्या दिवशी एक तासामध्ये मिळाला. एवढे गंभीर आरोप केले आहेत प्रशासनावर, ठळक मुद्दे मी वाचुन दाखवतो. थोडे सात-आठ मुद्दे.

**नगरसचिव :-**

दोन 'के' खाली विषय आहेत. प्रकरण क्र. ९६, **घोडबंदर येथील** 60.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यापासुन किल्ल्यापर्यंत जाण्यासाठी 24.00 मी. रुंदीचा रस्ता **महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये** मंजूर विकास योजना आराखडयात दर्शवून फेरबदलास मान्यता देणेबाबत.

**रुपाली शिंदे :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.**14/05/1997** रोजी मंजूर झालेली असून दि.**15/07/1997** पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.**25/08/2000** रोजी मंजूर झालेली असून दि.**15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-**1208/1346**/प्र.क्र.**267/08**/नवि-**12,** दि.**29/08/2009** अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

**मिरा भाईंदर क्षेत्रातील घोडबंदर किल्ला ही एकमेव ऐतिहासिक वास्तु शहरास लाभलेली आहे . सदील किल्ला हा पुरातत्व विभागाच्या अखत्यारित असुन शिवकालीन शुरवीर योद्धांचा इतिहास पर्यटकांना व शहरवासियांना कळणे गरजेचे आहे . सदरील किल्ल्याकडे जाण्यासाठी घोडबंदर गावातुन एकमेव रस्ता उपलब्ध असुन त्याची सरासरी विद्यमान रुंदी सुमारे 6 ते 8 मीटर एवढी आहे . त्यामुळे पर्यटकांना किल्ल्यापर्यंत जावयाचे असल्यास घोडबंदर येथील गोवळादेवी मंदिरापर्यंत बसने जाऊन पुढे एक किलोमीटर पर्यंत चालत जावे**

**लागते. पर्यटकांच्या खाजगी वाहनांसाठी किल्ल्याजवळ वाहनतळाची सोय उपलब्ध नाही . सदरील किल्ल्याकडे जाण्यासाठी योग्य रुंदीचा रस्ता असणे आवश्यक असल्याने मंजूर विकास योजना आराखडयातील नियोजित 60.00 मी. रुंदीच्या रस्त्यापासून घोडबंदर येथील उघाडीमार्गे किल्ल्यापर्यंत मौजे घोडबंदर, स.क्र. 228पै., 49पै., 50पै., 24पै., या जागेतून 18.00 मी. रुंदीचा रस्ता नव्याने प्रस्तावित करणेसाठी महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये मंजूर विकास योजना आराखडयात फेरबदल करणेसाठी व त्याअनुषंगीक सर्व कार्यवाही करून अंतीम मंजुरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा . आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देण्यासाठी हि सभा मंजूरी देत आहे.**

**संजय थेराडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर.

**प्रकरण क्र. ९६ :-**

**२ के अन्वये प्रस्ताव - घोडबंदर येथील** 60.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यापासुन किल्ल्यापर्यंत जाण्यासाठी 24.00 मी. रुंदीचा रस्ता **महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये** मंजूर विकास योजना आराखडयात दर्शवून फेरबदलास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ९४ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.**14/05/1997** रोजी मंजूर झालेली असून दि.**15/07/1997** पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.**25/08/2000** रोजी मंजूर झालेली असून दि.**15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-**1208/1346/**प्र.क्र.**267/08/**नवि-**12,** दि.**29/08/2009** अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

**मिरा भाईंदर क्षेत्रातील घोडबंदर किल्ला ही एकमेव ऐतिहासिक वास्तु शहरास लाभलेली आहे . सदील किल्ला हा पुरातत्व विभागाच्या अखत्यारित अ सुन शिवकालीन शुरवीर योद्धांचा इतिहास पर्यटकांना व शहरवासियांना कळणे गरजेचे आहे . सदरील किल्ल्याकडे जाण्यासाठी घोडबंदर गावातुन एकमेव रस्ता उपलब्ध असुन त्याची सरासरी विद्यमान रुंदी सुमारे 6 ते 8 मीटर एवढी आहे . त्यामुळे पर्यटकांना किल्ल्यापर्यंत जावयाचे असल्यास घोडबंदर येथील गोवळादेवी मंदिरापर्यंत बसने जाऊन पुढे एक किलोमीटर पर्यंत चालत जावे लागते. पर्यटकांच्या खाजगी वाहनांसाठी किल्ल्याजवळ वाहनतळाची सोय उपलब्ध नाही . सदरील किल्ल्याकडे जाण्यासाठी योग्य रुंदीचा रस्ता असणे आवश्यक असल्याने मंजूर विकास योजना आराखडयाती ल नियोजित 60.00 मी. रुंदीच्या रस्त्यापासून घोडबंदर येथील उघाडीमार्गे किल्ल्यापर्यंत मौजे घोडबंदर, स.क्र. 228पै., 49पै., 50पै., 24पै., या जागेतून 18.00 मी. रुंदीचा रस्ता नव्याने प्रस्तावित करणेसाठी महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये मंजूर विकास योजना आराखडयात फेरबदल करणेसाठी व त्याअनुषंगीक सर्व कार्यवाही करून अंतीम मंजुरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा . आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देण्यासाठी हि सभा मंजूरी देत आहे.**

सुचक :- श्रीम. रुपाली शिंदे (मोदी)      अनुमोदक :- श्री. संजय थेराडे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९७ 'के' खाली, **"महापौर चषक 2018-19" चे आयोजन करणेबाबत.**

ध्रुवकिशोर पाटील :-

**मिरा भाईंदर महा नगरपालिका क्रीडा विभागा अंतर्गत सन 2018-19 या वर्षात "महापौर चषक" स्पर्धांचे आयोजन करावयाचे असुन, सदर महापौर चषक स्पर्धेमध्ये खालील नमुद प्रमाणे खेळाचे आयोजन करावयाचे आहे.**

| तपशिल | वयोगट |
|---|---|
| सांघिक कला | लोकनृत्य् व समुह गायन |

| | |
|---|---|
| स्पर्धा | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| मैदानी स्पर्धा | 100मी./200मी./400मी.धावणे/गोळाफेक/थाळीफेक/भालाफेक/स्केटींग/बुध्दीबळ |
| | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| सांघिक क्रीडा स्पर्धा | कबड्डी/खो-खो/वॉलीबॉल (पासिंग) /लंगडी/लगोरी/महिला क्रिकेट (खो-खो, कबड्डी शालेय गट /इतर (क्लब्/संस्था) असा स्पष्ट् उल्लेख असावा) |
| वैयक्तिक स्पर्धा कला विभाग | 12 ते 19 वर्षाखालील<br>कथाकथन-मराठी, हिंदी, इंग्रजी<br>निंबध स्पर्धा- मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी<br>वक्तृत्व् स्पर्धा- मराठी, हिंदी, इंग्रजी, चित्रकला स्पर्धा<br>वादविवाद - मराठी, हिंदी, इंग्रजी |
| वैयक्तिक स्पर्धा कला विभाग (खुला गट) | कथाकथन - मराठी, हिंदी, इंग्रजी<br>निबंध स्पर्धा - मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी<br>वत्कृत्व् स्पर्धा - मराठी, हिंदी, इंग्रजी<br>चित्रकला स्पर्धा<br>वादविवाद - मराठी, हिंदी, इंग्रजी<br>पाककला स्पर्धा - शाकाहारी/गोड पदार्थ<br>रंगावली<br>हस्तकला |
| जलतरण स्पर्धा | 50 मी. फ्रीस्टाईल, 50 मी. बटरफ्लाय |
| | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| इन्डोर स्पर्धा | कॅरम - एकेरी<br>टेबल टेनिस - एकेरी व दुहेरी<br>बॅडमिंटन - दुहेरी |
| | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| कराटे स्पर्धा | 6 वर्ष ते 18 वर्षावरील |

**सदर महापौर चषक 2018-19 या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी सन 2018-19 च्या अंदाजपत्राकामध्ये रु.125 लाखांची तरतुद करण्यात आलेली होती . सदस्थितीत सदर लेखाशिर्षा अंतर्गत रु.100.00 लाख तरतुद शिल्लक आहे . "महापौर चषक 2018-19" चे आयोजन करण्यासाठी रु .100.00 लाख खर्च अपेक्षित आहे.**

**तरी सदर "महापौर चषक 2018-19" चे आयोजनासाठी इवेंट मॅनेजमेंट संस्थेमार्फत करण्याकरीता निविदा मागविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थि क प्रशासकीय मंजुरी देवून व तरतुद कमी पडल्यास पुर्न:विनीयोजन करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करीत आहे. तसेच "महापौर चषक 2018-19" चे आयोजन व नियोजन करणेकामीचे सर्व अधिकार हि सभा सर्व मा. पदाधिकारी व मा. आयुक्त् यांना प्रदान करीत आहे असा मी ठराव करीत आहे.**

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिनेश नलावडे :-**

फक्त एक सुचना याच्यामध्ये ध्रुवजी सर्व गेम याच्यामध्ये आलेले आहेत. परंतु एक माझी सुचना आहे. याच्यामध्ये कुस्तीचा समावेश नाही. २०१० मध्ये जेव्हा आम्ही स्टॅडींग कमिटीचे चेअरमन असताना कुस्तीचे आयोजन केले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी ऑलरेडी सांगितलं की, कुस्ती हा राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करूया. त्याचा आपण पुढचा विषय घेऊया.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर.

**प्रकरण क्र. ९७ :-**

**२ के अन्वये प्रस्ताव - "महापौर चषक 2018-19" चे आयोजन करणेबाबत.**

ठराव क्र. ९५ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्रीडा विभागा अंतर्गत सन 2018-19 या वर्षात "महापौर चषक" स्पर्धांचे आयोजन करावयाचे असुन, सदर महापौर चषक स्पर्धेमध्ये खालील नमुद प्रमाणे खेळाचे आयोजन करावयाचे आहे.**

| तपशिल | वयोगट |
|---|---|
| सांघिक कला स्पर्धा | लोकनृत्य् व समुह गायन |
| | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| मैदानी स्पर्धा | 100मी./200मी./400मी.धावणे/गोळाफेक/थाळीफेक/भालाफेक/स्केटींग/बुध्दीबळ |
| | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| सांघिक क्रीडा स्पर्धा | कबड्डी/खो-खो/वॉलीबॉल (पासिंग) / लंगडी/लगोरी/महिला क्रिकेट (खो-खो, कबड्डी शालेय गट /इतर (क्लब्/संस्था) असा स्पष्ट् उल्लेख असावा) |
| वैयक्तिक स्पर्धा कला | 12 ते 19 वर्षाखालील<br>कथाकथन-मराठी, हिंदी, इंग्रजी |

| | |
|---|---|
| विभाग | निंबध स्पर्धा- मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी<br>वक्तृत्व् स्पर्धा- मराठी, हिंदी, इंग्रजी, चित्रकला स्पर्धा<br>वादविवाद - मराठी, हिंदी, इंग्रजी |
| वैयक्तिक स्पर्धा कला विभाग (खुला गट) | कथाकथन - मराठी, हिंदी, इंग्रजी<br>निबंध स्पर्धा - मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी<br>वत्कृत्व् स्पर्धा - मराठी, हिंदी, इंग्रजी<br>चित्रकला स्पर्धा<br>वादविवाद - मराठी, हिंदी, इंग्रजी<br>पाककला स्पर्धा - शाकाहारी/गोड पदार्थ<br>रंगावली<br>हस्तकला |
| जलतरण स्पर्धा | 50 मी. फ्रीस्टाईल, 50 मी. बटरफ्लाय |
| | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| इन्डोर स्पर्धा | कॅरम - एकेरी<br>टेबल टेनिस - एकेरी व दुहेरी<br>बॅडमिंटन - दुहेरी |
| | 12 वर्षाखालील |
| | 14 वर्षाखालील |
| | 17 वर्षाखालील |
| | 19 वर्षाखालील |
| | खुला गट |
| कराटे स्पर्धा | 6 वर्ष ते 18 वर्षावरील |

सदर महापौर चषक 2018-19 या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी सन 2018-19 च्या अंदाजपत्राकामध्ये रु.125 लाखांची तरतुद करण्यात आलेली होती . सदस्थितीत सदर लेखाशिर्षा अंतर्गत रु.100.00 लाख तरतुद शिल्लक आहे . "महापौर चषक 2018-19" चे आयोजन करण्यासाठी रु .100.00 लाख खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर "महापौर चषक 2018-19" चे आयोजनासाठी इवेंट मॅनेजमेंट संस्थेमार्फत करण्याकरीता निविदा मागविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक प्रशासकीय मंजुरी देवून व तरतुद कमी पडल्यास पुर्न:विनीयोजन करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करीत आहे. तसेच "महापौर चषक 2018-19" चे आयोजन व नियोजन करणेकामीचे सर्व अधिकार हि सभा सर्व मा. पदाधिकारी व मा. आयुक्त् यांना प्रदान करीत आहे असा मी ठराव करीत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**जुबेर इनामदार :-**

एक शोक प्रस्ताव आहे. ह्या सभागृहाचे सन्मा. सदस्य नरेश तुकाराम पाटील यांचे वडिल तुकाराम सिताराम पाटील हे ९ सप्टेंबर २०१८ रोजी वयाच्या ६३ वर्षी त्यांच निधन झालेल आहे. अल्पशः आजाराने त्याचं निधन झालेलं आहे. त्यांच्या आत्म्याला शांतता मिळण्यासाठी प्रार्थना करतोय.

**रोहिदास पाटील :-**

त्याच बरोबर सुर्यकांत पावनेकर बंदर वाडीतील रहिवासी भजन मंडळीचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते त्यांचे ही निधन झालेले आहे. त्याचा ही शोक प्रस्ताव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तसेच आपले ऑफिसर शरद बेलवटे त्यांचे मातोश्री यांचंही निधन झालेलं आहे. त्यांचाही शोक प्रस्ताव मांडत आहे.

**दिनेश नलावडे :-**

नगरसेविका दीप्ती भट त्यांच्या मातोश्रीचं देखील निधन झालेल आहे. त्यांचे दुखःद निधन बद्दल शोक प्रस्ताव करतो.

**मा. उपमहापौर :-**

महापालिकेतील अधिकारी प्रभाकर म्हात्रे यांचा भावाचा मुलगा यांचा देखील हार्दिक अविनाश म्हात्रे यांचे देखील निधन झाले आहे. त्यांचे देखील शोक प्रस्ताव मांडत आहे.

**नगरसचिव :-**

हुतात्म्यांना शांती देण्यासाठी सर्वांनी १ मिनीट जागेवर स्तब्ध उभे राहायचे आहे.

**दुःखवठा ठराव क्र. ९६ :-**

ह्या सभागृहाचे सन्मा. सदस्य नरेश तुकाराम पाटील यांचे वडिल तुकाराम सिताराम पाटील हे ९ सप्टेंबर २०१८ रोजी वयाच्या ६३ वर्षी त्यांच निधन झालेल आहे. अल्पशः आजाराने त्याचं निधन झालेलं आहे. तसेच श्री. सुर्यकांत पावनेकर बंदर वाडीतील रहिवासी भजन मंडळीचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते त्यांचे ही निधन झालेले आहे. तसेच आपले ऑफिसर शरद बेलवटे त्यांचे मातोश्री यांचंही निधन झालेलं आहे. त्यांचाही शोक प्रस्ताव मांडत आहे. तसेच नगरसेविका दीप्ती भट त्यांच्या मातोश्रीचं देखील निधन झालेल आहे. त्यांचे दुखःद निधन बद्दल शोक प्रस्ताव मांडत आहे. तसेच महापालिकेतील अधिकारी प्रभाकर म्हात्रे यांचा भावाचा मुलगा यांचा देखील हार्दिक अविनाश म्हात्रे यांचे देखील निधन झाले आहे. त्यांचे देखील शोक प्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभा संपली असे मी जाहीर करते.

**(सभा संपल्याची वेळ संध्या. ५.४५ वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका